वालचंद हीराचंद.
अशक्य तेही शक्य करणारा
एक झुंजार प्रतिभावंत!



वालचंद हिराचंद एक असामान्य प्रज्ञावंत अनेक नव्या क्षेत्रात निधडेपणाने शिरले आणि त्यांनी त्यात धडाडीने यश मिळविले. त्यांची दृष्टी द्रष्ट्याची. भविष्यात आरपार पाहू शकणारी आजच्या गरजा त्यांनी काल ओळखल्या आणि त्या पुऱ्या करण्यासाठी धडाधड एकामागून एक नवे उद्योग त्यांनी उभे केले. उत्पादनाचे जवळ जवळ प्रत्येक क्षेत्र व्यापणारे एक विशाल औद्योगिक साम्राज्य त्यांनी वसवले. तोच हा वालचंद उद्योगाचा समूह. वालचंद उद्योग समूहाने भारतीय तंत्रज्ञानाच्या प्रगतीला गति देऊन ते झपाट्याने पुढे नेले. परिवहन कन्सल्टन्सी, बांधकाम, भारी इंजिनिअरिंग, कृषी इत्यादि अनेक क्षेत्रात, मोठी बांधकामे, जल व्यवस्थापन, यंत्रनिर्मिती किंवा अणु-प्रकल्प आणि अवकाश संशोधनासाठी लागणारे काटेकोर बनावटीचे हार्डवेअर यासारख्या ज्या ज्या क्षेत्रात वालचंद समूहाने प्रवेश केला त्या त्या क्षेत्रातील त्यांची कामगिरी अशी नेत्रदीपक आहे की केवळ देशातच नव्हे तर सर्व जगात त्यांची कीर्ति दरवळत आहे.

आज हे उद्योग म्हणजेच त्यांची खरी स्मारके आहेत. या उद्योगाच्या आकाशभर कर्तृत्वाने आज प्रत्येक भारतीयाच्या मनात भारतदेशाच्या क्षमतेविषयी साधार विश्वास आणि सार्थ अभिमान निर्माण केला आहे. वालचंद हिराचंद यांच्या या जन्म शताब्दिसमयी वालचंद समूहातील कंपन्या त्या थोर पुरुषाच्या अदम्य व्यक्तिमत्वाला आणि अग्रगामी प्रतिभेला विनम्रतापूर्वक श्रध्दांजली वाहत आहेत।

प्रीमियर कन्स्ट्रक्शन क. लि. • हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन क. लि. • इंडियन ह्यूम पाईप क. • प्रीमियर ऑटोमोबाइल्स लि. • वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. • रावळगाव शुगर फार्म लि. • विकाटो भटल कॅबिकेटर्स लि. • ॲक्रो इंडिया लि. • बॉबे सायकल ॲन्ड मोटर एजन्सी लि. • गंगा ब्रिज कन्स्ट्रक्शन क. लि. • वालचंद तदूर सिमेंट क. लि. • वालचंद ॲन्ड क. प्रा. लि. • पॅअर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट प्रा. लि.

Sista's WIL-214/82 A Mar


# अनेकान्त

अंक २२

१९८३-८४

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

'सामाजिक बांधिलकी' च्या जाणिवेतून
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी (पुणे) द्वारा कार्यान्वित
नवे उपक्रम

★ अपंग व्यक्ती व आर्थिकदृष्टया दुर्बल स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यासाठी

**अनेकान्त मुद्रणालय**

कंपोझिंग, प्रिंटींग, बाईंडिंग इ. कामे केली जातात व शिक्षण दिले जाते.

★ सुशिक्षित बेकारांना व अल्पशिक्षित तरुणांना तंत्रज्ञानकुशल बनवून स्वावलंबी बनविण्यासाठी

**विज्ञान कार्यशाळा**

टर्निंग, फिटींग व वेल्डिंग इ. चे तंत्रज्ञान उपलब्ध

★ विद्यार्थी व नागरिक यांच्या सोयीसाठी

**झेरॉक्स मशिन**

ची तत्पर सेवा उपलब्ध

अधिक माहितीसाठी भेटा–
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
बारामती.


अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
## बारामती

॥ अनन्तधर्मणस्तत्त्वं पश्यन्ती प्रत्यगात्मनः ॥
॥ अनेकान्तमयी मूर्तिर्नित्यमेव प्रकाशताम् ॥

# अनेकान्त

वार्षिक नियतकालिक

(वरिष्ठ)

अंक बाविसावा : १९८३–८४


**प्रमुख संपादक**
प्रा. धनंजय शहा

**संपादक मंडळ**

- अध्यक्ष
  प्राचार्य डॉ. जे. के. गोधा
- उपाध्यक्ष
  प्रा. बी. बी. पाटील
- साहाय्यक
  प्रा. आर्. टी. शहा
  प्रा. एस्. आर्. नवाथे
  प्रा. एम्. बी. कंडारकर
  प्रा. के. एस्. अय्यर

## अनुक्रम


● संपादकीय (१)

● अनुचिन्तन (४)

**लेख / ललित लेख**

● वन्दे मातरम् / कु. संजीवनी मा. शहा (५) ● स्वयंरोजगार : एक मीमांसा / जहांगीर खान (७) ● जीवन तरंग / विजयकुमार तेली (९) ● मांड / तुकाराम पवार (११) ● डायरी : एक मनोगत / कु. ज्योती मरकळे (१३)

**कथा**

● पोरकी मानसं / महादेव चव्हाण (१५) ★ सासरा सिरीयस होतो / कु. कल्पना पवार (१७) ★ सारजा / सौ. व्ही. आर्. जंगम (२०)

**कविता**

★ खरा धर्म / प्रमोद वडगावकर (२४) ● मन / कु. मीनाक्षी धालपे (२४) ★ भावतरंग / कु. ज्योती मरकळे (२५) ● आयुष्य / निनाद भोईटे (२५) ● सौदा / चंद्रकांत कावळे (२५) ● अंत / विजयकुमार तेली (२६) ● चक्र / दिलीप कुलकर्णी (२६) ● क्रिकेट / द. ज. निंबाळकर (२७) ● निःशब्द / जे. डी. शेंडे (२७) ● कामगार / एस्. एस्. ठोंबरे (२७)

**हिंदी विभाग**

● अमर वेदना की गायिका : महादेवी वर्मा (परिचयात्मक) / कु. धालपे एस्. एम्. (२८) ★ आँख फूटी पीर गयी (कहानी) / मिसाळ दयानंद (२९) ● मन के हारे हार (निबंध) / कु. मीनाक्षी धालपे (३३) ● ज़रा पहचानो (कविता) / अनिल पानसे (३५) ● जिंदगी (कविता) / विलास सोकटे (३५) ● हार (कविता) / कु. कल्पना पवार (३६) ● शेर (कविता) / सलाउद्दीन मुजावर (३६)

**English Section**

● What ails the Punjab ? / Dilip K. Kulkarni (३७) ● George Eliot, the stern moralist Atole H. U. (४०) ● The Central Tone (Poem) / Pramod Wadgaonkar (४५)

**कार्यवृत्तान्त – ४३ ते ६०**


* पारितोषिक पात्र.

स्वा. सावरकर जन्मशताब्दि निमित्त

### विनम्र अभिवादन



की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने
लब्ध-प्रकाश-इतिहास-निसर्गमाने
जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे
बुद्ध्याची वाण धरिले करिं हे सतीचे

# स्वातंत्र्यवीर सावरकर व्यक्तित्वदर्शन

हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने झुंजण्याचा संकल्प बालपणीच करणारा व त्यानुसार अपार कष्ट भोगणारा ज्वलंत व जन्मजात देशभक्त, क्रांतिमंत्राचा उद्गाता, मनुष्यजातीचे कल्याण हेच अंतिम उद्दिष्ट असणारा राष्ट्रवादी, मूलग्राही व कृतिशूर विचारवंत, विज्ञाननिष्ठ नि उपयुक्ततावादी समाजसुधारक, दिक्कालाला भेदून भविष्याचा वेध घेणारा प्रतिभा संपन्न महाकवी, आशयसंपन्न निबंधकार, जीवनदर्शन घडविणारा नाटककार, राजकीय व सामाजिक पार्श्वभूमीवर आधारित कादंबऱ्यांचा लेखक, रक्ताच्या शाईत बुडवून विद्युल्लतेच्या लेखणीने लिहिणारा व उज्वल भूतकाल व श्रेष्ठ परंपरांचे ज्ञान देऊन राष्ट्रभक्तीचा स्फुल्लिंग चेतविणारा ग्रंथकार, अतीत कालातील घटनांचा अन्वयार्थ उलगडून दाखविणारा द्रष्टा इतिहासकार, भाषाशास्त्रज्ञ, दूरदृष्टीचा राजनीतिज्ञ, 'दशसहस्त्रेषु' आढळणारा ओजस्वी अमोघ वक्ता ! स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचे स्मरण केले की, त्यांची ही विविध रूपे डोळ्यासमोर येतात. स्वा. सावरकरांनी आपली गुणसंपदा 'काटक्यांचा संसार' उभा करण्यासाठी नव्हे, तर मातृभूमीच्या पारतंत्र्य विमोचनासाठी राबवली. "हे मातृभूमि ! सुजला मन वाहियेले । वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले।" अशा समर्पण वृत्तीने इतिहासाच्या ज्ञानप्रकाशाने प्रकट केलेल्या व डोळसपणे स्वीकारलेल्या दिव्य व दाहक व्रतांची सांगता करण्यासाठी त्यांनी हे सर्व गुण उपयोगात आणले. राष्ट्रसंवर्धनाच्या सावरकर प्रणीत विविध विचारांचे व कार्याचे अवलोकन केल्यावर 'स्वातंत्र्यवीर' ही त्यांना दिलेली पदवी अपुरी वाटू लागते. सावरकर सर्वार्थांनी क्रांतिकारक व राष्ट्र शिल्पकार होते. "मनुष्ये मरतात पण त्यांची सत्कृत्ये जिवंत राहतात. सत्कृत्ये या मर्त्य जगात अमरत्व देणारी अपूर्व रसायने आहेत. त्या सत्कृत्यांचे लवमात्र ग्रहणही आत्म्याचे अमरत्व सिद्ध करते" – या त्यांच्या अमर उक्तीप्रमाणे स्वा. सावरकरही अमर आहेत ! त्यांच्या पुण्यस्मृतीला शतशः अभिवादन !



'अनेकान्त' चा २२ वा अंक सादर करीत आहोत. अशी नियतकालिके म्हणजे महाविद्यालयाचे अन्तर्बाह्य दर्शन घडविणारे एक सुविहित माध्यमच होय.

महाविद्यालयातील नवनवे शैक्षणिक उपक्रम व योजना, विद्यार्थ्यांचे अभ्यासान्तर्गत व अभ्यासेतर कला–क्रीडा क्षेत्रातील प्राविण्य, महाविद्यालयाचा इतर सामाजिक नि सांस्कृतिक क्षेत्रातील सहभाग व उपलब्धी यांच्या गौरवास्पद उल्लेखाबरोबरच संस्कारक्षम व संवेदनाशील युवक–युवतींच्या मनातील वैचारिक व भावनात्मक स्पंदनांचा उत्फूर्त साहित्याविष्कार यांचे समग्र दर्शन या अंकात आपणास घडेल.

**संकल्पपूर्ती**

गेल्या वर्षी 'द्विदशकपूर्ती' च्या निमित्ताने काही संकल्प केले होते. काही नवे उपक्रम व योजना आखल्या होत्या. त्यातील बहुतांश योजना मार्गी लागल्या याचा आम्हाला विशेष आनंद वाटतो. संस्थेच्या 'अनेकान्त मुद्रणालया' च्या कार्याला सुरुवात झाली आहे. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन यांकडे लक्ष पुरवून परिसराच्या सौंदर्यामध्ये विशेष भर पडली. आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येबरोबरच अध्यापनासाठी नव्या वर्गांची, खोल्यांची, आवश्यकता ५–६ वर्षांपासूनच तीव्रतेने जाणवत होती. यावर्षी नव्या वर्गांसाठी खोल्या बांधण्याच्या कामाला प्रारंभ झाला आहे. 'प्राचार्य निवास' व वसतिगृहाच्या अधीक्षकासाठी निवासस्थान यांच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे.

**पुनर्रचित अभ्यासक्रम**

पुणे विद्यापीठाने स्वीकृत केलेल्या पुनर्रचित अभ्यासक्रमाचा पथदर्शक–प्रकल्प शास्त्र शाखेतील प्रथम-वर्षाच्या विद्यार्थ्यासाठी राबविण्यात आला व एका महत्त्वपूर्ण शैक्षणिक प्रयोगाचा दृढ पाया घालण्यात आला. अमर्याद विद्यार्थी संख्या व मर्यादित साधनसामुग्री यांचा सुमेळ जमणे बरेच कठिण, पण प्रयत्न साध्य आहे. विज्ञान कार्यशाळा, रोपवाटिका, राष्ट्रीय सेवा योजना यातून विद्यार्थ्यांच्या नव्या जाणीवा विकसित होत असल्याचे मात्र या प्रकल्पाशी सबंधित प्राध्या-पकांच्या निश्चितच अनुभवास येत आहे. हे या प्रयोगाच्या सफलतेच्या दृष्टीने सुचिन्हच म्हणावे लागेल. या वर्षीचे एकूण कार्य पाहून कुलगुरू डॉ. राम ताकवले, डॉ. एम्. आर्. भिडे व प्राचार्य डी. डी. वाणी यांच्या समितीने अत्यंत समाधान प्रकट केले व आम्हाला पुढील वर्षापासून आर्टस् व कॉमर्स विभागातील प्रथम वर्षाच्या वर्गांसाठी ही योजना कार्यान्वित करण्यास अनुमती दिली. नव्या उत्साहाने या प्रकल्पाच्या सिध्दी-साठी आम्ही आता सज्ज आहोत.

**नवी उपलब्धी :**

**प्राचार्यांची कार्यकारिणीवर निवड**

आमचे प्राचार्य डॉ. जे. के. गोधा यांची पुणे विद्यापीठ कार्यकारिणीवर प्रचंड बहुमताने निवड झाली ही घटना संस्था, महाविद्यालय, विद्यार्थी या सर्वांच्याच दृष्टीने अत्यंत अभिमानास्पद आहे. वीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर आमच्या महाविद्यालयाला विद्यापीठाच्या सर्वोच्च अधिकार मंडळावर स्थान मिळत आहे. शैक्षणिक जगतातील प्राचार्यांच्या कर्तृ--त्वाची जाणकारांनी घेतलेली दखल व त्यांचा प्रचंड लोकसंग्रह यामुळेच त्यांना हे यश मिळाले. वाणिज्य शाखाप्रमुख, विविध समित्यांचे प्रमुखपद या अनेकविध क्षेत्रातील आपल्या अनुभवसमृध्दतेचा लाभ आता विद्यापीठ व्यवस्थापन यंत्रणेला मिळणार आहे. त्यांच्या कर्तृत्वाला असेच नवे नवे क्षेत्र उपलब्ध होवो, हीच आमची हार्दिक भावना !

**आंतरविद्यापिठीय खो खो स्पर्धा**

क्रीडाक्षेत्रामध्ये आमच्या महाविद्यालयाच्या खेळाडूंनी एक उज्ज्वल परंपरा निर्माण केली आहे. विविध स्पर्धांचे अनेक स्तरांवर संयोजन करण्यात एक विशिष्ट नाव-लौकिकही आम्ही आजवर संपादन केला आहे. यावर्षी अखिल भारतीय स्तरावरील आंतरविद्यापीठीय मुलींच्या खो खो स्पर्धांचे यशस्वी संयोजन करून आम्ही आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. ही एक नवी उपलब्धी म्हणावी लागेल.

पंजाब पतियाळा पासून बंगलोर–कोट्टायम पर्यंतच्या ३१ विद्यापीठांच्या संघांनी या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. बारामतीतील अनेक सेवाभावी संस्थांनी अनेक पारितोषिके देऊन भरघोस प्रोत्साहन दिले, वीस हजार क्रीडाप्रेमी रसिकांनी या स्पर्धांना उपस्थित राहून पाहुण्या खेळांडूंचे मनसोक्त कौतुक केले तर त्यानिमित्त प्रकाशित केलेल्या ‘स्मरणिके’ साठी साहाय्य करून भारतीय खेळासंबंधी व संस्थेसंबंधी अनेक उदारधींनी जी आत्मीयता व्यक्त केली, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्या साठी खरोखरच शब्द अपुरे पडतील. प्राचार्यांचे कुशल नेतृत्व आणि सहकारी प्राध्यापक व सेवकवर्ग यांच्या ‘सांघिक वृत्ती’ चा एक आगळा अविष्कार सर्वांना पहा-वयाला मिळाला.

आंतर विद्यापीठ व आंतर विभागीय स्तरांवरील अनेक स्पर्धातून ज्या आमच्या खेळाडूंनी विशेष प्राविण्य दाखविले त्यांचे मनसोक्त कौतुक करण्यात आम्हाला विशेष आनंद वाटतो.

**विद्यापीठ अनुदान मंडळाकडून निवड**

आमच्या महाविद्यालयाची उपक्रमशीलता, प्रशासकीय शिस्त व कार्य करण्याची जिद्द यांची नोंद दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान मंडळानेही घेतली आहे. इन्सॅट बी-१ वरून प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमांचे विश्लेषण व मूल्यमापन करण्यासाठी महा-राष्ट्रातून निवडलेल्या ३ महाविद्यालयांमध्ये आमच्या महाविद्यालयाला एक केंद्र मिळाले आहे. आता नव्यानव्या वैज्ञानिक संशोधानांची अद्ययावत् माहिती व शैक्षणिकदृष्ट्या त्यांची उपयुक्त प्रात्यक्षिके यांचा प्रत्यक्ष लाभ आमच्या विद्यार्थ्यांना व जिज्ञासू नागरि-कांना मिळणार आहे. संस्थेच्या सामाजिक उपयुक्ततेत भर पडली याचा व विद्यापीठ अनुदान मंडळाने अत्यंत विश्वासाने आमच्यावर नवी जबाबदारी सोपविली याचा आम्हाला विशेष अभिमान वाटतो.

**सामाजिक उत्तरदायित्व**

विद्यार्थ्यांना केवळ पदवी मिळवून देणे एवढेच महाविद्यालयाचे कार्य नाही. ते त्या त्या भागातील एक सामाजिक व सांस्कृतिक केंद्रच असले पाहिजे. समाजाच्या गरजा लक्षात घेऊन विविध उपक्रम कार्यवाहीत आणणे हे महाविद्यालयाचे आवश्यक उत्तरदायित्व आहे. त्या दृष्टीने वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाकडून संयुक्तपणे आयोजित केलेले **‘दुग्धव्यवसाया’ वरील चर्चासत्र** अत्यंत लक्षणीय असेच होते. दुग्धव्यावसायिक, त्या क्षेत्रातील तज्ज्ञ अधिकारी व संशोधक अशा १०० व्यक्तींनी यात भाग घेतला होता. त्याचप्रमाणे यावर्षी ‘उद्योजकता विकास कार्यक्रम’ हा नवा विभाग सुरू करून स्वयंरोजगाराची विविध क्षेत्रे व लघुउद्योग या-संबंधी दोन दिवसांचे **‘उद्योजकता शिबिर’** आयोजित-करून या महाविद्यालयाला विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यात किती रस आहे हे आम्ही दाखवून दिले. याशिवाय ‘राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना’ ‘राष्ट्रीय सेवा योजना’ ‘निरंतर शिक्षण केन्द्र’ ‘महाविद्यालय शाळा समूह योजना’ अशा विविध योजनांच्या द्वारा आम्ही उद्याची तरुण पिढी व सामाजिक पुनर्रचना यांच्यामध्ये सेतूबंधनाची महत्वपूर्ण भूमिका पार पाडण्यात सहभागी होत आहोत.

**स्वातंत्र्यवीर सावरकर जन्मशताब्दी**

यावर्षी भरतात सर्वत्र स्वातंत्र्यवीर सावरकरांची जन्मशतब्दी साजरी होत आहे. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी व आत्मसमर्पणाची सिध्दता करणारा महान् देशभक्त व राष्ट्रोध्दारासाठी आमरण तळमळणारा द्रष्टा समाज-सुधारक या नात्यांनी त्यांच्या कार्याचे पुनर्दर्शन नव्या पिढीला खचितच प्रेरणादायी ठरेल ! आजच्या अशांत व तणावपूर्ण राजकीय व सामाजिक स्थितीत सर्वार्थांनी किंकर्तव्यविमूढ बनलेल्या नवपिढीमध्ये खरी राष्ट्रनिष्ठा, उदात्त चारित्र्य व विज्ञानाधिष्ठित जीवनदृष्टी यांचा आदर्श फक्त स्वा. सावरकरच ठरू शकतील. यानिमित्ताने आमची विनम्र आदरांजली !

**प्राचार्य जी. के. पाटील सत्कार**

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे भूतपूर्व सेक्रेटरी व गव्हर्निंग कौंसिलचे सभासद प्राचार्य जी. के पाटील यांच्या ७१ व्या वाढदिवशी, त्यांनी आजवर केलेल्या समाजसेवेच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सांगली येथे भव्य सत्कार–समारंभ आयोजित करण्यात आला. संस्थेच्या निर्मितीपासून तिच्या उभारणीत त्यांचा अत्यंत मोलाचा वाटा आहे. शैक्षणिक क्षेत्रातून निवृत्त झाल्यावर ‘प्रगति आणि जिनविजय’ च्या संपादनाच्या माध्यमातून समाजाला समयोचित प्रागतिक नवे विचार देण्यात त्यांची लेखणी सतत जागरूक असते. त्यांच्या चैतन्यदायी मार्गदर्शनाची आज समाजाला अत्यंत आवश्यकता आहे. याप्रसंगी त्यांना उदंड आयुष्य व शारीरिक स्वाथ्य लाभो हीच हार्दिक शुभेच्छा.

**ऋणनिर्देश**

गेल्या बावीस वर्षात महाविद्यालयाने प्रगतीचा नेत्रदीपक टप्पा गाठला आहे. महाविद्यालयाची रौप्य महोत्सवाच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरु आहे. स्थानीय शासकीय अधिकारी, नगरपरिषद, जिल्हापरि-षद, तालुका पंचायत यांचे पदाधिकारी, परिसरातील सहकारी साखर कारखान्यांचे पदाधिकारी व संचालक, औद्योगिक व व्यापारी क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक व संस्था, समाजसेवी संस्था व कार्यकर्ते, स्थानिक शाळांचे मुख्याध्यापक, माजी विद्यर्थी व अनेक ज्ञातअज्ञात हित-चिंतक यांच्या हार्दिक सहकार्याचा आमच्या यशात मह-त्वाचा वाटा आहे. त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत. कोणत्याही शैक्षणिक वा विस्तार विषयक नवनव्या उपक्रमांना व योजनांना हार्दिक पाठिंबा देऊन शैक्षणिक कार्यात विशेष आस्था बाळगणारे अनेकान्त शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठीच सतत कार्यरत राहणारे आमचे कर्णधार प्राचार्य, त्यांचे कार्यतत्पर सहकारी व सेवकवर्ग या सर्वांच्या समन्वित प्रयत्नांचाही आवर्जून उल्लेख करावा लागेल.

**भावी योजना**

पुढील दोन वर्षाच्या कालावधीत स्वतंत्र जिम्नॅ-शियमची इमारत, राष्ट्रीय छात्रसेनेसाठी कार्यालय, बँक ऑफ महाराष्ट्रच्या विस्तारित शाखेसाठी स्वतंत्र इमारत या वास्तूंची भर पडणार आहे. या वास्तूंचे आराखडे तयार असून त्याला विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मंजुरीही मिळाली आहे. रौप्य महोत्सवी वर्षात सर्वच दृष्टीने या कामाची पूर्तता होईल असा विश्वास वाटतो.

**वाङ्मयीन अंतरंग**

आमच्या महाविद्यालयाचे ७० ते ८० टक्के विद्यार्थी ग्रामीण भागातील असतात. समाजाच्या विविध स्तरा-तील विद्यार्थ्यांच्या जीवनातील आशयसंपन्न अनु-भवांना अभिव्यक्त करण्यासाठी ‘अनेकान्त’ चे व्यास-पीठ त्यांना मुक्तपणे वापरता यावे यादृष्टीने आम्ही या वर्षी वादविवाद मंडळ व नियतकालिक विभाग, यांच्या वतीने संयुक्तपणे ‘कथा–कविता–लेख स्पर्धा’ अयोजित केली होती व त्यासाठी भरघोस पारितोषिके ठेवली होती. पण आमचा अनुभव मात्र याबाबतीत अगदीच निराशाजनक आहे. प्रतिवर्षाप्रमाणे वारंवार आवाहन करूनही म्हणावे त्याप्रमाणात साहित्य विद्यार्थ्यांकडून आले नाही. यावर्षी वैचारिक व ललित अशा स्वरूपाचे निबंध व लेख अगदीच मोजके आले. कथा–कवितांचे प्रमाण समाधानकारक वाटले. पण खंत याची वाटते की या सर्व प्रकारच्या साहित्यात मनाला चटका लावारे, अस्वस्थ करून सोडणारे बुद्धीला आवाहन करणारे असे साहित्य अभावानेच आढळले. आमच्या साहित्यिक विद्यार्थी मित्रांकडे अनुभवांची कम-तरता नाही पण त्याकडे डोळसपणे पाहण्याची कला मात्र साधली पाहिजे. त्यासाठी अनुभव शब्दात आकर्षकपणे सांगण्याचा सातत्याने सराव करावा लागेल. नव्या वैज्ञानिक दृष्टिकोणामुळे सामाजिक दुष्ट, क्रूर रूढी व अंधश्रध्दा यांच्या विषयीचा डोळसपणा प्रतिबिंबित होणाऱ्या कथांना आम्ही आवर्जून स्थान दिले आहे. केवळ स्पर्धेसाठी किंवा प्रसिध्दीच्या हौसेने लिहिण्यापेक्षा आपल्या अनुभवांना बोलते करण्याचे भान सतत ठेवण्याचा सल्ला या मित्रांना देण्याचा मोह आवरत नाही. ज्यांचे साहित्य जागेअभावी प्रसिध्द होऊ शकले नाही त्यांनी प्रयत्न सोडू नये. ‘दिसामासी काही तरी लिहावे’ हा समर्थांचा उपदेश ध्यानी ठेवावा. सर्व साहित्य-प्रेमी उदयोन्मुख लेखक-कवी विद्यार्थ्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

**जडण घडण**

मुखपृष्ठ, जाहिराती, संपादन व मुद्रण या सर्वच बाबतीत नेहमीप्रमाणे नेटकेपणाची दृष्टी ठेवली आहे.

जीवनविषयक काही आशय व्यक्त करणारे मुखपृष्ठ देण्याची आपली परंपरा या वर्षीही पुढे चालू ठेवली आहे. दोन विरोधी रंगांचा संतुलित उपयोग करून सौंदर्याकृती निर्माण केली आहे, ‘अनेकान्तमयी’ जीवनदृष्टीचेही तेच मर्म आहे. यावर्षीचे अनुचिंतनही याच विचारसूत्रावर आधारित आहे. प्रतिवर्षाप्रमाणे एम्. ई. एस्. प्रशालेतील चित्रकला शिक्षक श्री. वेदपाठक यांचे मार्गदर्शन आम्हला मिळाले आहे. सहकार्याबदल त्यांचे हार्दिक आभार.

संपादनाच्या कामातही प्राचार्यांचे आत्मीय मार्गदर्शन व संपादक मंडळातील सहकारी प्राध्यापकांचे सर्वतोपरी सहकार्य लाभले. म्हणूनच या अंकाला हे रूप प्राप्त होऊ शकले. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

**मुद्रण**

हा अंक आमच्याच संस्थेद्वारा संचालित ‘अनेकान्त मुद्रणालया’ त छापून तयार झाला आहे, याचा आम्हाला विशेष अभिमान वाटतो. निराधार स्त्रिया व अपंगांना अर्थार्जनासाठी सोय उपलब्ध करण्याच्या उद्दे-शाने सुरू केलेल्या या मुद्रणालयात पुरेसे तज्ञ कामगार नसतानाही शिकाऊ स्त्रिया व मुलींन्या कडून उत्कृष्ट छपाई करून दिल्याबद्दल मुद्रणालयाचे व्यवस्थापन व कर्मचारी यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. आतील ब्लॉक्सची छपाई या वर्षीही पुण्याच्या के. जोशी यांनी ऑफसेट पद्धतीने केली आहे. हा नवा प्रयोग आहे. पण त्यामुळे या अंकाच्या आकर्षकपणात निश्चित भर पडलेली आपणास जाणवेल.

या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

* * *

## अनुचिंतन

अनेकान्त हे समग्रतेचं व्यापक व पूर्णग्राही 'दर्शन' आहे, आणि हे दर्शन व्यक्त करणारी वाणी अनेकान्तमयी असते असं गत वर्षीच्या अंकात म्हटलं आहे.

आता ही वाणी अनेकान्तमयी कशी असते हे आपण समजून घेऊ या.

वस्तुस्वरूप अनेक गुणधर्मांनी युक्त असते. आपण आपल्या ज्ञानशक्तीने तिचे पूर्ण रूप ग्रहण करण्याचा प्रयत्न करीत असतो. पण आपण जे ग्रहण केले आहे ते जसेच्या तसे समग्रतेने शब्दांच्या द्वारे व्यक्त करू शकत नाही. अशा वेळी वस्तूंच्या एखाद्या धर्माला आपण प्राधान्य देतो आणि त्याला अनुसरून आपण त्या वस्तू-विषयीचे विधान करतो. अर्थात अशा विधानामध्ये पूर्ण सत्य नसते. तर अंशात्मक सत्य असते. आणि ती अंशात्मक सत्यता बोलणाऱ्याच्या अभिप्रायावर, संदर्भा-वर अवलंबून असते.

पण हे लक्षात न घेता त्या अंशात्मक सत्याला पूर्ण सत्य मानण्याचा आग्रह धरला कि विसंवाद निर्माण होतो. वाद सुरू होतो. एवढेच नव्हे तर, विविध पंथ उप-पंथही त्या आधारे निर्माण होतात. कोणी वस्तू सत्स्वरूप आहे असा आग्रह धरतो. तर कोणी असत्स्वरूप आहे असं विरोधी मत मांडतो. कोणी वस्तू नित्य मानतं, तर कोणी अनित्य. कोणी वस्तू अनेक रूपात्मक आहे असं म्हणतं, तर कोणी ती एकच आहे असं म्हणतं. आणि प्रत्येकजण 'हे असंच आहे' असा आग्रह धरतो. या मुळेच वाद–विसंवाद निर्माण होतात.

अशा या परस्पर विरोधी वाटणाऱ्या विधानांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न अनेकान्तमयी वाणी करीत असते त्या साठी अनेकान्त वादाने 'नय' ही संकल्पना योजली आहे

वस्तूच्या अंशात्मक स्वरूप कथनाला 'नय' म्हटले आहे. त्याचप्रमणे वक्त्याच्या अभिप्रायालाही 'नय' म्हटले. प्रत्येक 'नय वाक्य' वस्तूच्या एकाच धर्माचे वर्णन करीत असते. पण वस्तू तर अनेक धर्मांनी युक्त असते म्हणून प्रत्येक नय वाक्य हे सापेक्ष असते.

प्रत्येक वस्तू उत्पाद, व्यय व ध्रौव्य या गुणांनी युक्त असते. आणि म्हणून ती नित्य असते हे विधानही बरोबर आहे. पण ते फक्त ध्रुवतेच्या अपेक्षेने. तसेच ती अनित्य असते हेही बरोबर आहे. पण तेही केवळ व्ययाच्या अपेक्षेने. तेव्हा महत्व आहे ते ही सापेक्षता लक्षात घेण्याला. आणि अशा सापेक्ष नयांच्या समूहाला अनेकान्त म्हटले जाते. पण जेव्हा वस्तूंच्या एकाच गुण-धर्माचा आग्रह धराला जातो. आणि तिच्या ठायी असलेल्या इतर धर्मांचा निषेध व विरोध केला जातो तेव्हा ते विधान 'दुर्नय' बनते. मिथ्या ठरते.

या 'नय' संकल्पनेबरोबरच अनेकान्त वादाने 'स्यात्' संकल्पनाही मांडली आहे. या पदाने प्रत्येक विधानाची विशिष्ट सापेक्षता अधोरेखित केली जाते. 'स्यात्' म्हणजे विशिष्ट अपेक्षेने. पण कोणी त्याचा अर्थ 'कदाचित' असा मानून अनेकान्तवाद म्हणजे संशयावाद आहे. अशी समजूत करून घेतात, पण ते चुकीचे आहे. उलट अनेकान्तवाद हा सर्व संशय दूर करून, प्रत्येक विधाना-तील विशिष्ट अभिप्रायानुसार असलेला सत्यांश पाहण्याची निर्मल व अनाग्रही दृष्टी देतो.

'सात आंधळे आणि हत्ती' ही कथा तर सर्वांना परिचित आहेच. प्रत्येक आंधळा आपापल्या परीने बरोबर आहे. पण हे आकलन कोणाचे असते? प्रत्येक आंधळा तर आपल्या स्वतःच्याच मताचा आग्रह धरीत असतो. पण ज्याने संपूर्ण हत्ती पाहिला आहे आणि त्याचबरोबर ज्याने आंधळ्याचे आंधळेपणही पाहिले आहे, तसेच प्रत्येक आंधळ्याचा वेगळा संदर्भही समजून घेतला आहे अशा 'डोळसाला' च प्रत्येकाच्या विधानातील सत्यांशाचे आकलन होऊ शकते.

अनेकान्त ही अशी डोळस व समन्वयवादी प्रवृत्ती आहे.

## हार्दिक अभिनंदन



**प्राचार्य डॉ. जे. के. गोधा**

पुणे विद्यापीठ कार्यकारिणीवर निवड



**प्राचार्य जी. के. पाटील**

७१ वर्षांचे कृतार्थ जीवन-यापन !



प्रा. ए. एस्. किणींगे
राष्ट्रपतीकडून 'ऑनररी मेजर' पद प्राप्त



प्रा. एम्. व्ही. गोडसे
राष्ट्रीय छात्र सेनेचे नवे प्रमुख



प्रा. डॉ. एन्. एन्. पाटील
वनस्पतीशास्त्र



प्रा. डॉ. ए. एन्. फड
प्राणिशास्त्र

मराठवाडा विद्यापीठाकडून पी. एच्. डी. पदवी प्राप्त





ए. एल्. सातपुते
बी. ए



एस. सी. दारूवाला
बी. एस्सी.



आर. एस देशपांडे
बी. कॉम.



कु. शोभा कुलकर्णी
सौ. जोशी, एम्. ए



एम. एम. जाधव
एम्. कॉम.



श्री. श्रीनिवास कुलकर्णी
सायकल इंडस्ट्रीवर प्रबंध



कु. रंजना सरोदे,
एम्. ए.
' दक्षिणा फेलो '



कु. सुप्रिया चाफेकर,
बी. ई. (Civil)
महाविद्यालयाची पहिली
इंजिनिअर



श्री. पी. ई. जगदाळे
विद्यापीठात वनस्पती
शास्त्र विषयात प्रथम
'प्राचार्य शेवडे पारितोषिक'



स्व. श्री. गांलिंदे विश्वनाथ मारुती

वसतिगृहासाठी औदार्यपूर्ण भूमीदान

## राष्ट्रीय छात्रसेना



बी. एस. भोसले
सिनि. अंडर ऑफिसर



एन. व्ही. शहा
ज्यु. अंडर ऑफिसर



एस. एस. जोगळेकर
ज्युनि. अंडर ऑफिसर



डी. एस. कले
सी. एच. एम.

## राष्ट्रीय सेवा योजना



प्रोग्रॅम ऑफिसर
व गटप्रमुख

# वंदे मातरम् !

**कु. संजीवनी मा. शहा**
तृतीय वर्ष, वाणिज्य

वंदे मातरम् ! वंदे मातरम् ! ! भारतमाता की जय ! ! ! हजारो कंठातून जयघोष बाहेर पडत होता. जिकडे पहावे तिकडे जनसागर पसरलेला होता. सर्वांची मनं प्रफुल्लित झाली होती. सगळीकडे उत्साहाला उधाण आले होते. मी देखील त्या जन-सागरातील एक थेंब होते. माझ्याही कंठातून नकळत घोष बाहेर पडत होते— 'वंदे मातरम् !'

माझ्यासारख्या स्वतंत्र भारतात जन्मलेल्या नव-पीढीला पुनः एकदा 'वंदे मातरम्' या जादूमयी घोषवाक्याच्या सामर्थ्याची प्रचीती घडून येत होती. केवळ 'वंदे मातरम्' आणि 'भारतमाता की जय !' या दोनच वाक्यांच्या उद्घोषात भारतमातेच्या प्रतिमे-सह गंगाजलाचा कुंभ वाहणारा रथ आमच्या गावातून प्रत्येक तरुण–वृध्द स्त्री–पुरुषांच्या मनात नवचैतन्य फुलवीत चालला होता. माझेही मन भूतकाळातील 'वंदे मातरम्' च्या मंत्राने भारलेल्या क्रांतिकारक देश-भक्तांच्या आत्मयज्ञाची उज्ज्वल कथाचित्रे रंगविण्यात गढून गेले होते. दोनच शब्द ! पण स्वातंत्र्याचा महामंत्र बनून भारतमातेला गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त करणाऱ्या या शब्दांची जादूच काही और होती ! हे सारे मी मनातल्या मनात साक्षात् अनुभवत होते. हळूहळू जेव्हा भूतकाळातून मनाचा रथ वर्तमानाच्या पथावरून जाऊ लागला तेव्हा मात्र नव्या काळाचे एक नवेच भान व 'वंदे मातरम्' ची नवी जाण माझ्या मनात जागृत होऊ लागली.

वंदे मातरम् ! ज्या भूमीत मी जन्मले त्या माझ्या भूमातेला माझा नमस्कार ! किती सरळ आणि सोपा अर्थ, तितकाच गहन आणि गूढ !

माता ! जन्म देणारी ती माता ! मग पुनः ही भूमाता का ? जन्म देणाऱ्यापेक्षा पालनपोषण करणा-ऱ्याचा पाल्यावर जास्त अधिकार असतो. माता जन्म देते आणि भूमाता अंगाखांद्यावर खेळवून, शरीरधारणे-साठी आवश्यक रस-सत्वे देऊन आपलं पालन पोषण करते. म्हणून ती भूमाता ! कुंतीने कर्णाला जन्म दिला म्हणून ती कर्णाची माता आणि राधेने कर्णाला पालन-पोषण करून वाढविले म्हणून ती माता, तद्वतच भूमातेच्या आपणावर असलेल्या अगणित उपकारांची जाणीव म्हणून 'वंदे मातरम् !' प्राचीन काळापासून आपल्या भारतीय संस्कृतीतील अविभाज्य नि परमा-दरणीय असे जीवनसूत्र 'मातृदेवो भव' हेच नाही का ?

स्वातंत्र्य मिळून ३०–३५ वर्षे झाली पण आज असे वातावरण जाणवते की काही अतिरेकी अविचारी भारती-यांना आम्ही 'वंदे मातरम्' म्हणणार नाही असे उच्चर-वाने सांगताना आपण 'मातृद्रोह' करीत आहोत असे वाटतच नाही. अशावेळी भविष्यात घडणाऱ्या घटनांच्या शंकेने मन व्याकुळ होऊन जाते. भारतीय हिंदू संस्कृती जी आज परराष्ट्रांमध्ये– इंग्लंड, अमेरिका, रशिया सारख्या देशांमधील प्रगतिशील विज्ञानावर आरूढ झालेल्या लोकांमध्ये–जोमाने फोफावत आहे, ती हिन्दू-स्थानातून लोप पावेल की काय ? अशी परिस्थिती निर्माण होण्याचा धोका दुर्लक्षून कसा चालेल ? आज धर्मभावनेला सत्तारूढ आणि विरोधी पक्षीयांच्या हातातील बाहुल्यांचे क्षुद्ररूप प्राप्त झाले आहे. निवड-णुकीचा नोक-झोक लक्षात घेऊन त्या भावनेचा उपयोग सर्रास केला जात आहे. बंधुत्वाच्या नात्याने वावर-णाऱ्या शेजाऱ्यांमध्ये राजकीय स्वार्थापोटी द्वेषभावना पेरून मानवतेला व एकराष्ट्रीयत्वालाच सुरुंग लावला

जात आहे. हिन्दूधर्मसंस्कृती टिकण तर लांबच राहो, परंतु हिन्दुस्थानात हिन्दूंना हिन्दू म्हणून मिरवणे मुश्किल झाले आहे.

अशा परिस्थितीमध्ये ही गगनभेदी घोषणा आणि हरिजन – गिरिजन, सवर्ण–दलित हा भेदभाव विसरून एकत्र आलेला विराट जनसमुदाय पाहून पुन: एकदा माझ्या उल्हसित मनाने ग्वाही दिली की भारतात निधर्मी राज्य असले तरी आमचा राष्ट्रधर्म मात्र सूर्याच्या तेजाप्रमाणे तेजस्वी, गंगाजलाप्रमाणे निर्मल आणि लक्षावधी लोकांच्या उत्साहाप्रमाणे आनंद प्रेरित करणारा असाच राहील. हा राष्ट्रधर्मच भारतात राहणाऱ्या सर्व भारतीयांचा धर्म. म्हणून भारतीयांच्या या मातेला नमस्कार ! म्हणजेच 'वंदे मातरम् !'

ही रथयात्रा निघाल्यास कायदा व सुरक्षा– यंत्रणा मोडकळीस येईल, दंगेधोपे होतील जातीय दंगे उद्‌भवतील अशी अशुभ, आततायी, अविचारी भविष्यवाणी करून या उपक्रमास गालबोट लावण्याचा प्रयत्नही काही कमी लोकांनी केला नाही. पण त्या कशाचाच परिणाम न होता भारतमातेची ही एकात्मतारथयात्रा निर्विघ्नपणे आसेतूहिमाचल मार्गक्रमण करीत पार पडली. मला वाटते, कोट्यावधी भारतीयांच्या मरगळलेल्या मनामध्ये नवचैतन्य निर्माण करून त्यास राष्ट्रनिर्मितीसाठी स्वार्थत्यागास सदैव सिध्द राहण्याचा 'वंदे मातरम्' हा संजीवनी मंत्रच पुन: एकवार नवपिढीला प्राप्त झाला.

आता भारताला 'वंदे मातरम्' या मंत्राबरोबर आत्मबलिदान करणाऱ्या नवजवान क्रांतिकारकांची आवश्यकता भासणार नाही. परकीयांशी लढताना ते आवश्यक होतेही. पण आज धर्म– जाती – संप्रदाय, यांच्या फाजिल अभिमानाने प्रेरित होऊन राष्ट्रीयत्वावरच आघात करणाऱ्याबरोबर, जुन्या बुरसटलेल्या धर्म – रूढी – परंपरांना चिकटून विज्ञानाकडून तोंड फिरविणाऱ्याविरुध्द आपल्याला लढा द्यायचा आहे. त्यासाठीच 'वंदे मातरम्' मंत्राची पुन: एकवार नितान्त आवश्यकता वाटते. प्रत्येक मन या गौरवसूक्ताने उन्नत व्हायला हवे. भारतीय संस्कृतीच्या उत्कर्षासाठी प्रत्येकाच मन पेटून उठले पाहिजे. राष्ट्रीय चारित्र्य व सदाचार यांचा पीळ या शब्द घोषाबरोबर प्रत्येकाच्या मनाला पडला पाहिजे. आज आत्मबलिदान नको पण हे नवे आत्मभान मात्र हवेच हवे !

❊ ❊

देशासाठी केलेलं कोणतंही बलिदान पुरेसं नाही, देशासाठी सोसाव्या लागणाऱ्या यातनांची केवढीही तीव्रता असहनीय नाही आणि प्रत्यक्ष मृत्युसुद्धा देशभक्ताला विचलित करू शकत नाही. ज्या देशभक्तांनी स्वातंत्र्यासाठी निर्भयपणे आत्मबलिदान केले आणि ज्यांनी 'वंदे मातरम्' चा घोष करीतच मृत्यूला हसत-गात आलिंगन दिले त्या हुतात्म्यांची अमर नामावली——

१८८३ – वासुदेव बळवंत फडके
१८९७ – चाफेकर बंधू
१९०८ – खुदीराम बोस
१९०९ – कन्हैयालाल दत्त, मदनलाल धिंग्रा
१९१४ – मास्टर अमीरचंद, अवध बिहारी बालमुकुंद (रामराखी), बसंत कुमार
१९१७ – डॉ. अरुण सिंह
१९२७ – रामप्रसाद बिस्मिल, डॉ. रोशन सिंह
१९३४ – सूर्यसेन
१९४३ – आनंदन्, सत्येंद्र बरदान अब्दुल कादिर, फैज
१९४३ – नंदकुमार डे, दुर्गादास राय चौधरी, निरंजन बारुआ, चित्तरंजन मुखर्जी, फणीभूषण चक्रवर्ती, सुनील कुमार, कालिपाद, वीरेन्द्र मोहन मुखर्जी





# स्वयंरोजगार : एक मीमांसा

जहांगीर खान
एम्. ए. ( अर्थशास्त्र )

आपल्या देशापुढील सर्वात मोठा प्रश्न बेकारी हा आहे. या बेकारीस वेळीच आवर घालण्याची नितान्त आवश्यकता आहे. जर बेकारांची संख्या आणखी वाढतच राहिली तर या बेकारांमधील असंतोषाची भावना वाढीस लागून त्याचे काय परिणाम होतील हे सांगता येणे शक्य नाही. कारण सध्या भारतातील लोकसंख्येचे वयानुसार वर्गीकरण केले असता असे दिसून येते की १५ ते ४० वयोगटातील लोकसंख्या अधिक आहे. आणि या बयोगटातील व्यक्तींना सर्व दृष्टिकोनातून स्वावलंबी बनवणे आवश्यक आहे.

## सरकारी धोरण–

देशातील बेकारी कमी करण्याची सरकारवर जितकी जबाबदारी आहे तितकीच किंबहुना त्यापेक्षा अधिक जबाबदारी आपणावर–समाजावर–युवकांवर सुध्दा आहे. याची जाणीव बेकारात निर्माण होणे आवश्यक आहे व त्या जबाबदारीस सामोरे जाण्यासाठी युवकांनी पावले उचलली पाहिजेत. सरकार या कामी सहकार्य करीतच आहे. आपल्या सरकारने स्वयंरोजगारास मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले आहे सरकारची या पाठीमागील भूमिका अशी आहे की जर युवकांनी स्वत:चा एखादा व्यवसाय सुरू केला तर त्याला स्वत:ला रोजगार मिळेल व त्याबरोबरच तो इतर काही जणांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकेल. सरकार सर्व बेकारांना नोकरी पुरवू शकणार नाही. सरकारने आपली रोजगार पुरविण्याची असमर्थता जाणून स्वयंरोजगारास प्रोत्साहन देऊ केले आहे. स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी बेकारी निवारणासाठी स्वयंरोजगाराला आर्थिक प्रोत्साहन मिळावे यासाठी अनेक योजना जाहीर केल्या आहेत. या योजनांद्वारा अशा प्रकारचे स्वयंरोजगार निर्माण करण्यास सुरक्षितता व सोयी सवलती मिळणार आहेत.

## प्रशिक्षण शिबिरे–

सरकारने लघुउद्योग विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळामार्फत ज्यांची स्वयंरोजगार करण्याची इच्छा आहे अशा व्यक्तींना मार्गदर्शन व सोईसवलती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणून या मंडळाकडून वेळोवेळी लघुउद्योजकता प्रशिक्षण शिबिरे भरविली जातात. या शिबिरांचा उद्देश सुशिक्षितांनी नोकरीच्या मागे न लागता स्वयंरोजगार निर्माण करून स्वत:ला आणि स्वत:बरोबर इतरांना रोजगार मिळवून द्यावा हा आहे.

या ठिकाणी खरोखरच ज्यांना सहाय्याची व मार्गदर्शनाची गरज आहे त्यांना ते खऱ्या अर्थाने मिळतेच असे नाही. शिबिरात अधिकारी व जबाबदार लोक भरपूर सहभागी होतात. तेथे भरपूर आश्वासनेही देतात व टाळ्या मिळवतात. या ठिकाणी वैयक्तिक मार्गदर्शन करण्याचे आश्वासन प्रत्येक अधिकारी अगदी आवर्जून व अगत्यपूर्वक देत असतो. पण जेव्हा वैयक्तिक मार्गदर्शनाच्या अपेक्षेने उद्योजक त्यांच्याकडे जातो तेव्हा त्याची कशी अवस्था होते त्याचे वर्णन करण्यापेक्षा खरोखर अनुभवण्यासारखे आहे.

## मार्गदर्शनातील उणिवा–

दुसरे असे की जेव्हा ही शिबिरे भरविली जातात तेव्हा अधिकारी वर्ग माहिती देताना,

मार्गदर्शन करताना व्याख्यान दिल्याप्रमाणे मार्गदर्शन करतात. पण यावेळी प्रत्येकजण आपण व्याख्यान देत नसून चर्चा किंवा हितगुज करीत आहोत हे मात्र आवर्जून सांगतो – येथे अधिकारी व्याख्यान देतात असे मी म्हणतो, कारण जेव्हा हे अधिकारी वर्ग बोलण्यास उभे राहतात तेव्हा समोरील इच्छुक उद्योजकांना कोणती माहिती हवी आहे याचा विचार न करता आपण कोण ? आपल्या संस्थेचे स्वरूप काय ? कर्जाच्या अटी काय आहेत ? कर्ज घेताना तुम्हाला या अटी कशा प्रकारे पूर्ण कराव्या लागतील याचीच फक्त माहिती देत असतात. या अटीच इतक्या असतात की त्या अटीमुळें ९८ टक्के इच्छुक उद्योजक नामोहरम होतात व उद्योजकांना प्रोत्साहन मिळण्याऐवजी उलट अवस्था होते.

### उद्योजकांच्या अपेक्षा–

साधारणतः या उद्योजकांना आपल्या भागात कोणता व्यवसाय चालू शकेल? कोणत्या प्रकारे आपणास उद्योगास सुरवात करता येतील? आवश्यक प्रशिक्षण किंवा माहिती कशी मिळविता येतील ? उद्योगात कोणत्या प्रकारे अडचणी येईल, उत्पादन–घटकांचा पुरवठा कसा उपलब्ध होईल, उत्पादनाला मागणी कशी मिळविता येईल इत्यादी बाबींची माहिती मिळणे आवश्यक असते. याच उद्योजकांच्या खऱ्या अपेक्षा असतात. परंतु दुर्दैवाने याबद्दल काहीही माहिती मिळू शकत नाही.

### स्वयंरोजगार न वाढण्याची कारणे–

स्वयंरोजगाराची कल्पना मूर्त स्वरूप धारण करू शकत नाही याची पुढील कारणे देता येतील:–

१) नोकरी मिळत नाही, इतर काहीच पर्याय नाही म्हणून बरेच उद्योजक उद्योगाकडे वळतात. अशावेळी त्या उद्योगासाठी आवश्यक असलेली प्रेरणा निर्माण होत नाही. नाइलाज म्हणून करावयाचे अशी भूमिका त्यापाठीमागे असते. त्यामुळे त्यांच्यापुढे अडचणींचे डोंगर उभे असतात. अडचण निवारण होऊ शकते किंवा आपण ती नाहीशी करू असा आत्मविश्वास नसतो.



२) सुशिक्षित बेकारात शिक्षणामुळे उच्च राहणीमानाची फक्त सवय लागते पण दुर्दैवाने उच्च विचारसरणीची दृष्टी आत्मसात केली जात नाही. त्यामुळे कष्टाची तयारी नसते. कल्पनेत रमणारे व्यक्तिमत्व तयार होते. सत्याला सामोरे जाण्याची तयारी नसते.

३) शिक्षणाचा उपयोग अडचण निवारणासाठी केला जात नाही तर संभाव्य अडचणीचे रडगाणे तयार करण्यासाठी केला जातो.

४) चित्रपट सृष्टीतील अवास्तव कल्पना पाहून त्याप्रमाणे झटपट काहीतरी चमत्कार व्हावा, आपण धनाढ्य व्हावे अशी दिवास्वप्ने पाहिली जातात पण प्रत्यक्षात वास्तवता भयंकर असते. त्यामुळे ते वास्तवतेला सामोरे जाऊ शकत नाहीत.

५) आजच्या सुशिक्षितात जबाबदारी स्वीकारण्याचे धैर्य नाही. त्यामुळे कमी जबाबदारी असणारे म्हणजे नोकरी सारखे उपजीविकेचे साधन असावे असे त्यांना वाटते.

६) उद्योगासाठी आवश्यक असणारी रक्कम मिळविताना, जर कर्ज घ्यावचे असेल तर त्यापूर्वी भरावी लागणारी रक्कम सुशिक्षित बेकार मिळवू शकत नाहीत.

७) सरकारकडून लघुउद्योगांना साह्य करण्याचे आश्वासन मिळत असले तरी प्रत्यक्षात असे साह्य जेव्हा मागितले जाते तेव्हा ते मिळू शकत नाही. त्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होतात.

८) युवकांना भविष्याबद्दल चिंता वाटत नाही कारण त्याच्यांत जबाबदारीच्या जाणीवेचा अभाव आढळतो.

९) लघुउद्योगांना नामशेष करण्याचा प्रयत्न केला जातो. साधारणतः मोठ्या उद्योगाच्या तुलनेने लघुउद्योगाचा उत्पादन खर्च अधिक असूनही उत्पादन त्या तुलनेने चांगले होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना मागणी मिळू शकत नाही.

अशा रीतीने वरील विविध स्वरूपाच्या कारणांमुळे आपल्या देशात स्वयंरोजगाराच्या प्रमाणात वाढ होऊ शकत नाही व त्यामुळे स्वयंरोजगाराच्या मार्गाने बेकारी कमी करण्याच्या सरकारच्या प्रयत्नाला म्हणावे तितके यश मिळू शकत नाही.



# जीवन–तरंग

**विजयकुमार ज्ञानदेव तेली**
एफ्. वाय. बी ए.

आपल्या या जगात असंख्य प्रकारचे अनेक जीव वावरत आहेत. या जीवांमध्ये सर्वश्रेष्ठ बुद्धिमान असा एकच प्राणी आहे, तो म्हणजे मानव. परमेश्वराने हा मानवी देह कसा बनविला असेल, याची माणसाला काडीमात्र जाणीव नाही. आज जगात मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत आहे. याचे कारण एकच–'अविचारीपणा.' देवाने मानवाला बुद्धी दिली आहे, ती विचार करण्यासाठी. जीवनाचा, जीवनप्रवाहाचा विचार करण्यासाठी. परंतु माणूस त्या बुद्धीचा उपयोग आपला जीवनप्रवाह थांबविण्यासाठी करीत आहे. आत्महत्या करणारा याचा विचार करीत नाही की आपला हा रत्नजडित देह ईश्वराने कशासाठी बनविला आहे ? काय आत्महत्या करण्यासाठी ? दुःखाच्या पिशाच्च्याला भयभीत होऊन मरणाला मिठी मारण्यासाठी ?

जीवन हा सुख-दुःखांनी काठोकाठ भरलेला प्याला आहे. मानवाने हा प्याला अमृताचा प्याला म्हणून ग्रहण करावा, परंतु काही 'अविचारी' लोक त्याला विषाचा प्याला म्हणून लाथाडून देतात आणि तेथेच त्यांच्या जीवनाचा तो हलकासा प्याला सांडतो. त्याचे तुकडे-तुकडे होतात आणि नंतर ते मातीत मिसळून जातात. जीवनात माणसाला सुख-दुःखाचे कडू-गोड अनुभव घ्यावे लागतात. माणसाचे जीवन हे नाण्या प्रमाणे आहे. सुखाच्या पाठीमागे दुःख असते. दुःखा मागे सुख आहे. दोन्हीचाही अनुभव घ्यावा लागतो. आणि या अनुभवानेच माणसाला जगातील अनेक कारच्या ज्ञानाची प्राप्ती होत असते. माणसाच्या जीवनात सुख दुःखाचे ढग येत असतात. ते कोसळत असतात, परंतु जो दुःखाला घाबरतो त्याच्यावरच दुःखांचे ढग जाऊन कोसळतात. कारण त्याला वाटत असते 'देवाने अंधाराला असंख्य चांदण्याची सोबत दिली आहे पण दुःखाला मात्र दुःखाचीच !' जे दुःखाच्या अंधाराला बळी पडतात ते विचार करीत नाहीत की अंधारानंतर प्रकाश आहे. उगवलेला सूर्य मावळणार आहे आणि परत उगवणार आहे.

एखाद्या शांत अशा तळ्यामध्ये खडा टाकल्यानंतर त्या ठिकाणी वलये उठतात आणि ती लगेचच नष्ट होतात. त्याचप्रमाणे या संपूर्ण विश्वाच्या आयुष्याच्या तुलनेने मानवाचे जीवन आहे. माणूस जगायचे म्हणून सुखाला धुंडाळत बसतो, परंतु त्याला माहीत नसते की सुख कोठे आहे ? मानवाच्या सुखासाठी परमेश्वराने सुंदर, मोहक, आकर्षक अशा आल्हाददायक निसर्गाची निर्मिती केली आहे हे माणसाला समजत नाही. खरे सुख हे निसर्गात आहे. निसर्ग आहे तर मानव आहे; नव्हे सर्व जीवसृष्टी आहे !

हिऱ्यांच्या खाणीतून हिरेच बाहेर येतात. त्याप्रमाणे निसर्ग ही एक सुखांची खाण आहे, त्यातून सुखेच बाहेर येतात. सायंकाळच्या वेळी दिसणारा नदी किनारीच्या झाडीतून बुडत असणारा लालबुंद सूर्य, त्याची तांबूस किरणे, त्याचे प्रतिबिंब ... किती सुखकारक वाटते हे दृश्य ! अशा प्रकारच्या अनेक दृश्यांतून निसर्ग आपल्या मनाला भुलवून टाकतो. परंतु माणसाची त्याच्याकडे पाहण्याची दृष्टीच वाईट आहे. आज माणूस निसर्गावर विज्ञानाचा आधार घेऊन हल्ला चढवीत आहे. त्यामुळेच 'आधुनिक युगात' निसर्ग आपल्या मदतीला धावण्यास नकार देत आहे. काही वेळा तो मानवावर सुद्धा हल्ला करीत आहे. ज्वालामुखी, धरणीकंप, पूर आणि अवेळी

पडणारा पाऊस हा त्याचा मानवाविरुद्धचा निषेधच आहे, बंडच आहे.

मानव सुखाच्या शोधार्थ लाखो मैल दूर असणाऱ्या ग्रहावर जात आहे पण त्याला 'सुख' सापडत नाही. सुख हे पृथ्वीवर निसर्गशक्तीमध्ये लपलेले आहे, नव्हे ते तर उघड दिसत आहे. पण मानवाचे डोळे उघडे नाहीत. त्यामुळेच तो जीवनात खरे सुख उपभोगू शकत नाही. शिवाय फक्त डोळे उघडे ठेऊन चालणार नाही तर त्यासाठी आपले हृदय, आपले मन उघडले पाहिजे. त्याच्यातील प्रेम–भावना, कल्पकता, संवेदनशीलता, बुद्धिमत्ता यांची मिटलेली कळी उमललेली असली पाहिजे. तरच तो माणूस निसर्गातील सुखामध्ये न्हाऊन निघेल. नाहीतर तो सतत दुःखाच्या कडक उन्हात तळपत राहील आणि शेवटी त्याचे हृदय आत्महत्येच्या विचाराने करपून जाईल आणि व्यक्तीचाच नव्हे तर साऱ्या माणूस जातीचा नाश ओढवेल.

❊ ❊



**श्रद्धांजली**

श्री. विजयकुमार तेली हे चिंतनशील प्रवृत्तीचे उदयोन्मुख लेखक. त्यांनी कवितांतूनही आपले अनुभव अगदी हळवेपणाने मांडले आहेत. पण कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की दि. ११ मार्च १९८४ रोजी श्री. विजयकुमार तेली यांचे आकस्मिक निधन झाले. साहित्यिक क्षेत्रात त्यांच्याकडून बऱ्याच अपेक्षा होत्या...... पण...... ?

'अनेकांत' कडून त्यांच्या आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली !

---

जीवन ही एक कला आहे आणि मनुष्य आपल्या जीवनाचा कारागीर पण आहे आणि आपल्या कलेचे साधनही आहे. तो स्वतःला ज्याप्रकारे घडवितो त्याचप्रकारे स्वतःला लाभतो. मनुष्य आधी घडवून जन्माला येत नाही हे लक्षात ठेवा. आपण जन्माला येतो तेव्हा न घडविलेल्या दगडाप्रमाणे आपली स्थिती असते. मागाहून ज्या सुंदर वा कुरूप मूर्ती बनविल्या जातात त्यांचे सृजनकर्ते आपणच असतो.

❊

आपल्या प्रत्येक भावामधून, विचारामधून आणि कर्मामधून निर्मितीच होत असते. या सर्वांना समग्रपणे जोडण्यामध्येच आपले अस्तित्व असते. ह्या करिता ज्याला सत्याच्या शिखरावर पोचावयाचे आहे त्याने इकडे लक्ष दिले पाहिजे की जीवनामध्ये वर न नेता खालीच घेऊन जाणाऱ्या धोंड्यांनी त्याने स्वतःला बांधता कामा नये.



# मांड

**तुकाराम पवार**
टी. वाय. बी. ए.

त्या दिवशी मी आत्मारामच्या घरी गेलो, तर आत्माराम डोक्याला हात लावून कोपऱ्यात बसला होता. त्याची बायको सुंदराबाई तिच्या पोरीजवळ, संगीताजवळ बसून रडत होती. मी संगीताजवळ गेलो. अंगाला हात लावून पाहतोय तर अंगात खूप ताप होता. तिच्या अंगाला २–३ जाग्यावर जखमा झाल्या होत्या. ती ४–५ वर्षांची मुलगी इतकं दुःख कसं सहन करणार ? ती सारखी ओरडत होती. तिच्या अंगाखाली अंथरलेली सतरंजी व बाकीचे अंगावरचे कपडे फार घाण झाले होते. अंगाभोवती माशा घोंगावत होत्या. जखमेतून सारखे घाण पाणी वाहत होते. जखमेवर लाल कुंकवासारखे काही तरी लावले होते. मी ताबडतोब मुलीच्या अंगावरचे ते कपडे बदलायला लावले व जखमा स्वच्छ धुण्यास सांगितले. मी आत्मारामजवळ बसलो व काही तरी चांगला मार्ग सांगावा ह्या हेतूने मी त्याला म्हणालो,

"मुलीला दवाखान्यात का हलवत नाहीस ? तू जर तिला लवकर दवाखान्यात हलवलं नाहीस तर आजार वाढेल व कमीजास्त होईल." तेव्हा आत्माराम म्हणाला,

"अवं बापू, ते मोठ्या आईचं आहे. दवाखान्यात नेलं तर जास्तच हुईल. देवी कोपंल अन् त्यामुळं माझ्या साऱ्या घरादाराचं वाटुळं हुईल." यावर मी म्हणालो,

"अरे कसली मोठी आई आणि कसलं काय ? देव मानसाला सुख देतो, असं दुःख देत नाही. पोरीला दवाखान्यात ताबडतोब ॲडमिट केलं तर एका आठवड्यात ती बरी होईल."

मी त्याला खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. तो देव–देव करतच होता. मी मोठी आई काय भानगड आहे म्हणून चौकशी केली. यावर तो म्हणाला,

"गावात मोठ्या आईची साथ आलीय. ती कुणाला पण येते. डाक्टरकडं गेलं तर जास्तच व्हतं. ज्या येळंला मानसाला अंगावर दुखं व्हत्यात, त्या येळंला मोठी आई आली असं म्हणायचं. सकाळी अंघोळ केल्यावर जियं मोठी आई आलीय ती जागा गोमतारानं धुयाची, कुकाचा लेप देयाचा, असं केलं तर आई पावते व आपल्यावरचं संकट टळतं."

"तुला कोणी सांगितलं ?" मी त्याला खडसावून विचारले.

यावर तो म्हणाला की, "आपल्या गावात त्यो बाबू गवळी हाय ना, त्याच्या अंगात मोठ्या आईचं वारं येतं. असं काय झालं की त्याला आपोआप समाजतं. माझ्या पोरीला मोठ्या आया आल्यात हे त्याला मी सांगितलं पण नव्हतं तोच माझ्या घरी आला, पोरीच्या अंगावरची दुखं बघितली आणि म्हणाला, "आत्माराम तुझ्या पोरीला मोठ्या आया आल्यात. लवकर मांड बसव नाहीतर आई रागवंल." मी पण तयार झालू आन बसवली मांड. त्यानंच मला सांगितलंय की दवाखान्यात गेला तर जास्ती हुईल, आई कोपंल. तसंच सिव वलांडायची न्हाई आन् तू जर सिव वलांडली तर वाईट परिणाम व्हत्याल. त्याच्यामुळं माझ्या मनात दवाखान्यात जायचं असून देखील जाता येत नाही. मला आन् तिला कामाला पण जाता येत न्हाई. काम

न्हाई म्हनल्यावर खायाचं काय ? म्हणून सावकाराकडून २०० रुपयाचं कर्ज काढलंय."

त्याची ही शोचनीय अवस्था पाहून मी फार व्याकुळ झालो. मी काहीही न बोलता तसाच घरी निघून आलो. मला लोकांच्या या जीवघेण्या अंधश्रद्धांचं फार वाईट वाटलं. एकीकडे आपल्या सारखाच हाडा-मांसाचा माणूस विज्ञानाच्या साहाय्याने चंद्रावर जाऊन आला, मंगळावर जाऊ पाहतोय, आजपर्यंत कोटयावधी लोकांचे बळी ज्या रोगाने घेतले त्याच्यावर विज्ञानाच्या साहाय्याने मात करून त्याला समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न करतोय आणि एकीकडे हाच मानव अंधश्रद्धांना कवटाळून बसलाय. मूल होत नसेल तर देवाला नवस बोलणं, बळी देणं, थंडी–तापासारखे आजार झाले तर त्याला भुताने झपाटले आहे, असं समजून भुताला कोंबडा नाही तर बकरा द्या, गोठयातील जनावरे जर काही कारणाने मरत असतील तर तुमच्यावर कोणी तरी करणी केली आहे, देवाला बळी द्या. शेतात जर चांगली पिके येत नसतील तर तेथल्या देवांना बळी दिला तर म्हणे चांगली पिके येतात. याच्यासाठी हजारो रुपयांची कर्जें काढली जातात व हीच कर्जें त्यांना आयुष्यभर फेडावी लागतात. आपल्याला देवानेच मुलं दिली आहेत, मग कितीही मुले झाली तर ह्या लोकांना त्याची फिकीर नसते. त्यांचे पालन–पोषण करा, शिक्षण द्या, लग्न करा, त्यांचा संसार उभा करा. ह्यातच माणूस आपले सर्व आयुष्य खर्च करतो. यातून त्याला कवडीचं पण सुख मिळत नाही. यातून त्याला कधीच यश मिळत नाही. गरीब तो गरीबच राहतो. आणि मग म्हणतो कसा, 'माझ्या नशिबातच नव्हतं, माझं नशीबच चांगलं नाही, माझ्या मागे साडेसातीचा फेरा लागलाय." अशी ही माणसं पळवाट काढतात. सर्व भार देवावर टाकून ओरडत बसतात. प्रत्येकाने जर या खुळचा समजुती सोडून प्रामाणिकपणे भरपूर काम केलं, तर मला वाटते की, काही वर्षांच्या आतच गरिबी पळून जाईल. आपलं नशीब कसं घडवायचं ते ज्याच्या त्याच्या हातात आहे. देव तुमचं काहीच बरंवाईट करू शकत नाही.

हे अंधश्रद्धेचं फॅड फक्त अशिक्षित लोकांमध्येच आहे असं नाही तर सुशिक्षित लोकांमध्ये सुद्धा त्याचं प्रमाण भरपूर आहे. आठवडयात जे सात वार आहेत, त्यापैकी घरातील प्रत्येक व्यक्ती कोणता तरी एक वार धरते. कारण कोणाला वार धरल्यामुळे देव प्रमोशन देणार असतो, तर कोणाचे लवकर लग्न होऊन चांगला पती किंवा पत्नी मिळणार असते, कोणाला देव पास करणार असतो, तर कोणाचे आयुष्य वाढवणार असतो. निव्वळ वेंधळेपणा आहे हा. तुम्ही जर भरपूर अभ्यास केलात, प्रामाणिकपणे कष्ट केलेत, सहनशीलता दाखविलीत, चांगले वागलात तर ह्या गोष्टी तुम्हाला आपोआप मिळतील. तेथे देवाची काय गरज आहे ?

ह्या गोष्टी मी अगदी जवळून पाहिल्या आहेत. गेली तीन वर्षे मी राष्ट्रीय सेवा योजनेत आहे. त्यात ग्रामीण भागात काम करताना मला अनेक प्रकारचे लोक भेटतात. त्यांचे आचार–विचार, रूढी, परंपरा ह्या मी जवळून पाहिल्या आहेत. त्यांच्याशी अंधश्रद्धेवर तासन्-तास बोललोय. मला वाईट वाटते ते सुशिक्षित लोकांचं. देव कल्पनेचे भूत त्यांच्याही मानगुटीवर सतत आरूढ झालेले असते. देव खरोखरच आहे का ? का हे फॅड आहे ? जगात ज्या रोज घडामोडी होतात त्या आपल्यासारख्याच हाडामांसाच्या माणसामुळे होतात की देवामुळे होतात ? याचा विचार कोणीही करीत नाही. तुम्ही काम न करता फक्त देव–देव करतच बसला तर तुमचं आयुष्यात कधीही चांगलं होणार नाही. भीकच मागावी लागेल. आज अमेरिका आणि रशिया चंद्रावर हक्क कोणाचा यासाठी भांडतात आणि आपण मात्र ज्योतिषाकडे जातो अन् विचारतो काय, तर मला नोकरी मिळेल का ? तुम्ही सुशिक्षित लोकांनीच जर असं केलं तर अशिक्षित लोकांनी काय करायचं ? त्यांना कसं समजून सांगायचं ? आणि कुणी सांगायचं ?

त्या दिवशी दिवसभर माझं कोणत्याच कामात लक्ष लागलं नाही. कारण संपूर्ण गावात एक सुद्धा व्यक्ती माझ्या बाजूने बोलली नाही. जो–तो मोठया आईचंच समर्थन करत होता. आपण जर देवाविरुद्ध बोलली तर आपल्यावर आई कोपेल व त्याचे वाईट परिणाम आपल्याला भोगावे लागतील ही भीती त्यांच्या बोलण्यातून मला प्रकर्षाने जाणवली. मी निश्चय केला की आज आपण रामूबरोबर आत्माराम गावडयाच्या घरी जायचंच.

रात्री मी आणि रामू त्याच्या घरी गेलो तर आमच्या अगोदर गावातील बरेच लोक तिथं आले होते. त्यात स्त्रिया पण होत्या. ढोल मोठयाने वाजत होता. सगळे वातावरण गंभीर झाले होते. बाबू गवळयाच्या अंगात आलं होतं. तो ढोलाच्या तालावर वाकडया–तिकडया उडया मारत होता आणि तोंडाने काही तरी बडबडत होता. गावकरी त्याला 'ह्या वर्षी पाऊस पडेल का ? पीके चांगली येतील का ? गावात सर्वांना सुख मिळेल का ?' अशाप्रकारचे नानाविध प्रश्न विचारत होते. बाबू गवळी अंदाजेच उत्तरे देत होता आणि गावकरी माना डोलवत होते. यापैकी कोणीतरी उठले व त्याला म्हणाले,

" मी देवाची भक्ती करूनसुद्धा माझ्या पोराबाळांना का सुख मिळत नाही ? "

यावर बाबू गवळी म्हणाला, " माझ्या देवाची जत्रा केल्याशिवाय तुला सुख मिळणार नाही. "

यावर दोघे पण गप्प बसले. आणखी एका दोघांनी प्रश्न विचारले. त्याची उत्तरे पण बाबूरावांनी अंदाजेच दिली. काही वेळाने त्याच्या अंगातलं मोठया आईचं वारं गलं आणि तो खाली बसला. मग देवीची गीते गाण्यास सुरवात झाली. ही गीते म्हणत असतानाच ऐकणाऱ्या काही लोकांच्या पण अंगात आले. ते पण असेच बडबडले व गप्प बसले. पुन्हा गीते सुरू झाली. अशाप्रकारे हा कार्यक्रम रात्री १-२ वाजेपर्यंत चालला. यालाच मांड म्हणतात. ही मांड १४ दिवस असते. ही मांड बसवताना सात प्रकारची फळे, १०-१५ नारळ, तांदूळ खारीक, खोबरे अशा बऱ्याच महागडया वस्तू लागतात. बसवलेल्या मांडेचे विसर्जन करताना बाबू गवळी व त्याच्या सर्व सहकाऱ्यांना पोशाख करावा लागतो व मानधन म्हणून काही रोख रक्कम द्यावी लागते.

आत्मारामने मांड बसवून आज १० दिवस झाले तरी त्याच्या मुलीच्या प्रकृतीत काहीच फरक पडला नाही. तिचा ताप वाढतच होता. ती रात्रन्दिवस ओरडत असे. त्यामुळे आत्माराम आणि त्याची बायको यांची सुध्दा झोप उडाली होती. मुलगी फार अशक्त झाली होती. काही खात–पीत नव्हती. थोडं दूध किंवा भाताची पेज हा तिचा आहार. त्यामुळे तब्बेत आणखी-नच खालावत होती. अखेरचा प्रयत्न म्हणून मी परत आत्मारामला भेटलो आणि मुलीला दवाखान्यात ॲडमिट करण्यास सांगितले. परंतु त्याने न ऐकल्यासारखे केले आणि तसाच गप्प बसला. ११ व्या दिवशी देवीचे विसर्जन होण्याआधीच आत्मारामची बिचारी मुलगी देवीकडे निघून गेली.

❊ ❊

# डायरी : एक मनोगत

कु. ज्योती मरकळे
एफ्. वाय. बी. ए.

आपल्या संपूर्ण सुखदु:खाच्या गोष्टी विश्वासाने ज्यांच्याजवळ सांगाव्यात अशा व्यक्ती आज अतिशय दुर्मिळ झाल्या आहेत. जो तो आपल्याच विश्वात मग्न असतो. अशावेळी आपण अतिशय एकाकी होतो. कोणाचातरी आधार आपणास हवा असतो. दु:खात जसा आपणास कोणाचा तरी आधार हवासा वाटतो तसाच

सुखात देखील आपले मनोरथ ऐकून घेणारा, आनंदाने विहरणाऱ्या मनाला उत्तेजन देणारा जोडीदार आपण शोधत असतो. असा जोडीदार आपणास सुदैवाने मिळाला की आपणास किती बोलू आणि किती नको असे होऊन जाते. त्यावेळी आपणाजवळचे सर्व शब्द-भांडार आपण त्याच्यासमोर, त्याला एक शब्दही न बोलू न देता रिते करीत असतो. अशावेळी समोरच मनुष्य आपले म्हणणे ऐकून घेत आहे किंवा नाही याकडेही आपले लक्ष जात नाही किंवा लक्षात आले तरी आपण त्याच्या कपाळावरच्या आठीकडे लक्ष न देता आपण त्या गावचेच नाही अशा थाटात सांगत असतो. आपले बोलून झाल्यावर आपण समोरच्या व्यक्तीकडे प्रति-क्रियेच्या अपेक्षेने पाहतो. तेव्हा आपल्या लक्षात येते की आतापर्यंत एका भावनाशून्य चेहऱ्यासमोर आपल्या आयुष्याची वाक्‌गंगा दुथडी भरून वाहत होती. आणि हा विचार मनात येतो न येतो तोच तो निर्विकार चेहरा कधीच आपल्या समोरून निघून गेलेला असतो.

आपण अतिशय बेचैन मनःस्थितीत घरी परततो आणि उदास, विमनस्क अवस्थेत खिडकीतून बाहेर पडणाऱ्या धुवांधार पावसाकडे पहात आपल्याच मनाचा तळ शोधत राहतो. आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरून आलेले असते. घड्याळ दिवसाचे आकडे दाखवत असताना देखील बाहेर एक उदासवाणा अंधारा प्रकाश भरून राहिलेला असतो. आणि ती देखील आपल्या उदासवाण्या मनाची साक्ष आहे, प्रतिबिंब आहे असे आपल्याला उगीचच वाटते. आणि आपल्या खिन्न मनःस्थितीत आणखीच भर पडते. आतापर्यंत बाहेर पडणाऱ्या पावसाच्या सरीत आपल्या मनाचा तळ शोधण्याचा आपला प्रयत्न असफल झालेला असतो. आपण स्वतःवरच भयंकर चिडतो. कुठेतरी काहीतरी करावेसे वाटते. आणि त्यावेळी आपल्या हातून काहीतरी भयंकर घडणार आहे असे आपणास उगीचच वाटत राहते. त्याच आवेगात आपण कोपऱ्यातल्या चिमणीवर काडी ओढून भक्‌दिशी जाळ करून टेबलावरचे लेटरपॅड जवळ घेऊन त्याच आवेगात पानेच्या पाने भयंकर वेगाने लिहीत जातो. आपली गात्रे शिथिल पडल्याचे जाणवते. डोक्यावरचा खूपसा ताण कमी झाल्याचा जाणवतो. विचाराच्या आवर्तात आपण खूपसे काही लिहून गेलेलो असतो. आपण एवढी पाने नक्की काय लिहिले हे काहीच आठवत नाही. पण खूप हलके हलके वाटत असते. काय जादू झाली काहीच कळत नाही. पण त्या लिहिण्यामुळेच झाले एवढे मात्र आपणास निश्चित जाणवत असते.

बाहेरचा पाऊस थांबलेला असतो. आकाश स्वच्छ दिसत असते. आतापर्यंत लपंडाव खेळत असलेला सोन्याचा गोळा निर्व्याजपणे हसत खिडकीत बसलेल्या आपल्याकडे पहात असतो. आणि ते एक आपल्या उमललेल्या मनाचे प्रतीक आहे असे समजून आपण त्यास चक्क त्याच्याच सांकेतिक भाषेत प्रतिसाद देऊन जातो. आपण खिडकीतून आत नजर टाकून मोठ्या आपुलकीने त्या लिहिलेल्या पानांकडे पाहतो. ती लिहिलेली पाने सूर्याच्या किरण स्पर्शाने प्रकाशित होऊन बाहेरच्या मंद वाऱ्याला प्रतिसाद देताना हसत डौलाने फडफडत असतात.

आपल्या लक्षात येतं, आपण डायरी लिहिलेली आहे.

❊ ❊

---

आयुष्याच्या मोलाच्या मानाने ज्याची काहीच किंमत नाही अशा पै-पैशाचा हिशोब आपण ठेवतो पण अमूल्य अशा आयुष्याचा आपण काहीच हिशोब ठेवीत नाही.

दैनंदिनी लिहिण्याची सवय झाली की क्षणाक्षणाचा उपयोग करण्याची वृत्ती आपोआप होते. एक प्रकारचे आत्मपरीक्षण नित्य होत असते. " मी नेहमीच बरोबर असतो, माझे हातून चूक होत नाही " असा मिथ्याभिमान गळत जाऊन ध्येय, विवेक, आचार याबाबतीत सतत जागृत भान राहते.

---



# पोरकी मानसं

**महादेव चव्हाण**
एस्. वाय. बी. ए.

सूर्य पश्चिमेला झुकायला लागला की आईनं झोपेतून उठवलं. चूळ भरली. मन उदास झाल व्हतं म्हणून जरा फिरून यावं असं वाटत व्हतं. म्हणून फिरायला निघालो. घरापासून एक एक पाऊल मोजत बऱ्याच दूर अंतरावर गेलो होतो. समोरून एक दारू प्यालेला माणूस येत असताना दिसला. तो एकटाच स्वतःशी स्वतःलाच बोलत होता. हा कोण असावा बरं, असा काही क्षण विचार करत एक बारीक नजर टाकली, तर तो माझ्याच घराशेजारचा बापू होता. हा बापू आपल्या उतरत्या वयात दारू पिण्याशिवाय दुसरा उद्योगच करत नव्हता. तरुणपणी त्याने एका कळवातनीशी संबंध ठेवले होते. आपलं सर्व काही तिच्यापायी गमावून बसला होता. तिनंही त्याचा संबंध टाकून दिला होता. आता त्याला कुणाचाही आधार नव्हता. स्वतःला थोडासा विरंगुळा वाटावा आणि झोप यावी म्हणून दारू पिण्याशिवाय त्याला दुसरा पर्याय नव्हता. हा बापू माझ्याशी इतका मनमोकळेपणाने वागायचा की कुठलीही गोष्ट असली तरी तो माझ्यापासून लपवून ठेवत नव्हता. सर्व गोष्टी मला उघडपणे सांगत असे, मग ती कोणतीही असो.

तो डुलत डुलत माझ्यासमोर आला, मला पहाताच हसला आणि म्हणाला,

" काय धनू, कुठं निघालास ? एखादं पाखरू हेरलं की काय ?" " तसं काही नाही बापू, जरा फिरून यावं म्हटलं म्हणून फिरायला आलोय. "

"पण आसं फिरून काय मिळणार तुला ? म्हातारीला काम करू लागला तर बरं नाय व्हायचं ? तुझ्या म्हातारीला लय तरास पडतुया बघ. लवकर लगीन का नाही करत ? पण तू लगीन कुणासंगं करणार ?'

" कुणासंगं ? बामणाच्या पोरीसंगं. तुमच्या बाबासायबानं कसं केलतं तसं. त्याशिवाय बामणाचा गर्व नाहीसा होणार नाय. पण बापू, बाबासायबाच्या काळात जातिवंत बामणं व्हती. आता कुठ जातिवंत बामणं हायती तवा त्यांच्या पोरीबरोबर लगीन करू ? "

" आयला हुशार दिसतूया, बापाचं नाव कायतरी राखचील असं वाटतंय. बरं मी जातू, तू ये फिरून "

बापू माझ्यापासून काही अंतरावर पुढे गेला की मी पण तिथूनच माघारी फिरलो आणि हळूहळू घरी निघालो. बापू पुढं चालत व्हता आणि मी त्याच्या पाठीमागं चालत व्हतो. मी जरा आडबाजूला असताना च अचानक बायांचा आणि लहान मुलांचा रडण्याचा आवाज आला. हा आवाज कुणाकडून येतोय हे मला समजत नव्हतं. मी पटकन पुढं झालो आणि घराकडं पाहिलं तर माझ्या चुलत्यांच्या दारात माणसांची गर्दी झाली व्हती आणि बाया व लहान मुलं आक्रोश करीत व्हती. अचानक काय झालंय हे मला समजंना. म्हणून झपाझपा पावलं टाकत घराजवळ आलो. रस्त्यावर काही माणसं उभी होती. त्यांना विचारलं तर कोणीच काही बोलंना म्हणून जवळ जाऊन पहातोय तर माझा चुलत भाऊ सर्वांच्या मध्ये बेशुध्द अवस्थेत पडला होता. त्याच्या डोक्यातून रक्त येत व्हतं. वहिनी त्याचं डोकं आपल्या मांडीवर धरून रडत होती. लहान मुलांचा कलकलाट झाला व्हता. कोण काय बोलतंय कुणाचं-ही कुणाकडं लक्ष नव्हतं. चुलती जवळ रडत होती. तिला विचारलं,

" अचानक काय झालं, काकू ? "

" आरं बाबा, ह्याला पाटलानं मारलंय "

"पण का?"

"कामावरनं येताना पाटलाच्या रानातनं आला म्हणून पाटलानं त्याच्या डोक्यात काठी मारली. तवा त्याचं डोकं फुटलंय. माझा बाबा रानातनं आला म्हणून गुन्हा झाला काय?"

"ह्या पाटलाचा मुडदा उच्चलला. मुड्या, गोर-गरिबाचं हरामाचं खाल्लंय. तुझ्या अंगापोटावर फुटंल, माझा तळतळाट हाय तुला."

मी चुलतीला गप्प बसवण्याचा प्रयत्न करत होतो. पण ती उलट जास्तच शिव्या देत व्हती. शेवटी काही वयस्कर माणसांनी हे वातावरण शांत केलं. रात्र बरीच झाली व्हती. काही भावकीतली माणसं भावाला दवाखान्यात घेऊन चालली व्हती. आपण पण जावं म्हणून त्यांच्याबरोबर निघालो. आम्ही सर्वजण दवाखान्याच्या दारात गेलो तर दवाखाना बंद झाला होता. मी दार वाजवलं आणि काही क्षण तसाच उभा राहिलो. दाराच्या कडीचा आतून आवाज आला. डॉक्टरांनी दार उघडलं, आम्हाला आत घेतलं. त्यांनी काय झालंय म्हणून विचारलं. तेव्हा भावाला पुढं करून त्याचं डोकं डॉक्टरांना दाखवलं. डॉक्टरांनी त्याला आत नेले. मलमपट्टी केली. मी बिल विचारलं तेव्हा डॉक्टरांनी मानेनच नकार दिला आणि हसले.

आम्ही सर्वजण दवाखान्यातून बाहेर आलो. डॉक्टरांनी दवाखाना बंद केला, लाईट विझवली. आम्ही दवाखान्यापासून थोडं पुढं गेल्यावर काहीजण म्हणाले, 'आपण पोलिस स्टेशनला तक्रार देऊ' म्हणून मी, माझा भाऊ आणि भावकीतली काही माणसं पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेलो. पोलिस स्टेशनमध्ये जाण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता.

आम्ही पोलीस स्टेशनच्या आवारात गेल्यावर पुढे व्हायला कोणीच तयार व्हईना. सर्वजण भ्यायला लागले म्हणन मी पुढे झालो. आणि दारात गेलो तर हवालदार साहेब आपल्या खुर्चीवर बसून शांतपणे सिगारेट पीत व्हते. आम्हाला पहाताच, 'या आत या', आम्ही सर्वजण आत गेलो. आत लांब बाक व्हता त्यावर बसण्याचा इशारा केला. बाकावर बसलो आणि त्यांनी एक बारीक निरीक्षणाची नजर आमच्यावरून फिरवली.



"बरेच जण आलात, काय भानगड आहे?"

"भानगड काही नाही, तक्रार द्यायला आलोय."

"कसली?"

"पाटलानं ह्याला मारलं."

"का?"

"रानातून मधून आला म्हणून."

"बऽऽरं!"

हवालदार साहेबांनी आपल्या साथीदाराला हाक मारली तोच पोलीस स्टेशन समोर एक मोटारसायकल येऊन उभी राहिली. ती पाहताच साहेब उठले, 'नमस्काऽऽर' म्हणत बाहेर गेले. मी उठून उभा राहिलो आणि हळूच चोरून बाहेर पाहिलं, तर पाटील आणि हवालदार अंधारात काही बोलत होते. पाटलानं साहेबांच्या हातात काही तरी देत 'घ्याऽऽ' म्हणत खांद्यावर हात टाकला. हे पहात परत हळूच खाली बसलो. काही क्षणातच मोटार सायकल चालू झाल्याचा आवाज आला आणि गाडी तेथून नाहीशी झाली.

साहेब आत आले. भावाकडे पाहिलं.

"तुला पाटलानं मारलं?"

"होय."

"पण पाटील तर म्हणतात की तू त्यांच्या रानातून भुईमूग चोरून उपटत होता आणि त्यांना पहाताच पळालास. तेव्हा तुला ठेच लागून तुझं डोकं दगडावर आपटलं आणि फुटलं.

"नाय साहेब."

"मग काय पाटील खोटं बोलतात?"

"होय साहेब."

"भाडखाव! चोरी करून पुन्हा सावासारखा तक्रार करायला आलास, लाज नाय वाटत.?"

तेवढ्यात मी उठलो. "साहेब! कायदेशीर काय असेल ते करा. आम्ही तक्रार द्यायला आलोय, शिव्या खायला नाय आलो. तक्रार घ्यायची नसेल तर तसं लेखी द्या.

साहेब गप्प बसले आणि सकाळी या म्हणून जाण्याचा इशारा केला. सर्वजण उठलो आणि एक एक जण बाहेर निघायला लागलो. मी सगळ्यात शेवटी होतो. मी बाहेर निघायला लागलो तोच ते म्हणाले–

"तू कुठं चाललास? बस इथं."

मी तिथंच बसलो. जरा वेळ माझ्याशी कोणीच बोललं नाही. रात्र बरीच झाली होती. मला झोपेचा कैफ आला व्हता. डोळे झाकत होते. डोळे झाकले असताना अचानक थोबाडात बसली. त्याबरोबर माझी झोपच पळून गेली. वर मान करून पाहिलं तर समोर हवालदार साहेब उभे होते आणि शेजारी पोलीस काही तरी लिहीत होता. काही वेळानं हवालदार घरी जाण्याच्या विचारात होते. ते दाराजवळ गेले आणि माघारी वळून त्यांनी पोलीसाला सांगितलं "ह्याच्यावर लक्ष ठेव आणि ह्याला लवकर घेऊन जा." असे म्हणत ते पोलीस स्टेशनच्या बाहेर पडले तोच पोलिसानं दार लावून घेतलं आणि गाणं म्हणत त्यांच्या खुर्चीवर बसला आपल्या लिखाणाची सर्व कागदपत्रं आवरून बॅग मध्ये भरून ठेवली. आणि खुर्चीवरच गुणगुणत झोपी गेला. रात्र उलटली होती. पोलीस झोपलेला पाहून मी पण बाकावर अंग टाकलं.

सूर्य उगवायला लागला होता तसा पक्षांचा किलकिलाट चालू होता रस्त्यावरून वहाणाऱ्या वहानांचा आवाज पुसट एकू येत होता. अंग फार दुखत व्हतं म्हणून झोपेतून उठू वाटत नव्हतं पण आपण कुठं झोपलोय हे मला झोपेच्या तंद्रीत समजू शकत नव्हतं. आणि ते सणसणित शब्द कानावर आले—

"आरं ए भाडखाव ऊठ, बापाचं घर हाय काय रे."

* *



# सासरा सिरीयस होतो

कु. कल्पना पवार
एफ्. वाय. बी. ए.

"अहो, ऐकलंत का?" बाहेरून सौ. चा आवाज आला. मी जाम भडकलो. आधीच आंघोळीला पाणी गार मिळाल्यानं वैतागलो होतो व आंघोळ नावाचा विधी उरकत होतो. तोच 'ही'ची भालदाराच्या थाटात ललकारी!

"काय आहे?" मी आतूनच खेकसलो. "अहो, पण बाहेर तरी याल की नाही?"

ऑफिसात जाताना डोक्याला उगीच कटकट नको म्हणून मी कपडे घालत बाहेर आलो, तर दारात पोस्टमन नामक प्राणी उभा होता.

"काय आहे?" वैतागलेल्या सुरात मी विचारले. "तार" तो शांतपणे म्हणाला. वैतागाची त्यालाही सवय असावी. "आयला वैतागच आहे" पुटपुटत मी सही केली व तार वाचली.

"आपले सासरे गंभीर आजारी आहेत. ताबडतोब निघून या" तार वाचताच सौ. चे पितृप्रेम खडबडून जागे झाले व तारसप्तकातील शोकराग आळविण्यास तिने सुरुवात केली. "असं कसं झालं हो! चला तयारी करा,"

"कशाची?" मी भेदरून (खरोखर) प्रश्न केला.

" कमाल आहे तुमची ! अहो, कराडला नको का जायला ? "

" पण, अगं, मला रजा मिळणार नाही. मग मला येणं कसं जमणार ?

" पेटली तुमची रजा ! इथं बाबा आजारी आहेत आणि तुम्हाला रजा नाही ? चार दिवस रजा बिन-पगारी झाली तर बिघडत नाही. " म्हणून पुन्हा तिने शोकराग आळवणे सुरू केले. ही मात्रा मात्र ( नेहमी-सारखी लागू पडली. व ' रजा काढतो पण रडे आवर ' असं पुटपुटत ( तेही मनातच ) मी चार दिवसांच्या रजेचा अर्ज खरडून शेजारच्या धारपाकडून ऑफिसात पाठविला, अर्थात तो नामंजूर होणार यात शंका नव्हती. पण सौ. चा संताप टाळण्यासाठी मी ४५ रु. वर पाणी सोडण्यास तयार झालो. पैशाचा प्रश्न नव्हता. कारण कधी नव्हे तो यावेळी दोन तारखेस पगार झाला होता; आणि सौ. च्या सी. आय. डी. नजरेनं रात्रीच आमचं पाकीट हेरलं होतं.

अर्ज पाठवल्यावर सामानाची बांधाबांध सुरू झाली. कोणत्या ऋतूत कोणते कपडे घ्यावे याबाबत सौ. चे डोके उंटापेक्षा तिरके चालत असल्याने उन्हाळा सुरू झाला असताना स्वेटर बरोबर कशाला हा प्रश्न मी विचारू शकलो नाही आणि आमची प्रजा ? बोलायची सोय नाही. मला सामान बांधण्यास मदत करणे सोडाच; उलट मुकादमाच्या थाटात थोरले युवराज " पपा, माझा टी शर्ट आठवणीनं घ्या; माझी प्रेस केलेली पँट व्यवस्थित ठेवा नाहीतर चुरगाळेल ", अशा आज्ञा सोडत होते. कन्याराजे सौ. कडून वेणी घालून घेत होत्या व चक्रव्यूहातील अभिमन्यूसारखा मी सामानाच्या गराड्याशी झुंज घेत होतो. एकदाची ती बांधाबांधी आणि आवराआवर संपली व सौ. सह आमची स्वारी स्टेशनमध्ये पोहचली.

स्टेशनमधील गर्दी व तिकिटासाठी लागलेली रांग पाहून मी मनाशी खात्री केली, आपण पोहोचेपर्यंत सासऱ्याचा तेरावा होऊन गेला असणार. पण सौ. ने गनिमी काव्याने मन्याला ( हे आमचे युवराज ) रांगेत घुसवले. सौ. च्या रूपातील आधुनिक झाशीच्या राणीचा अवतार पाहून कुणाची बोलण्याची बिशाद झाली नाही.



हे बाकी खरं आहे, जे मला जमत नाही ते सौ. ला जमते व अशा आणिबाणीच्या प्रसंगी मला तिचा आधार वाटतो. असो.

मन्या रांगेत घुसल्याने तिकिटांचा प्रश्न सुटला. पण मुख्य कसोटी पुढेच होती. रेल्वे स्टेशनमध्ये आल्यापासून मी डोळ्यात प्राण आणून मोकळ्या डब्याची प्रतीक्षा करत होतो. पण डबाच काय पण एकही सीट मोकळी दिसत नव्हती. शेवटी सभ्यपणा सोडून मी हातातील पेटीसह एका डब्यात मुसंडी मारली. सौ, कन्याराजे, युवराज यांनी माझे अनुकरण केले व रेल्वेने स्टेशन सोडले.

डब्यात प्रवेश मिळविण्याची कसोटी पार पडल्यानंतर जागा मिळवण्याची कसोटी अगदी पणाला लागली. डब्यात दोन पायावर उभे राहण्यासही जागा नव्हती. गर्दीचा महापूर याचा अक्षरशः अर्थ मला त्यादिवशी कळला. पण या प्रसंगी पुन्हा सौ. चा लढाउपणा कामी आला व खिडकीजवळच्या बिचाऱ्या युवतीस बाजूला सारून स्वतः स्थानापन्न होण्यात ती यशस्वी झाली. युवती जरा कायद्याचे ज्ञान देऊ लागताच ' तुझ्या बापाची नाही रेल्वे ' असे सुनावण्यास तिने कमी केले नाही. मी माझ्या पांढरपेशा वृत्तीला जागून सौ. ला समजावण्याचा प्रयत्न केला पण सौ. माझ्यावरच एकदम कडाडली. अर्थात आमची वटवट झटक्यात बंद झाली.

एवढे होते ना होते तोच माझ्या खांद्यावर हात पडला. सौ. वरचा राग मी हात टाकणारावर काढला. " का हो, तुम्हाला शिष्टाचार वगैरे माहीत आहे की नाही ? खुशाल खांद्यावर हात टाकता "

" मिस्टर, बकबास करू नका; तिकीट दाखवा ". तो गुरगुरला. तिकीट मागतोय म्हणजे हा तिकीट चेकर दिसतोय असा विचार करून मी म्हणालो, " सॉरी हं, मी आपणास ओळखलंच नाही. "

" बरं, हुशारी करू नका, तिकीट दाखवा. "

" अहो, दाखवतो की, आम्हाला चोर समजता काय तुम्ही ? सभ्य माणसं आहोत आम्ही. " पुटपुटत मी खिशात हात घातला पण माझ्या दुर्दैवाने मला चांगलंच फिरवायचं ठरवलं होतं. शर्ट पँटचे दोन्ही खिसे



तपासूनही तिकिट सापडेना. चेकरचा चेहरा विजयी वीरासारखा फुलला. मी सौ. ला विचारलं, " अगं, तिकिटं कुठं ठेवलीत? "

" नाटक करू नका मिस्टर, सभ्य म्हणवून घेता आणि विनातिकीट प्रवास करायला काही नाही वाटत? "

" अहो...... पण...... आम्ही "

" बकवास बंद. विनातिकीट प्रवास केल्याबद्दल ५० रु. दंड भरा, नाहीतर खडी फोडा. "

अरे बापरे ! या तिकिटांनी चांगलच गोत्यात आणलं. मुकाट्यानं त्या यमराजाला पैसे देऊन कटवण्याखेरीज गत्यंतर उरलं नाही. त्यानं माझं नाव लिहून घेतलं व म्हणाला ' " पुढच्या स्टेशनला पावती घ्या. "

मी एक सुस्कारा टाकला. बरे झाले. तुरुंगवासाचे ५० रु. वर भागले. इतक्यात कुठलेतरी फुटकळ स्टेशन लागून गाडी थांबली.

सौ. म्हणाली, " घरातून निघून फार उशीर झालाय पोहोचायलाही उशीर लागेल. आपण इथल्या स्टॉलवर काहीतरी घेऊ. "

आज्ञा प्रमाण मानून आम्ही खाली उतरलो. मात्र उतरताना इशारा दिला, " शिट्टी होताच गाडी गाठायची.

स्टेशनप्रमाणेच स्टॉलही फुटकळ होता. वडा, मिसळ, नानकटाई याखेरीज पदार्थ नव्हते. वडा, चहा घेऊन झाल्यावर बिल चुकते करण्यासाठी मी पाकीट काढले. कशी काय सौ. ची नजर तिकडे गेली कुणास ठाऊक, "अहो तुम्ही असे धांदरट, पैसे पाहून कुणीही पाकीट लंपास करील. तेव्हा त्यामधले पैसे माझ्या पर्समध्ये ठेवते" असे म्हणत तिने पाकीट घेतले व पर्स खोलली.

"अय्या, मजाच आहे" ती चित्कारली.

"कय झालं ?" अस्मादिक.

"अहो रेल्वेची तिकिटं माझ्या पर्समध्येच आहेत."

"काय?" मी किंचाळलो.

"अहो, ओरडता कशाला इतके?"

"मग काय हसू? ५० रुपयांना भुर्दंड बसलाय, तुझ्या मूर्खपणामुळे" बिल देण्यासाठी २० रु. ची नोट



काऊंटरवर ठेवली व शिट्टी झाली.

" अरे बापरे ! गाडी हालली " म्हणून मी तसाच पळत सुटलो. कसाबसा डबा गाठला आणि मग काउंटर-वरच्या नोटेची आठवण झाली.

वैताग ! वैताग ! ! डोकं असं गरगरू लागलं की बस्स! कारण गाडीनं स्टेशन सोडलं असल्यानं ४ कप चहासाठी २० रु. मोजावे लागल्याचं समाधान मानावं लागलं.

एवढं नुकसान व मनस्ताप पार पडल्यावर संतुष्ट होऊन रेल्वेने आम्हास इच्छित स्थळी पोहोचविले. या ठिकाणी गाडी फक्त पाच मिनिटे थंबते. त्यामुळे मुले व सामान यांना एकाच न्यायाने उतरवून घ्यावे लागले. स्टेशनपासून घर अर्धा मैल लांब. तेथे बस जात नाही. मग सौ. च्या डोक्यातून रिक्षाने जाण्याची शक्कल निघाली. पण रिक्षावाल्यानेही आम्हांस पिळायचेच ठरवले होते. अर्धा मैल अंतरासाठी बेट्यानं १० रु. मागितले. पण परिस्थितीचे गांभीर्य (?) लक्षात घेऊन त्याला १० रु. द्यावे लागले. रिक्षात सामान व मुलांना कोंबून बसू लागताच त्याने फर्मावले, "एक रिक्षामें तीनही आदमी बैठ सकते है!" त्याचा नियम ऐकून प्रश्न पडला की, चालत कोण येणार? कुणालाही दुखवणे व फुफाट्यातून चालणे मला शक्य नसल्याने जास्त माणसे बसल्याची किंमत म्हणून ५ रु. देऊन रिक्षादेवीस प्रसन्न करून घ्यावे लागले. काऽकू करुन त्याने आम्हाला रिक्षात घेतले व रिक्षा सुरू केली.

१५ मिनिटांच्या खडतर प्रवासानंतर रिक्षा सौ. च्या दाराजवळ थांबली. भराभरा सामान काढून जवळजवळ पळत घरात शिरलो. घरात शिरताच डोक्यात ॲटमबाँब फुटल्याचा भास झाला मला!

जे सासरेबुवा गंभीर आजारी असल्याची तार आली होती. ते सासरेबुवा नातवास खेळवत असल्याचं पाहून स्वतःच गंभीर असल्यासारखं वाटू लागलं.

" काय गं मालू, अचानक येणं केलं जावईबापूसह ? " सासरेबुवा उद्गारले. " तुम्ही बरे आहात ना बाबा ? काय झालं होतं तुम्हाला ? " सौ. ने सरबत्ती सुरू केली. " ऑ, मला काय झालं होतं ? कुणी सांगितलं तुम्हाला ? असं सासरेबुवा म्हणत असताना आपल्या शुभ्र दंतपंक्ती

दाखवत आमच्या मेहुणीताई प्रवेश करत्या झाल्या. " हेकाय झालं ? हसायला काय झालं ? " सौ.

" हसू नाहीतर काय रडू ? अगं किती सहज फसले भाऊजी ? " ही संक्रांत माझ्यावर आल्याचे पाहून मी भेदरलो.

" काय झालं मला फसायला ? मामांना पहायला आम्ही आलोय " मी उसन्या अवसानान म्हणालो

" तेच भाऊजी, म्हणून तर म्हणाले फसलात. अहो आज तारीख किती ? " "४ एप्रिल" मी म्हणालो. "अहो तुम्हाला एप्रिलफूल करण्यासाठीच मीच तार केली होती."

तिचे ते दिव्योद्‌गार ऐकून सौ. नेही तिच्या सुरात सूर मिसळून स्मित (?) हास्य सुरू केले. मी मात्र आज झालेला अनाठायी खर्च, वाया गेलेली रजा व झालेला मनस्ताप यांचा हिशेब करून पुन्हा सासरा मेला तरी सासरी न येण्याची भिष्मप्रतिज्ञा करून टाकली.

❊ ❊

# सारजा


**सौ. व्ही. आर. जंगम**
टी. वाय. बी ए.


"बाई, माझी सारजा गेली. तिनं विहिरीत उडी टाकली आणि जीव दिला. लोकांच्या दृष्टीनं तिनं जीव दिला. पण बाई, मीच तिचा घात केला. मी– तिच्या या सख्ख्या भावानंच–स्वार्थासाठी, तिच्यावर ही पाळी आणली. तुमचा सारजावर आणि सारजाचा तुमच्यावर लय जीव हुता. लगीन हून जाताना आईपेक्षा तुमच्याच गळ्यात पडून ती ढसाढसा रडली. थोरल्या बहिणीप्रमाणं तुमच्यावर तिची माया व्हती. आज मरतानं बी तुम्हालाच तिनं एक चिठ्ठी लिहून ठेवलिया, ती वाचा. आन् या मुर्दाड भावाला, एका खुन्याला वाटंल ती शिक्षा करा. माझ्या पापाला शिक्षा करा आणि माझ्यावतीनं सारजाची माफी मागा......."

असं म्हणून रंभाजीनं माझ्यापुढे एक चिठ्ठी ठेवली आणि तो धाय मोकलून " सारजा सारजा " करीत रडू लागला.

त्याच्या त्या बोलण्याने आणि रडण्याने मी चक्रावूनच गेले. सारजाने जीव दिल्याचं ऐकून मी घायाळच बनले. क्षणभर डोळ्यापुढे अंधार दाटू लागला. तिच्या आठवणीने माझ्या डोळ्याला पाण्याच्या धारा लागल्या. त्या कशातरी आवरत मी रंभाजीला समजावण्याचा प्रयत्न केला. शांत हो म्हणत स्वतःसही सावरले. रंभाजीने दिलेली सारजाची ही शेवटची चिठ्ठी भरल्या डोळ्याने वाचू लागले.

' माई, तुम्हाला जग "बाई" म्हणून बोलावतं पण मी तुमची लाडकी सारजा, एकटीच तुम्हाला माई म्हणायची. माझे अंतःकरण केवळ तुम्हालाच ठाऊक आहे. आई, बहिणीच्या पलीकडे तुम्ही मला वागविले, प्रेम दिले, आणि म्हणून हा अखेरचा निरोप घेते या सारजावर रागावू नका. ही चिठ्ठी तुम्हाला मिळेल तेव्हा मी या जगात नसेन. माझ्या एकुलत्या एका भावाला जीव लावा. त्याला मदत करा. माझी कर्मकाहाणी तर तुम्हास माहीतच आहे. माझ्या या करणीला तुम्ही क्षमा करा तुमची सारजा एका नरकातून सुटली. भावासाठी तिनं हा नरक आपणहून पत्करला होता. त्याची इच्छा पुरी झाली. मी आता माझ्या मार्गाने जाते.

तुमची लाडकी, सारजा

. चिठ्ठी वाचताना माझ्या डोळ्यांतून घळा घळा धारा वहात होत्या. आणि अंतर्मनाच्या पडद्यावर सारजाचा जीवनपट भराभरा उलगडला जात होता.

धोंडवाडीत आम्ही आलो तेव्हा सारजा १० वर्षांची होती. माझ्या शेजारच्या वाड्यातच ती राहायची. सारजा निशिगंधाच्या फुलाप्रमाणे नाजूक पण रसरशीत होती. स्वभावाने अतिशय सालस व प्रेमळ. तिचं कुटुंब गरीबच पण मर्यादित होतं. विधवा आई व एकुलता एक भाऊ रंभाजी. तिच्यापेक्षा चार वर्षांनी मोठा. ५-६ एकर जमीन. सारजा सगळ्यांना हवी हवी अशी वाटणारी पोरगी होती. पण गेल्या महिनाभरात तिच्या आयुष्यात एक मोठं वादळ आलं आणि त्यात अखेर सारजा विझून गेली. आम्हा सर्वांच्या डोळ्यापुढं अंधार पसरून.

धोंडवाडीच्या मातीला हा शापच आहे की काय कोण जाणे ? इथले स्वार्थी पुढारी, पिढ्यान्-पिढ्या चाललेल्या मारामाऱ्या, कोर्टकचेऱ्या आणि हेवेदावे यांनी सारजाला अखेर संपविलं होतं. अन्याबादादा व मन्याबापू हे गावातले अस्सल गुंड. गोरगरिबांना अडकित्यात अडकवून ८० एकर जमिनीचे मालक बनले होते. भावकी-भावकीत भांडण लावून गाव नासवलं होतं. आणि आपली पोळी पिकवली होती. त्यांच्याच भावकीतला रंभाजी हा गरीब पण कष्टाळू होता. अन्याबा दादा आणिम न्याबापू यांची बैठक बारामतीला झिंगरे बापूच्या दुकानात कायम असायची. लफडी निस्तारायला शहाणे वकील मदतीला तयार असायचे. अन्याबाच्या केसेस ते मोफत चालवायाचे कारण त्याच्या जोडीला गावातील ८–१० केसेस ते आणून देत. त्यांनी केसेस आणाव्यात व त्या चालवाव्यात वकिलांनी, हा शिरस्ताच बनून गेलेला.

ग्यानबा गिरमदार हे बारामतीचे बडे बागायतदार प्रस्थ. घरी दोन ट्रॅक्टर, चार ट्रक, अडीचशे एकर जमीन. वय वर्ष ५६. त्यांच्या दोन मुलींची लग्नं झाली होती. आणि तिसरा मुलगा बी. ए. करीत होता. तोही लग्नाला आला होता. पण ग्यानबाला या वयातही लग्न हवं होतं. धोंडवाडीच्या अन्याबादादाचं आणि ग्यानबाचं चांगलंच सुतगुत जमलं होतं. कारण "समान शील व समान व्यसन." झिंगरे बापूच्या दुकानातच अन्याबादादाजवळ ग्यानबाने आपले मनोगत सांगितलं,

" अन्याबा, गड्या, बायको गेल्याला वरीस झालं अजिबात करमत न्हायी. ह्या एवढ्या इस्टीटीस काय जाळायचं ? एखादी फाकडी पोरगी असली तर बघ. कुठं चांगलं जमवून दिलंस तर म्हणशील ते देईन. पन पाखरू कोरं करकरीत अन् कवळं कुरकुरीत पाहिजे." अन्याबाच्या डोक्यात लख्खकन् वीज चमकली. चांगली शिकार मिळाल्याचा आनंद डोळ्यांत पाघळला– पण चेहऱ्यावर दिसू न देता अन्याबा म्हणाला,

" ग्यानबा, अवघड हाय. पन म्हणतोस तर बघतो प्रयत्न करून. आमच्या गावात हाय एक स्थळ. पण व्येव्हार अगोदर बोला."

" आरं अन्याबा, तूच बोल. मी तयार हाय ".

" हे बघा, लगीन कसंबी करा. ते तुमचं तुम्हालाच करावं लागेल, हे उघड हाय. पण पाच हजार अक्षदा पडायच्या आत आमच्या हातावर ठेवावं लागत्याल आणि आमची वीस एकर मळई तुमच्या ट्रॅक्टरनं द्यावी लागंल. नांगरून हाय कबूल ?"

" आवं, जरा दमानं घ्या. जुळवाजुळव करायला पायजे. उद्याचा सोमवार जाऊन पुढच्या सोमवारी या."

ग्यानबाने सुपारी अडकित्यात धरून कराकरा कातरली आन् सगळ्यांना दिली. सुपारी चघळत बैठक उठली.

अन्याबादादा आणि मन्याबापू धोंडवाडीत आले. त्यांनी रंभाजीला वाड्यावर बोलावून घेतलं. इकडच्या तिकडच्या गप्पा काढत गाडी मुद्यावर आली. अन्याबा दादा म्हणाला–"आरं रंभा, सारजा मोठी झाली आता. तिचं लगीन कधी करतुयास ? तूच आता घरातील कर्ता."

" व्हय दादा, आता विचार करायला हवा. पण माझी परिस्थिती ही अशी. त्यात हिरीसाठी वीस हजाराचं प्रकरण केलंय. ते झालं की बघू."

" रंभाजी, आरं त्याची काय गरज न्हाय. आमी तुला मदत करतो. आमचं ऐक. बारामतीचा गिरमदार

ठाउक हाय न्हवं? तसं थोडं वय जास्त हाय. पण लेका, केवढी इस्टेट हाय त्येची. त्येची बायको गेल्या साली वारली. त्यांना लगीन करायचंय. सारजाला देऊन टाक. तुला खर्च बी न्हाय आन् आधार बी मोठा."

"काय दादा मस्करी करता माझी पोराची? माझ्या हातानं बहिणीच्या गळयात धोंडा बांधू म्हणता? आपल्याला पटत न्हाय". "रंभाजी आरं, येडा हायस का? आम्ही काय वाईट करतुया? तुझा बाप आमची थुकी ओलांडायचा नाई, आन् तू मात्र लई नाक वर करून बोलतुयास. काय जहागिरदाराला भन देणार हायस?" "न्हाय पन दादा, तिच्या वयाला रूपाला योग्य असा नवरा नको का?"

"आँ, तुझ्या आयची, ए टिनपाटा, खायला माती न्हाय आन गप्पा जहागिरीच्या! आयला तुझ्या, जोडयानं टाळकं सडकीन. गुमान व्हय म्हण. मला दादा म्हणत्यात. ठाव हाय न्हवं? न्हाय म्हण, मग बघतो, कसा बांधानं जातोस ते तुझ्या शेतात. न्हाय पाय काढला तर इचारू नगंस. आन् लक्षात ठेव बँकेच्या प्रकरणाची जामिनकी काढून घीन आन् सायबाला प्रकरन कॅन्सल कराय लावीन."

"पण दादा, आईचा आणि सारजाचा इचार नगं का घ्यायला? त्या न्हायी म्हणाल्यावर काय करायचं?"

"हा असा सरळ हो आणि मला इच.र, मी सांगतो. त्या कशाला न्हाय म्हणत्याल? लेका, तू एकुलता एक आईलाबी आन भनीलाबी. सरळ समजावून सांग. न्हाय म्हणायला लागल्या, हटून बसल्या तर येन्ड्रिन पिऊन जीव द्यायची धमकी दे. बघ गुपचुप तयार होत्यात का नाय. जा आणि पुढच्या सोमवारी आम्ही पावणं घिऊन येतो. तयारीत रहा."

रंभाजी उठला आन् घरी आला. तो मनातून बेचिराख झाला होता. इकडे आड तिकडे विहीर. अन्याबा दादाची भयंकर काळी कृत्यं त्याला माहीत होती. ह्यापेक्षा आपणच मरावं असंही त्याला वाटलं. पण तेवढं धाडस नव्हतं.

संध्याकाळी रंभाजीनं आईपुढं विषय काढला. सारजाही तव्यावर भाकरी शेकत ऐकत होती. पुढच्या सोमवारी पाहुणे येणार येवढेच तो बोलला.

ठरल्याप्रमाणे सोमवारी ग्यानबा अन्याबादादासह रंभाजीच्या घरी आला. त्यानं सारजाला पाहिलं आणि मनातून उतावीळच झाला, बोलणी करायला या म्हणून अन्याबा निघून गेला.

रंभाजीच्या घरी डोंब उसळला. त्याची आई त्याच्यावर विजेसारखी कोसळली.

"आरं या परीस पोरीला तू कसाबाला का इकलं नाहीस? कर्ता झालायस. एकुलत्या एक भनीला बिजवर आन् त्योबी पन्नास साठ वर्षाचा म्हातारा नवरा बघितलास? आरं तू पोरीचा भाऊ आहेस का वादी? त्यापरीस तिला हिरीत का ढकलीत नाहीस?"

सारजानंही रडून आकांत केला. ती म्हणाली "मी हिरीत जीव देते. पण मला त्या म्हाताऱ्याशी लगीन न्हाय करायचं."

रंभाजी आतून फुटून निघाला होता. त्याला व्यवहार कळत होता. पण अ.ईला आन् बहिणीला सत्य सांगता येत नव्हते. अन्याबादादाचा मुंडासा बांधलेला, वाघासारखा जबडा वासलेला चेहरा त्याच्या डोळ्यापुढं उभा राहिला. ८–१० गुंड माणसं मिळून बांधाच्या वाटेवर त्याचे पाय फासटताहेत असं दृश्य त्याच्या डोळ्यासमोर दिसू लागलं. तो जिवाच्या आकांतानं आरडतोय आणि अन्याबा दादा म्हणतोय––

"भोसडीच्या, गुडघा काढाय लावीन." बँकेचा साहेब त्याला कर्ज देता येत नाही. असं सांगतोय, असं दृश्य समोर दिसावयास लागलं त्याला हे सगळं असह्य झालं आणि तो किंचाळला,

"हा, हा, हा तू कशाला हीरीत जीव देतेस, मीच, मीच जीव देतो. तुम्ही मायालेकी माझ्या माघारी राज्य करा. आन् सारजे तू बी एखादा राजकुमार बघ! लगीन करून राज्य कर. मीच येंड्रिन पितो आणि जीव देतो. मंजी तुम्ही मोकळ्या अ.न् मी बी मोकळा."

आसं म्हणून तिरीमिरीनं उठला आणि अंधारामध्ये दिसेनासा झाला. मायलेकी भानावर आल्या. प्रकरण भलत्याच थराला चाललंय, हे पाहून आईचं काळीज चरकलं. मायलेकी गळयात पडून हमसून रडू लागल्या. शेवटी सारजानं स्वताला सावरलं. आणि म्हणाली, "आय, दादापरीस माझा जीव का लय भारी हाय? दादा आपल्या वंशाचा दिवा. त्याचं बरं वाईट झालं तर? मला जगून काय करायचं? ही गरिबी आपल्याला गिळतीया. आय, व्हय म्हणून टाक दादाला. कर्माचा भोग चुकायचा न्हाय. भोगायला मी तयार हाय. पण दादाच्या केसाला धक्का लागायला नगं."

रंभाजीची आई हातात कंदील घेऊन रंभा, रंभा हाक मारीत बाहेर पडली. सतुभाऊच्या छप्परात गुडघ्यात मान घालून रंभा बसला व्हता. म्हातारीने त्याला घरी नेलं.

सारजाचं लग्न ग्यानबा गिरमदार याच्याशी ठरलं. १५ दिवसावर तिथी धरली. मधल्या काळात सारजा येऊन माझ्याजवळ धाय मोकलून रडली. पण मीही बाईमाणूस आणि परक्या गावची. नोकरी निमित्ताने धोंडवाडीत आलेली. धोंडवाडीतल्या लोकांना या लग्नात काहीतरी काळंबेरं असल्याचा संशय होताच. पण कोणाला काही करता येत नव्हते. लग्न साधेपणानं करायचं ठरलं होतं. पण तरीही अन्याबादादानं बजावलं होतं, मुलीकडचे कपडे दागिने द्यावर बराच खर्च करायला हवा त्यामुळे मुलगी खुष व्हावी.

चार दिवसावर लग्न आलं. अन्याबाची २० एकर जमीन ट्रॅक्टरने एका दिवसात नांगरून निघाली. त्या दोघाला रोख पाच हजार आतल्या हातानं मिळाले. सगळं कसं सुरळीत पार पडलं.

लग्नाची तिथ उजाडली. (अ) शुभ मुहूर्तावर सारजा सौभाग्यवती झाली आणि छपन्न वर्षाच्या ग्यानबाच्या उपरण्याला सोळा वर्षाच्या, हिरव्या शालूची गाठ मारून सारजा नांदायला गेली. खोल भळभळणारी जखम हृदयावर घेऊन. भावाच्या कल्याणासाठी जिवंत असतानाच प्रेत बनून. पण काहीशा निश्चयाने!

सारजा कोवळी होती पण जिद्दी. आपल्या देहाचं निर्माल्य होऊ द्यायचं नाही हा तिचा निश्चय होता. आणि लग्नाअगोदरच्या भेटीत माझ्याजवळ आपला मनोदय तिनं अस्पष्टसा व्यक्त केला होता. तिचे आजही शब्द आठवतात,

"माई, ही सारजा कुलवंताची लेक हाय. गरिबीच्या अजगराला तिला गिळायचंय्. पन तुम्ही बघा, मी त्याच्या जबड्यात जायची न्हाय."

आज याचा संदर्भ मला उमगला आहे. नियतीच्या भयाण खेळानं सारजा नावाचं निशिगंधाचं फूल वरवंटयाखाली रगडलं गेलं. उमद्या आणि पिळदार बाहू असलेल्या जवाने जोडीदाराच्या मिठीत सर्वस्व उधळण्याची इच्छा करणाऱ्या सारजाने विहिरीच्या थंड पाण्यात आपली प्राणज्योत आपणहून विझवली, आपल्या बापाच्या वंशाचा दिवा विझू नये म्हणून.

❊ ❊

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

---

सत्ता हे जसे एक मूल्य तशी जीवनाची इतरही मूल्ये आहेत. व्यवहार, तत्त्वविचार, सहजीवन, सौंदर्य, विश्वात्मकता ही मूल्ये महत्त्वाची असतात. त्यांनीच मानवी जीवनाला ऐश्वर्य प्राप्त होते. सर्वसाधारण व्यक्ती व्यवहारात दंग असते. ही गोष्ट खरी, पण तिलाही या ऐश्वर्यकारक मूल्यांबद्दल मनातून आस्था असते. आदर आसतो. सर्वसाधारण व्यक्तीला राजकारणात अगर त्याच्या सत्ताविकृतीत तसा रस नसतो. पण आज ही विकृती जीवनाची मुळेच कुरतडू लागली आहे ... (या विकृतीचे) निरसन करण्यासाठी जीवनाचे ऐश्वर्य वाढविणाऱ्या सर्वच मूल्यांची कदर व्हायला हवी.

प्रभाकर पाध्ये

विचारधारा ' पृ. ३५.

---

**खरा धर्म**

कसले कर्म अन् कसले दैव !
खुळ्या कल्पनी का झालास बद्ध ?
तोडूनि तटातट हे फसवे बंध
पुरुषार्थ करण्यास हो तू सिद्ध !

 'कर्म कर्म' करता नि 'दैव दैव' म्हणता
 जाहली आता पुरती हद्द !
 अंतरी पहा जरा –
 तव आत्माराम झाला अति क्रुद्ध !

'कर्म–धर्म अन् देव–दैव' या तर
पुरुषार्थहीनांच्याच कल्पना
'ठेविले अनंते तैसेचि रहावे'
हीही त्यांचीच ती वल्गना !

 कर्मावरी कालच्या विसंबुनी
 निष्क्रिय होणे रे केवळ व्यर्थ !
 'असेल हरी तर देईल खाटेवरी'
 म्हणण्यात काय पुरुषार्थ !

गतकर्म पूजनी विसरलास
सांप्रत कर्म ते सार्थ–
'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु......'
हाच आहे खरा पुरुषार्थ !

 आजचा पुरुषार्थच असे
 रे तुझे उद्याचे कर्म,
 जाणून घे तू हे मर्म
 पुरुषार्थच आहे खरा धर्म !

**प्रमोद वडगावकर**
एम्. ए. (इंग्लिश)

**मन**

मिरविते मी स्वतंत्र म्हणून
पण नेहमीच असतं मन माझं
कुठे ना कुठे अडकलेलं
दुःखाने जाते कोलमडून
सुखाने जाते आनंदून
प्रेमाने जाते तृप्त होऊन
मोहाने जाते मोहून
आशेने जाते फुलून
निराशेने जाते खंगून
रे मना !
जगात तूच असा पराधीन
सर्व भावनांनी स्वतःला जखडणारा
पण स्वतंत्र म्हणून मिरविणारा

**कु. मीनाक्षी धालपे**
एम्. ए. (हिन्दी)





**भावतरंग––**

तुझं असं अवचित येणं
मनावर कसं कोरून आहे
प्रतीक्षेची प्रत्येक सांज
पापणीवर उतरून आहे.

•

माझ्या आयुष्यात आता
तू श्रावण होऊ नकोस
माझ्या डोळ्यांनीच
व्रत स्वीकारलंय–
मूकपणे बरसण्याचं !

•

अंधाराचीच सवय झालीय
आता प्रकाश देऊ नकोस.
मिटू पाहणाऱ्या डोळ्यांना
तू पुन्हा जागवू नकोस.

•

हिरव्या तृणावलीवर
आठवणींची जपमाळ ओढत
कधी कधी बसावेसे वाटते
आणि त्याच वेळी आठवत असताना
आठवणीही संपतात पूर्ण विरामासारख्या !

•

तू दिलंस एक फूल
गुलाबाचं, आणि
म्हणालास, जप.
हृदयाच्या अगदी आतल्या
कप्प्यात मी ते ठेवलं होतं
पण ......
हृदय फाटल्यावर कळलं की,
तू काट्यापासून जप
म्हणाला होतास.

**कु. ज्योती मरकळे**
एफ्. वाय. बी. ए.

**आयुष्य**

कधी असंही जगायचं असतं,
 कधी असंही वागायचं असतं,
खोट्या आनंदाच्या पडद्याआड
 खरं दुःखं लपवायचं असतं
काही आठवायचं असतं
 काही विसरायचं असतं
मनाच्या मखमली पेटीत
 काही स्मृतींना जपायचं असतं
दुःखातही आपल्या आसवांना,
 डोळ्यात आणायचं नसतं,
हसतमुखानं इतरांचंच सांत्वन
 करायचं असतं
दिवा बनून प्रकाश देत,
 जळत राहायचं असतं,
चन्दन बनून झिजत, झिजत
 आयुष्य संपवायचं असतं !

**निनाद भोईटे**
टी. वाय. बी. कॉम्.

**सौदा**

ती फिरत आहे गल्लोगल्ली
आपलंच पोट जाळण्यासाठी
म्हणूनच तिला जुळवून
घ्यावं लागतं त्यासाठी
द्यावी लागते टक्कर
सर्वांच्या आशाळभूत नजरेला
त्याची किळस येतच नाही तिला
सजवून नवी नवी शेज
सगळं आयुष्य विकलं
वेगवेगळ्या सौद्यात.

**चंद्रकांत कावळे**
एम्. ए. (इतिहास)

### अंत

पडताच पाऊल उंबऱ्या बाहेर,
दोन बोटात येते चारमिनार,
सुगंध आपुला फेकते दूर,
निघतो बाहेर शुभ्र धूर,
पण हृदय होते काळेभोर.

पडताच पाऊल उंबऱ्या बाहेर,
समोर होतो ओठ फुगीर,
तळहात होतो पांढरा शुभ्र,
पिवळ्या पिचकाऱ्या पडतात बाहेर,
पण आत जडतो अवजड कॅन्सर.

पाऊल पडताच बाहेर उंबऱ्यातुनी,
चिंचोळी नळी हातात धरुनी
ओढतो जोरात जय शंभो म्हणुनी,
शिवनामाचा गजर करतो मुखातुनी,
रोगास आवाहन करतो शिवनामातुनी.

पाऊल जेव्हा उंबऱ्यातून बाहेर येते,
सुगंधी बाटली जिभेस खेचते,
तिच्याबरोबर मनास भुलविते,
प्रत्येक नसानसातुनी धुंदी चढते,
पण काळजास छिद्रे पाडून जाते.

यमास यांची मदत होते
संसाराचे जहाज तळास जाते

**विजयकुमार तेली**
एफ. वाय. बी. ए.

### चक्र

दिवसा मागे दिवस जाती,
वर्षा मागुनी वर्षं ही जाती
सृष्टीचे ही नियम सांगती,
दिवसानंतर रात्री येती ।।

पण, काळ ही बदलतो
नच थांबतो कोणासाठी.
म्हणूनच, आपण का थांबायचे,
कोणासाठी ? ।।

लक्ष योनीतून प्रवास करताना
प्राप्त होतो, मनुष्य जन्म हा,
मृत्यूनंतर ही पुन्हा हाच जन्म,
मिळेल कशावरून ? ।।

आज अश्रु नयनी येतील–
पितृ- प्रेमाची स्मृती जागवितील
"छत्र" हरविले म्हणून का आपण,
स्वस्थ बसणार ? ।।

आज वेलीवर कळ्या आहेत–
त्याच उद्या फुले बनतील
उधळीत रंग सुवासाची,
पखरण करतील
आणि पुन्हा, तीही कोमेजून
निर्माल्य बनतील ।।

पुसून टाक दुबळे अश्रू
जाण स्वतःला, हे असेच चालणार,
काळाचे चक्र असेच फिरणार ।।

**दिलीप कुलकर्णी**
एम. ए. (इंग्लिश)





### क्रिकेट

माझे आयुष्य एक क्रिकेट आहे.
मी आहे फलंदाज
तर गोलंदाज समाज.
चेंडू म्हणजे कडवट बोल आहेत.
त्यांना हसत टोलावणं माझं काम आहे.
चौकटीतले क्षेत्ररक्षक सज्ज आहेत.
यष्टिरक्षक सावधान आहे.
या सर्वांना चुकवून चौकार– षट्कार
मला मारायचे आहेत.
नाही जमली सेंच्युरी तरी,
अर्धशतक झळकवायचे आहे.
नि एक दिवस हसत हसत,
'सेल्फ आऊट' व्हायचे आहे.

**द. ज. निंबाळकर**
एम. ए. (मराठी)

### निःशब्द

निःशब्द भावनांना
शब्द- बद्ध करण्याचा
वेडा अट्टहास माझा
मृगजळाच्या प्राप्तीसाठी
दूर-दूर धावण्याचा––
वेडा अट्टहास माझा
दवबिंदूची हवी क्षणिकता
तरल धुक्याचे वस्त्र हवे
निसर्गाची हवी चंचलता
निरागसतेचे बंध हवे
निःशब्द भावनांना
शब्द-बद्ध करण्याचा
वेडा अट्टहास माझा

**जे. डी. शेंडे**
एम. ए. (राज्यशास्त्र)

### कामगार

कोण गाडला शेणात पिचुनी
कोण खपला रात्रीचा दिवस करुनी
वा कोण मेला चरकात तुटुनी
माजलेल्या समाजाला नाही त्यांची क्षिती !
युगानुयुगे केली हमाली
लादली ओझीच उरी–पाठी
तरी नागडी पोरे फिरती
भाकरीच्या चतकोरासाठी.
रेशनच्या लाईनीतही मिळेना काही
महागले फुकटातले ते पाणीही
रातच्या स्वप्नातली हिरवळ सडली की,
त्या नशेतच, मांस ओरबाडलं गिधाडांनी
का बांधले समाजवादी पुतळे ?
उडवा खुशाल ठिकऱ्या घालुनि गोटे !
मांडा चूल त्यांची रस्त्यावर
जळोत त्यांवर कितीक भकाळ पोटे !

**एस्. एम्. टेंबरे**
एम्. ए. (मराठी)

अमर वेदना की गायिका :

# महादेवी वर्मा

धालपे एस्. एम्.
टी. वाय. बी ए.

इंग्लैंड की प्रधानमंत्री श्रीमती मार्गारेट थैचर के हाथों हिन्दी साहित्य जगत् की सर्वश्रेष्ठ कवियित्री महादेवी वर्मा को डेढ लाख रुपयों का ज्ञानपीठ पुरस्कार उनके 'यामा' काव्यसंग्रहके लिए मिला। "आधुनिक युग की मीरा" का यह बहुमान उचित समय पर ही किया गया। उनके काव्य-संग्रह नीहार, रश्मी, नीरजा और सांध्यगीत से चुनी हुई कविताओं का संकलन यामा है।

बचपन में हिन्दी पाठ्यपुस्तकों में जब मैं उनकी कहानियाँ पढ़ती थी तो मुग्ध सी रह जाती थी। उनकी भाषा हृदय को छूनेवाली है। उनकी सिर्फ छोटी-छोटी कहानियाँ एकबार पढ लेने पर तो उनका अन्य साहित्य पढ़ने को भी मेरा जी ललचाया। और उसी समय से मुझे महादेवी के साहित्य के प्रति विशेष रुचि और आकर्षण पैदा हुआ।

व्यक्तिगत जीवन में भाविक माँ और दार्शनिक पिताके संस्कारों से महादेवी का व्यक्तित्व उभरने लगा। आयु के तेरहवें वर्ष में ही आप विवाह-बद्ध हो चुकीं। परंतु समझदार हो जाने पर खुद ही आपने यह विवाह अमान्य कर लिया और अपने आप को साहित्य के विराट् क्षेत्र में समर्पित कर दिया।

उनके समूचे साहित्य के सूक्ष्म अध्ययन से हम इस अनुमान तक पहुँचते हैं कि उनका समूचा जीवन 'वेदना' से परिवृत है। यही कारण है कि 'वेदना' ही उनके काव्य का मूल भाव है। दुख की सीमा को ही वे चिरसुख मानती हैं। वेदना की चरम अनुभूति सत्य को कैसे स्पर्श करती है यह महादेवी ने अच्छी तरह से जान लिया। यही कारण है कि उन्हें दुख अधिक प्रिय है। वे अगर वर माँगती हैं तो इस प्रकार

प्रिय जिसने दुख पाला हो
वर दो, यह मेरा आँसू
उसके उरकी माला हो।

महादेवी वेदना की गायिका है। वह स्वयं अपने आप को दुख की बदली मानती हैं—

मैं नीर भरी दुख की बदली
स्पंदन में चिर निःस्पन्द बसा
क्रदन में आहत विश्व हँसा।

महादेवी छायावादी काव्य की आधार स्तंभ हैं। सृष्टि के साथ उन्होंने इतना तादात्म्य प्रस्थापित किया है कि उनकी कविता पढ़ने से पूरा प्राकृतिक दृश्य आँखों के सामने साकार हो उठता है। जैसे

चुभते ही तेरा अरुण बाण
बहते कण कण से फूट, फूट
मधु के निर्झर से सजल गान।

महादेवी के मन में अलौकिक के प्रति जिज्ञासा है। दुख को दूर करनेवाला आखिर यह है कौन ? महादेवी के हृदय में करुणा के समान दुख की भी व्यापकता है।

महादेवी जब सृष्टि की विराट्ता का आकलन करती हैं तो सोचती हैं, यह कौन चित्रकार है जिसनें सोने जैसा दिन और मोती जैसी रात बनायी है। साँझ सुनहली और प्रातःकाल गुलाबी है। उसे रंगानेवाला आखिर है कौन ? उगते हुए चाँद को देखती हैं तो सोचती हैं चंद्रमा जैसे उगता है तो नींद ही आती है। ऐसा लगता है रजनीबाला चाँदी के प्याले में नींद को घोलकर सबको पिला रही है।



जब महादेवी के पति का देहावसान हुआ तो उन्होंने परमात्मा को ही प्रियतम मान लिया। इसलिए वे कहती हैं कि हम और तुम दूर होने पर भी मैं अखंड सुहागिनी हूँ। वेदना ही उनकी दृष्टिसे अत्यन्त पूर्ण है। वेदनासे उनका अटूट नाता है। उनकी दृष्टिसे विरह के जलमें ही यह जीवनकमल उगा है।

दीपक उनका प्रिय प्रतीक है। वे आत्माको दीपक कहती हैं। उसे वे जलने की प्रेरणा देती है वे दीपक से कहती हैं तेरा प्रकाश चारों ओर फैलाता जा। जितने भी शीतल, कोमल नूतन हैं ये सारे तेरे जलन के टुकडे हैं। संसार में त्याग की भावना कहीं नहीं है। तुझमें मिलकर भी मैं जल नहीं पायी। जलकर भी तुझमें सिहरन होती है। संसार में जलनेवाले बहुत हैं लेकिन उनमें स्नेह नहीं है। सागर भी तो जलता है; बादल में भी तो आग है, परंतु तुझमें जो स्नेह है वह विशेष है।

महादेवी का समूचा साहित्य पढने पर यही प्रतीत होता है कि वे दुखकी गायिका हैं। लेकिन जब कोई उनको मिलने जाता है तो बिल्कुल अचरज में पड जाता है क्योंकि वह इसकी प्रतीक्षा में होता है कि गंभीर चेहरे पर दुखका मुखौटा लगाई हुई स्त्री सामने आ जायेगी और उसकी बातें भी गंभीर एवं दुखी होंगी लेकिन जो भी लोग उनसे मिलकर आये हैं उन्होंने अपना अनुभव इन शब्दों मे प्रकट किया है कि महादेवी से बातें करते समय वे कभी गंभीर नजर नहीं आती बल्कि खूब हँसती हुई बातें करती हैं। और उनका व्यक्तित्व बडा ही शान्त एवं प्रसन्न है।

❊ ❊

# आँख फूटी पीर गयी

मिसाळ दयानंद
एम्. ए. हिंदी ( II )

"माँ जी, ओ माँजी"

"क्या है ?" गोदावरी ने तरसकर कहा।

"देखिए बंटी यहाँ सोया हुआ है, इसे जगाना मत"

"अरी, उसने दूध भी लिया है या......" आते आते गोदावरीने कहा। उसको रोकते हुए बहूने कहा-

"हाँ, हाँ दूध पिलाकर ही तो सुलाया है और दवा भी दी है" तो गोदावरीने पलंगपर बैठते कहा—

"बहू, मुझे इतनी सारी सूचनाएँ देकर तू कहाँ चली ?" पर्स उठाते हुए बहूने कहा--

"रात को वो शांति आयी थी न मेरो सहेली"

"हाँ, आयी तो थी"

"उसकी माँ बहुत बीमार है उसे देखकर आती हूँ"

"अच्छा, जरा जल्दी आना"

"हाँ" कहकर बहू चल पडी और दो चार कदम ही चली थी कि फिरसे वापस आयी और कहने लगी--

"बंटी की दवाइयाँ छोटी अलमारी में रखी हैं, अगर मुझे देर हो गयी तो छः बजे उसे दो टिकियाँ और एक चम्मच दवा दे दीजिए" और फिरसे पर्स

उस हाथमें बदलते हुए चल पडी।

गोदावरी ने उठकर दरवाजा बंद किया और वहीं फर्शपर लेट गयी। इतनेमें दरवाजेपर किसीने दस्तक दी। गोदावरी उठ गयी। फिरसे दरवाजे की खटखटाहट सुनकर अंदरसे ही कह उठी–

"कौन है, आयीऽ जरा लेटने नहीं देते।" कहकर दरवाजा खोला तो बाहर राधा खडी थी। जिसने गोदावरी के पडोस में पच्चीस साल गुजारे थे। अब दोनों बुढियाँ एक दूसरे को देखकर आनंदित हुओं।

"अरी राधा तू!" आश्चर्यसे गोदावरी बोली।

"हाँ, जरा चूडियाँ देखने गयी थी, सोचा तुझे भी मिल के जाऊँ और बंटी को भी देखते जाऊँ" हँसते हुए राधाने कहा। दोनों बुढ़ियाँ बंटी के पलंग के पास बैठ गयीं।

"चलो अच्छा हुआ लेकिन बहू घरमें नहीं है। चाय वाय तो मुझे ही बनानी पडेगी" कहकर गोदावरी उठने लगी तो राधा ने उसका हाथ पकडकर कहा।

"अरी तू मिल गयी यही खूब हुआ, चाय की क्या पडी है।

"अच्छा! चायके लिये तो आयी और ऊपरसे ये बहाने" कहकर दोनों बुढ़ियाँ हँसने लगीं, तो राधाने उसे धकेलकर कहा, "देख अब जाने का समय हुआ है तब भो तेरी ये आदत नहीं गयी। खैर, बंटी अब कैसा है।"

"ये देखो सोया है" बंटी की तरफ इशारा करते हुए गोदावरीने कहा "दवादारू तो रोजकी है लेकिन सात दिन हुए हमेशा पड़ा रहता है।" बातोंही बातोंमें गोदावरीने चाय भी बनायी। तो राधाने कहा–

"अरी गोदा तुझे मालूम नही मैंने कभी चाय पी भी है?" तो हँसकर गोदावरी ने कहा–

यहाँ कौनसे पैसे देने हैं? मुफ्त की शराब तो काजी को भी हलाल है। लो पिओ, और अब जाने का ही समय हुआ है तो कौनसे जवानी के दिन देखने हैं?" राधा ने चुपसे चाय ली। दोनों ने चाय पी और खाली कप रख दिए। गोदा कप उठाकर अंदर रख आयी तो राधाने कहा, "अच्छा मैं चलती हूँ, देरसे बैठी हूँ" वह चलने को थी कि, अचानक उसकी नजर किसी कागज़ के पुर्जेपर गयी।

"बंटी के पायताने ये पुड़िया कैसी है गौदा देखो तो" "होगी ऐसी ही।" गोदानें बिना किसी भाव से कहा और वह पूडी उठायी। "अच्छा ये लो, देखो क्या है।" राधाने वह लेकर खोल दी और बड़ा सा मुंह बनाकर कहने लगी–"तौबा तौबा गोदा, ये तो किसी चुडैल का काम है। ये तो किसी की मृत्यु का प्रबंध किया है। "भगवान" वह घबराकर बोली, "देखूं तो क्या है।"

"अरी देखती क्या है? ये तो टोना है टोना! जाकर जल्दी से पुजारी जी से कहना होगा।" तभी उसकी पडोस की एक औरत आयी और आते ही कहने लगी–

"अरी गोदा, मैं देखती हूँ, बहू को तो तेरा बंटी एक आँख भी नहीं भाता" दोनों ने उस की तरफ देखा। वह अंदर आयी और आगे कहने लगी– "तेरी बहू के लक्षण कुछ अच्छे नहीं दिखाई देते। एक दिन वह तुम्हारी भी अर्थी का प्रबंध न करेगी तो मेरा नाम नहीं, हाँ"। जैसे कहने का इरादा ही करके आयी थी ऐसा वह बोलने लगी थी। "खुद तो कोखजली और ..." उसने कोई कसर नहीं छोडी थी। इतने में बहू आयी। तो वह धीरेसे कहने लगी–

"लो, देख लो कैसी चोरी-छिपी सुनती है।" गोदावरी गुस्से से आगबबूला हो गयी।

"चुडैल कहीं की, चोरी-छिपी सुनती है, हराम का खाती है और मेरे बच्चे को मारनेपर तुली है।" बहू की समझ में कुछ भी नहीं आ रहा था।

"ये आपको आज क्या हो गया है माँ जी?" तब गोदा गुस्से से बोली–

"हाँ हाँ हमें नहीं तो और किसी को क्या होगा? कोखजली कहीं की" सुनकर बहू को बड़ा दुख हुआ। आते आते सुने हुए संवाद भी विषभर बाणों के समान उसके हृदय में उतर गये थे।

"ऐसी बात मत कहिए माँ जी।" उसका स्वर दुखसे भरा था। "अब पुजारी जी को बुलाना ही होगा" राधाने कहा।

थोडी ही देर में "ओऽऽऽम् – ओऽऽऽम् का जप करता हुआ हाथ में लोटा जिसमे दो हड्डियाँ भी थीं, लिया हुआ पुजारी आया। पीछे चार–छः औरतें भी आयीं। आतेही पुजारीने पुड़िया लेकर बुरासा मुँह बनाया और खोल दी। तब तक बच्चों की भी भीड़ लगी थी। सभी झुक–झुककर उस बँधे हुए कागज़ में से निकली हुओ वस्तुओं को देखने लगे। उसमे से लाल कागज़ निकला और उसमें लिपटी हुओ कई चीजें थीं। लौंग, इलायची और न जाने क्या क्या।

सभी चीजें फर्शपर बिखर गयीं। साथ़ में सुपारी भी थी जो लाल-लाल सिंदूर से भरी थी। सभी एक दूसरे का मुंह ताकने लगे। तो पुजारी ने कहा–

"लो बला तो खुल गयी।" फिर कुछ सोचकर कहा, "ये काम तेरे बैरी का हैऽऽ। वो तो दिन-रात इसी चिंता में रहता है कि, तेरा बच्चा मर जाय और सारा माल उसे ही मिल जाय।"

बहू के शरीर में सिहरन सी दौड गयी। "क्यों झूठ बकता है रे बदमाश" वह तिलमिला उठी। उसने दोनों हाथोंसे अपना मुँह ढँक लिया। तो पुजारी उसके पास गया और कहने लगा––

"आँखें बंद करने से तो होनेवाली बात नहीं टलती" उसकी आवाज़ सुनकर वह चौंक उठी। वह रो रही थी। उसके सामनेही वह पुजारी भूतनाथ खड़ा था। उसने गौरसे देखा तो वह काँप उठी।

उसका चेहरा क्रूर और काला था। मालूम नहीं होता था कि, माथेका अंत कहाँ और सिर का आरंभ कहाँ। सिर से पैर तक एकही रंग था। आँखें लाल थीं। मुंह खोलने से पीले पीले दांत दिखाई देते थे। लगता था, आज तक कभी माँजे भी थे या नहीं। वह खुद ही भूत नज़र आता था। एक हाथ में नीम की टहनी थी और वह ऊपर–नीचे हिला रहा था। दूसरा हाथ पीठपर रखा था। उसकी ऊटपटांग बातें सुनकर बहू का सिर चक्कर खाने लगा था।

उसकी कोई बात सुनने को ये राजी नहीं थे और असत्य से समझौता करना तो इस के स्वभाव के प्रतिकूल था। सभी लोगों की आँखें उसी की तरफ लगी हुओ थीं। अब बंटी का दवा देने का समय हो रहा था और कोई भी उसे दवा देने के पक्ष में नहीं था, सिवाय बहू के।

शाम के छः बज चुके थे। गोदावरी का बड़ा बेटा आनंद दफ्तर से आ रहा था। अपने घर के सामने भीड़ देखकर वह तेज कदम उठाने लगा। वह आश्चर्य में पड़ गया। भीड़में से वह अपनी बहू के पास गया तो वह उसके गले में पड़कर फूट–फूटकर रोने लगी।

"अरी, ये क्या माजरा है। अरी सुनो तो, तू क्यों रो रही है?" और माँ से कहा––

८. श्री. अजित शहा (वडुजकर) पारितोषके

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. मोहन जाधव | एम्. कॉम्. | प्रथम | रु. ५० |
| २) श्री. राजीव देशपांडे | बी. कॉम्. | अकौन्टन्सी- प्रथम | रु. २० |

९. श्री. के. वाय्. जगताप (मॅजिस्ट्रेट) पारितोषके

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. सुरेश मोरे | बी. ए. | मानसशास्त्र- प्रथम | रु. ५१ |
| २) श्री. राजेंद्र जगदाळे | बी. ए. | मराठी- प्रथम | रु. ५० |

१०. सौ. वासंती भगवानराव खारतुडे पारितोषिक

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. स्वाती जोगळेकर | बी. ए. | इंग्लिश- प्रथम | रु. ३५ |

११. प्रा. आर. एच. चाफेकर पारितोषिक

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. सुनंदा व्यवहारे | प्रथम वर्ष शास्त्र | प्रथम | रु. ५१ |

१२. प्रा. व्ही. व्ही. उपाध्ये पारितोषिक

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. स्वाती जोगळेकर | बी. ए. | इंग्लिश- प्रथम | रु. ५१ |

१३. प्रा. डॉ. डी. टी. पाटील पारितोषिके

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. शोभा कुलकर्णी | एम्. ए. | मराठी- प्रथम | रु. २५ |
| २) श्री. राजेंद्र जगदाळे | बी. ए. | मराठी -प्रथम | रु. २५ |

१४. प्रा. एस. पी. कदम पारितोषिक

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. रत्नप्रभा तावरे | प्रथम वर्ष कला | समाजशास्त्र- प्रथम | रु. ३१ |

१५. प्रा. व्ही. ए. संगई पारितोषिक

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. मीना संगई | प्रथम वर्ष कला | इतिहास- प्रथम | रु. २५ |

## विविध शिष्यवृत्त्या व फ्रिशिप्स मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९८३-८४

**शिष्यवृत्त्या**

| | |
|---|---|
| १) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती. | ४ |
| २) राज्यसरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती. | २१ |
| ३) राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती. | ३ |
| ४) गणेश मनोहर व शंकरराव गणेश दाते ट्रस्ट (पुणे) शिष्यवृत्ती | ५ |
| ५) श्री. साईबाबा संस्थान शिर्डी शिष्यवृत्ती | १ |
| ६) हिन्दी शिष्यवृत्ती | १ |
| ७) श्रीमती लक्ष्मीबाई श्रीपाद अलूरकर शिष्यवृत्ती | १ |
| ८) दक्षिणा फेलोशिप | १ |
| ९) फ्रीडम फायटर स्कॉलरशिप | ४ |
| १०) बी. सी. स्कॉलरशिप | १७४ |
| ११) कॉलेज मेरिट स्कॉलरशिप | ८८ |
| १२) फिजिकली हॅन्डीकॅप्ड स्कॉलरशिप (८२-८३) | ५ |

**फ्रीशिप्स**

| | |
|---|---|
| १) ई. बी. सी. फ्रीशिप | १०६७ |
| २) ई. बी. सी. फ्रीशिप (राज्यसरकार) | २९ |
| ३) बी. सी. फ्रीशिप | ९ |
| ४) प्रायमरी टीचर फ्रीशिप | ७९ |
| ५) एस्. एस्. सी. डी. एड. फ्रीशिप | २ |
| ६) कॉलेज मेरिट फ्रीशिप | १५ |



अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय**
**बारामती**

॥ अनन्तधर्मणस्तत्त्वं पश्यन्ती प्रत्यगात्मनः ॥
॥ अनेकान्तमयी मूर्तिनित्यमेव प्रकाशताम् ॥

# अनेकान्त

वार्षिक नियतकालिक

**(कनिष्ठ)**

**१९८३-८४**

**अनुक्रम**

● संपादकीय (१)

**कथा**

★ भरती / धनंजय शिन्दे (३) ● तो नि ती / कु. सविता वाघ

**कविता**

★ वाटचाल / नरसिंग देवकाते (८) ★ आनंद / नरसिंग देवकाते (८) ● कविता / विश्वास आगवणे (८) ● प्रेम / गजानन जिरंगे (९) ● लॉटरी / आर्. बी. टाकळे (९) ● आजचा उमेदवार / एस्. बी. घोळवे (९)

**कार्यवृत्तान्त - १० ते १४**

## संपादकीय

कनिष्ठ महाविद्यालयाचा स्वतंत्रपणे प्रकाशित होणारा 'अनेकान्त' चा दुसरा अंक आपल्या हाती देत आहोत.

आपले महाविद्यालय कनिष्ठ व वरिष्ठ अशा स्तरांचे मिळून बनलेले एकसंघ महाविद्यालय आहे. वस्तुतः महाविद्यालयाचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम नवे उपक्रम व योजना इ. बाबतीत दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा संयुक्तपणे सहभाग असतो. पण तरीही, अभ्यासक्रम, क्रीडाविषयक घडामोडी इ. बाबतीत कनिष्ठ महाविद्यालयाचे वेगळेपण जाणवणारे आहे. विशेषतः या महाविद्यालयातील विद्यार्थी १७–१८ वर्षाच्या उसळत्या रक्ताच्या वयोगटातील असतात. तारूण्याच्या उंबरठ्यावरील स्वप्नमयता व जीवनातील प्रखर वास्तवता यांच्या सीमारेषेवर वावरणारे असे त्यांचे स्वतंत्र भावविश्व असते. त्यांचे वैशिष्टचपूर्ण असे सामूहिक व्यक्तिमत्वही या महाविद्यालयात जाणवते. त्यांच्या साहित्यगुणांना मुक्तपणे वाव मिळावा व क्रीडाक्षेत्रातील नैपुण्याची स्वतंत्रपणे नोंद करावी या उद्देशाने गेल्या वर्षापासून कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियतकालिकाचे स्वतंत्र संपादन मुद्दाम केले जात आहे. विद्यार्थ्यांनी याचा मनसोक्त फायदा घ्यावा अशी अपेक्षा आहे.

यावर्षीच्या अभिनंदनीय नि अभिमानास्पद अशा दोन घटनांचा येथे सर्व प्रथम उल्लेख करावा लागेल.

आपले प्राचार्य **डॉ. जे. के. गोधा** यांची पुणे विद्यापीठ कार्यकारिणीवर प्रचंड बहुमताने निवड झाली याबद्दल सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना अत्यंत आनंद व अभिमान वाटत आहे. तसेच कनिष्ठ महाद्यिालयातील डॉ. एन्. एन्. पाटील व डॉ. ए. एन्. फड या प्राध्यापकद्वयांनी अनुक्रमे वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र या विषयान्तर्गत संशोधन करून मराठवाडा विद्यापीठाची पी. एच्. डी. ही उच्च पदवी प्राप्त केली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! महाविद्यालयाच्या दृष्टीने या दोन्ही घटना निश्चितच गौरवास्पद आहेत.

कला – क्रीडा क्षेत्रातील विशेष घटनांची नोंद कार्यवृत्तान्तात केली आहेच. पण 'कथा–कविता–लेख' स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा जो अत्यंत अल्पसा प्रतिसाद मिळाला याची सुद्धा अत्यंत खेदपूर्वक नोंद करावी लागत आहे.

विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांच्या आविष्काराला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आपले प्राचार्य अनेक नवनवीन स्पर्धा व योजना सतत राबवीत असतात. पण त्यांचा फायदा घेण्याची, काही नवीन शिकण्याची वा नवनिर्मितीची वृत्तीच विद्यार्थ्यांमध्ये आढळत नाही. हे असे का आहे कळत नाही.

आजच्या तीव्र संघर्षाच्या जगात यशस्वीपणे व आनंदाने जगायचे असेल तर विशेषतः १७–१८ वयाच्या विद्यार्थ्यांना आत्मशोध करावा लागेल. आपल्या अंगी असणाऱ्या गुणांची कधी कधी आपल्यालाच ओळख नसते. आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून आपले नित्यनूतन व्यक्तिमत्व घडवावे लागेल. आम्ही तुमच्यासाठी योग्य व्यासपीठ तयार करून देऊ. पण त्यावर आत्मविश्वासाने तुम्हालाच वावरावे लागेल.

विद्यर्थी मित्रांना एवढीच मित्रत्वाची सूचना.

ज्यांचे साहित्य प्रकाशित होऊ शकले नाही त्यांनी पुनः प्रयत्न करावा. योग्य त्या ज्येष्ठांकडून मार्गदर्शन घ्यावे.

या अंकाच्या निर्मितीत साहित्यरुपाने व इतर दृष्टीने ज्यांनी ज्यांनी साहाय्य केले त्या सर्वांचे मनपूर्वक आभार.

# भरती

धनंजय शिन्दे
१२ वी वाणिज्य

आज निराश वाटत होते. तसे रोजच वाटते. रात्रही न् दिवसही. उदास, नीरस आणि सुन्न वाटणारी रात्र तिच्या मागोमाग उगवणारा दिवसही तसाच.

परंतु अशा नीरसतेतूनही त्याच्या आशावादी मनाला जळी–स्थळी, काष्ठी–पाषाणी ( आणखी काही. शिल्लक असेल तर त्यातूनही ) एकच गोष्ट दिसत होती. नोकरी ! जीवनामध्ये बाळगलेले एकच एक स्वप्न! मोठ्या पगाराची नोकरी हेच त्याच्या जीवनातील एकमेव ध्येय होते. हे ध्येय गाठण्यासाठी तो सकाळीच घराबाहेर पडत असे. सिटी–बसेस मध्ये स्वतःला कोंबून विविध कार्यालये, कारखाने, छोटया–मोठ्या कंपन्या यांच्या चकरा मारणे हा त्याचा दिनक्रम. रोज वाचनालयात बसून वर्तमान पत्रांतील नोकरीच्या जाहिराती हुडकून त्यावरून अर्ज करणे आणि मग सुरु होत असे. कॉल–लेटर, इंटरव्यू चा कधीही न संपणारा रटाळ कार्यक्रम. आता हे रोजचेच होऊन बसले होते.

शहरातील वातावरण, तेथील आचार–विचार, मोठ–मोठया सडका, उतुंग इमारती या सर्वांशी तो परिचित झाला होता. गावी असणाऱ्या एकुलत्या एक कॉलेजमधून त्याने एम्. ए. ची पदवी संपादन केली होती. आणि नोकरीच्या शोधार्थ महानगरी मुंबई गाठली होती. महानगरातल्या सर्वात गलिच्छ वस्तीत त्याने एक खोली मिळवली होती त्यावेळी त्याला एम्. ए. ची पदवी मिळाली त्यापेक्षा जास्त आनंद झाला होता. रात्रीच्या निवाऱ्याची सोय झाली होती. आसपास घाणीमुळे दुर्गंधीचे भपकारे येत. सगळीकडे गटाराने झालेली चिकचिक परंतु आता त्याला या सर्व गोष्टींची सवय झाली होती. खरे म्हणजे चाळीस रुपयांमध्ये तो हवेशीर खोलीची कल्पनाही करु शकत नव्हता. तसा त्याचा एक फायदाही होत होता. वस्तीतील बऱ्यापैकी लोकांच्या चार–पाच मुलांची ( चार–पाच यासाठी की, त्यातील एखादा कमी अथवा जास्त होत असे. ) तो शिकवणी घेत असे. त्यातून त्याला कसेतरी साठ–सत्तर रुपये मिळत. त्यामुळे खोलीचे भाडे आणि ( खानावळीतील निकृष्ट ) जेवण यांचा प्रश्न सुटला होता.

सकाळचा चहा घेवून तो नोकरीच्या शोधार्थ निघत असे व रात्री उशीरापर्यंत भटकत असे. नाहीतरी गुदमरून टाकणाऱ्या खोलीपेक्षा तेच त्याला बरे वाटत असे. जीवनातील सर्व आशा–आकांक्षा, उत्साह मातीमोल झाला होता. उत्तुंग इमारती, मोठे सिनेमा हॉल, पॉश हॉटेल्स, हवेशी स्पर्धा करणाऱ्या इंपोर्टेड मोटारी सर्वकाही निरर्थक, नीरस वाटत होते. जगात आपल्या शिवाय सर्वजण आनंदित आहेत असे त्याचे प्रामाणिक मत होते.

महानगरी ! म्हणजे जशी काही नोकऱ्यांची गुदामे. काय पाहिजे तुम्हाला ? नोकरी ! या, झाडाला लागल्या आहेत .घ्या तोडून! वशिला आहे तुमच्याजवळ ? नाही? चालेल. पैसा आहे ? असेल तर या, बोला कोणती नोकरी पाहिजे ? क्लार्क– पाच हजार, कॅशियर– दहा हजार! काढा. काय म्हणाला ? काही नाही ? फुटा ? पुढे जा. अरे पदवीला विचारतो कोण ? तुमच्या सारखे कितीक पदवीवर जोडे झिजवीत फिरत आहेत.

इंटरव्ह्यू घेंणारे अधिकारी तिरकस पाहून गालातल्या गालात हसत आहैत. जसे काही त्यांना म्हणायचे आहे –अरे ! ही मुलाखत म्हणजे देखावा . कशासाठी वेळ खर्ची करता ? ह्या जागा तर वर्तमानपत्रात जाहिरात देण्यापूर्वीच भरलेल्या आहेत.

रस्त्यातून भटणारे लोकही असे भेटतात की जसे काही त्यांना म्हणायचे आहे–– बेकार आहेस तरूण माणसा ? (बहुतेक वेळा नोकरीच्या ध्यासानें हा तरूण माणूस खप्पड म्हातारा झालेला असतो) केव्हापासून बेकार आहेस ? काय ? दोन वर्षें, अकरा महीने, नऊ दिवसांपासून ? आश्चर्यच आहे ! इतक्या दिवसांपासून बेकार आहेस आणि अजूनही आत्महत्या केली नाहीस ? काय अडचण आहे ? हजारो कोरड्या विहिरी आहेत देशात. मार उडी. रेल्वे धडधडत जात–येत आहेत. झोप रूळावर. काळजी करू नकोस. कोणीही उठवणार नाही. नाहीतरी उंच इमारतींना कुठे तोटा आहे ? लिफ्टने वर जा. आणि लिफ्ट शिवाय सरळ खाली ये काय ? यापैकी काहीच करू शकत नाहीस ? मग बाळ दिनेश फडके. M. A., आमच्या जवळ कोरड्या सहानुभूतीशिवाय काहीही नाही. पाहिजे का ?

विविध विचारांनी त्याचे मन उतू चालले होते. आणि त्यावर फुंकर घालायला कोणी असणार नव्हते. आज तो सकाळपासून फिरत होता. त्याच्या चालण्यात कसलाही खंड पडत नव्हता. त्याचबरोबर मनात चाललेल्या विचारात देखील.

"ह्या नोकरी देणारांची स्टेनगनने चाळण केली पाहिजे." हे तो आतापर्यंत हजारवेंळा तरी म्हणाला असेल." साले! कागद इकडचा तिकडे करायला पैसे मागतात "कमवा! कमवा, हरामाचा पैसा, काळा पैसा, पांढरा पैसा, तांबडा पैसा, निळा पैसा, हिरवा पैसा ....." आणखी असेच काही बडबत राहिला. कधीकधी त्याची वेड्यासारखी अवस्था होत असे. आणि मग सारी मळमळ तो ओकत असे. जगाविषयी, स्वत:विषयी. आताही असेच काही तो करीत होता.

"देश गरीब आहे! लोक गरीब आहेत ! मला तर साला एकही दिसत नाही. मटण–मुर्गी काय ! टेरीलीन टेरीवूल काय! सिनेमागृहात गर्दीचा सागर उसळला आहे. व्हिस्कीं काय पितात, महागड्या गाड्यांतून काया फिरतात. आणि हे म्हणे गरीब! हरामखोर साले. मला हे करता येत नाही माझी तेवढी कुवत नाही. मीही हरामखोर, माझा बापही हरामखोर! त्याच्यामुळे तर हे एवढ रामायण घडतंय!" आणखी असेच कांही म्हणत राहिला. आणखीही तो बडबडत राहिला असता परंतु विचाराच्या तंद्रीत तो दारूच्या अड्डयासमोर आला होता. हे व्यसन कधी लागले हे त्याला स्वत:लाही आठवत माही. आता खिशात शिकवणीचे मिळालेले पैसे होते आणि मनात विचारांचे उठलेले वादळ.

तो पटकन आत शिरला. जेव्हा बाहेर निघाला तेव्हा खिशात टच्च भरलेली बाटली होती. तिथून तो निघाला. चौपाटीवर पोहोचला तेव्हा नुकतेच अंधारुन आलेले होते. मोकळ्या जागेवर स्थानापन्न झाल्यावर त्याने खिशातून बाटली काढली. बूच उडवून त्याने बाटली तोंडाला लावली आणि मोकळी झालेली बाटली समुद्राच्या दिशेने फेकली.

तो तसाच धडपडत उठला. अडखळत चालू लागला. थोडे अंतर चालून गेल्यावर कांहीतरी आठवल्यासारखा उभा राहिसा आणि मग मोठमोठ्याने, भाषण करणाऱ्या पुढाऱ्याच्या आवेशात बोलू लागला––

"बंधूंनो, भगिनींनो, मातांनो... मी... जगातील सर्वात सुखी माणूस आहे. अरे, नोकऱ्या नोकऱ्या काय... मी हजार नोकऱ्यांकर थुंकतो. ऑक् थूऽऽ... तुम्ही माझ्या बरोबर चला. अरे, पैसा पैसा काय ? आँ ? बोलो, 'इन्कलाब... झिंदाबाद ! जो हमसे टकराएगा चूर चूर हो जाएगा, मी... दिनेश फडके... आँ... नाही मी साला कॉमरेड ताओ, माओ त्से तुंगचा बाप मी कॉमरेड ताओ, खलास करा या सर्व नोकरी देणारांना–– फायर ? धाड धाड... मी ताओ, माओचा बाप. ताओ, माओ... माओ ताओ... झिंदाबाद... मुर्दाबाद"

त्याचा आवाज अस्पष्ट होत होता. शेवटी शेवटी डुलत–डुलत तो उभ्यानेच कोसळला. तरीही त्याच्या तोंडून असंबद्ध बडबड चालू होती.

फिरायला आलेले लोक परतत होते. कारण, सागराला भरती आली होती. पाणी भराभर वाढत होते. आणि या कशाचीही जाणीव नसलेला दिनेश फडके चौपाटीच्या वाळूत तोंड खुपसून बडबडत पडला होता. भरतीचा जोर वाढतच होता.



# तो नि ती.

कु. सविता वाघ
१२ वी, कला

तो

आजचा दिवस किती भाग्याचा. किती आनंदाचा आज मला नोकरी मिळाली. कामावर रुजू झालो. आता आपण मिळवते झालो. हो घटना खरोखरच किती रोमांचकारी !

तसं माझं नोकरीचं गाव ढेबेवाडी काही मोठं नाही. गावात लाईट आहे. तशी हल्ली बहुतेक सवंच गावांत इलेक्ट्रिसिटी आलीय म्हणा. नळाना पाणी येतं. शाळा आहे. कॉलेजही आहे. गाव तसा पुढारलेला आहे. अर्थात गावात सगळीकडंच मोटार–सायकल्स, मोटारी दिसतात.

माझ्या ऑफिसमधले लोक तसे मनमिळाऊ आहेत. अर्थात मला लागून अद्यापि पुरते १५ दिवस सुध्दा झाले नाहीत. एवढ्यात सगळ्यांच्याच स्वभावाचा अंदाज बांधणे कठीण आहे पण त्यातल्या त्यात माझ्या बरोबरच रुजू झालेला जॉन स्वभावाने फार चांगला दिसतोय. आम्ही दोघंही एकाच दिवशी हजर झाल्यानं आमची मैत्री जरा जवळचीच आहे. जॉन माझ्या शेजारीच रहातो. जातीनं ख्रिश्चन असूनही तो तसं भासू देत नाही.

मला लागून आज महिना झाला. माझ्या ऑफिसला जायच्या रस्त्यानेच २ मुली रोज जातात. कोण असाव्यात बरं त्या ? पहिले काही दिवम मी केवळ एक योगायोग म्हणून दुर्लक्ष केलं, पण त्या रोजच भेटतात. दोघीही कॉलेजमध्ये शिकताहेत असं दिसतय. परवा त्यांना कॉलेजच्या फाटकातून बाहेर पडताना पाहिलं.

ती

सध्या कॉलेजला जाताना रोज दोन तरूण दिसतात. कोण आहेत कोणास ठाऊक. गावाबाहेरच्या सरकारी ऑफिसात कामाला असतात. आठ दिवसापूर्वा त्यांना ऑफीस सुटल्यानंतर बाहेर येताना पाहिलं.

तो

आज फार गंमत झाली. त्या दोघी गावाच्या जवळ जवळ बाहेरच्या बाजूलाच भेटल्या. आज ऑफिसला कसली तरी सुटी होती. म्हणून मी आणि जॉन फिरायला निघालो होतो. त्या दोघींना पाहताच मी 'जरा पास आओ तो चैन आ जाये' हे 'प्रिन्स' मधलं गाणं भोठ्याने म्हटलं ! त्या दोघी अशा लाजेनं चूर झाल्या की बस ! पण छे त्या केवळ लाजल्या म्हणजे त्या माझ्यावर फिदा झाल्या असं समजण्याइतपत मी मूर्ख नाही.

ती

आज बाकी त्या दोघांनी मजाच केली. अगदी शम्मीकपूरच्या स्टाईलमध्ये गाणी म्हणत होता त्यांच्यातला एक. मला तर बाई, त्याची ती स्टाईल फारच आवडली.

तो

त्या दोघी जाताना त्यांना माझ्याशी काही तरी सांगायचं असं वाटतंय्. पण रस्त्यात सगळ्यांसमोर कसं बोलायचं ?

ती

त्या गाणं म्हणणाऱ्याशी बोलायला मिळावं म्हणून मी धडपडतेय्. पण कांही गाठच पडत नाही निवांत जागी.

तो

आज त्या दोघींची नावं माहीत पडली. त्यांच्यातल्या एकीचं नाव 'आशा' आहे ती S.Y.B.A. ला शिकते.

दुसरीचं नाव 'विजया' आहे. ती P.D. ला शिकतेय. मला त्या दोघीं मधली धाकटी विजयाच आवडते. त्या दोघी शेजारी शेजारी राहतात. गावापासून अर्ध्या पाऊण मैलावर असलेल्या एका वस्तीवर त्यांच घर– घर कसलं बंगलाच म्हणाना– आहे. त्यांच्या कॉलेजमधले एक प्रोफेसर आमच्या शेजारी राहतात. त्यांच्या कडून समजलं.

ती

आज ते दोघे जरा आमच्या जरा जवळूनच गेले. जाताना त्यांच्यातला एक मला 'हॅलो विजया' म्हणाला त्यांना माझं नाव कसं कळालं असावं बरं. काल ज्यानं मला हाक मारली त्याचं नाव 'अशोक' आहे

तो

जॉन बेटा नशीबवान दिसतोय. त्याचं आशाशी सूत जमलं का ? काल आशा पुण्याला जाताना त्याच्याच गाडीत होती. पुण्याला दोघे फिरले, मजा केली, त्यांचं तिथंच जमलं. आशानं कॉलेज सोडलं. ती आता पुण्यातच राहणार आहे का कुणास ठाउक ?

मी विजयाशी बोलायला फार धडपडलो. पण ती भेटतच नाही. हसते नि लांबच पळून जाते.

ती

मी अशोकशी बोलावं म्हणून धडपडतेय् पण कुणी पाहिलं तर? म्हणून भीती वाटते. जर वडिलांना कुणी सांगितलं तर?

ती

आज मात्र माझं डोकंच फिरायची वेळ आलीय. मी ३–४ वेळा विजयाच्या मागं गेलो. पाठलाग केला. पण आयत्या वेळेला नेमका काहीना कांही अडथळा येऊन बोलणं अर्धवटच रहातंय्.

ती

अशोक नेहमीच माझ्या मागे येतात पाठलाग करतात. त्यांच्या मनात नेमकं काय आहे ? त्यांच. माझ्याबर प्रेम वगैरे ......? इश्श ! मी विचाराच्या भरात कुठल्या कुठं वाहवत चाललेय ?

तो

मला विजयाला फक्त एकच विचारायचंय् तुझं माझ्यावर प्रेम आहे की नाही ? पण कसं विचारावं तेच समजत नाही. ती पोरगी मला पाहून लाजते नि लांब पळून जाते. बरं कुठं एकांतात सुध्दा भेटत नाही. ती. आज सकाळी उडप्याकडं चहा घेत बसलो होतो ती रस्त्यानं चालली होती. एकटीच होती. रस्त्यावर वर्दळ ही नव्हती. ती माझ्याकड पाहून अशी काही गोड हसली की बस् ! 'कलिजा खलास झाला' ! पण तिचं नक्की माझ्यावर प्रेम आहे की नाही हे मी आजमावून पहायचं ठरवलंय्. तिला भेटायचं नाही जर भेटलीच तर लांबून जायचं. बघू खरंच तिचं माझ्यावर प्रेम आहे का ?

ती

आज काल अशोक असं का वागतात ? मला पाहून तोंड लपवतात. त्यांचं कुठ दुसरीकडे जमलं वगैरे ? छे ! छे! ! असा अभद्र विचार माझ्या मनात का यावा बरं?

तो

जॉन म्हणजे एक नमुनाच आहे. त्याचं आशावर प्रेम नाही' तो फक्त तिच्याशी खेळू इच्छितोय्. बिचारी आशा ! तिला कुणी तरी समजावून सांगायला हवं. जॉन ८–१० दिवसापूर्वी जाऊन एक मुलगी पसंत करून आलाय्. तिच्याशी तो लग्न करणाराय्. त्या शिवाय रोज गावात २–४ मुलींच्या मागं फिरत असतोच. परवा आशा आली होती. संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर आशा, विजया नि तो बोलत बोलत गेले. मी त्या दिवशी रजेवर होतो. त्यानं नंतर मला घरी येऊन सांगितलं

आज आम्हाला सुट्टी होती. संध्याकाळी विजया भेटली जॉननं तिच्याकडे आशा बद्दल विचारपूस केली. त्यांच्या गप्पात मला नीटसं बोलायला जमलंच नाही. नि तेवढ्यात विजयाच्या ओळखीचं कुणी तरी आलं नि ती झपाझप पुढं निघून गेली. आज आलेला मोका हुकला.

आज परत विजया भेटली पण ती जॉन बरोबर बोलत चालली होती. म्हणजे ती ही जॉनवर भाळली की काय? कारण नंतर जॉन मला म्हणाला 'यार! विजया भी मुझपर फिदा है' दोन मुस्कटात लावाव्यात वाटल्या. जॉनची मजल फारच पुढची आहे. त्या दोघींना एक दिवस मुंबईला न्यायचं, दोन दिवस फिरवायचं नि मजा करायची, लॉजमध्ये मुक्काम करायचा, नाही ! जॉन मी तसं होऊ देणार नाही ! विजया नि जॉन जेव्हा बोलत चालले होते तेव्हा विजया माझ्याशी तुसडेपणानं वागली. पण एक एक गोष्ट समजत नाही. विजयाला माहीत आहे की आशा जॉनवर प्रेम करतेय्. तरीही ती कशी काय भाळली त्याच्यावर ?

ती

आज अशोक मला जॉन बद्दल काहीच्या काहीच सांगत होता. पण जॉन तर बोलायला सभ्य दिसतो. मग 'तुमचं आयुष्य बरबाद करून घेऊ नका विजयाबाई' असं अशोक का म्हणाला ? कदाचित मी अशोकवर भाळले नाही म्हणून तर तो तसा म्हणाला नसेल ना ?

तो

जॉन पंधरा दिवस रजा काढुन गेलाय कुठ तरी. मसणात जाऊ दे. त्याच्याबद्दल मी विजयाला ३–४ महिन्यापूर्वीच सांगण्याचा प्रयत्न केला. पण ती "मला उपदेश करणारे तुम्हीं कोण टिकोजीराव ? माझा तुमचा काहीही संबध नाही. मग तुम्ही माझ्यामागं का येता ?" असे बोलून ताड ताड निघून गेली, मी त्यानंतर कसा जगतोय् ते तिला कसं सांगणार ? 'विजया' माझं तुझ्यावर प्रेम आहे. खरं प्रेम ! निस्सीम प्रेम ! तू माझी नाही झालीस तरी हरकत नाही, पण एका धोकेबाज नि घातकी माणसाबरोबर जाऊ नकोस! विजया, माझं ऐक !

विजयाचं दुःख कमी करण्यासाठी मी बदली करून घेतली आता माझं लग्नही झालंय. सोन्यासारखी पत्नीही मिळालीय्. माझं आता कसं मजेत चाललंय् गेल्या ८–१० महिन्यात जॉन नि विजया बद्दल काहीच कळू शकलं नाही.

आजच्या वर्तमानपत्रात एक बातमी आली. "ढेबेवाडी मधील २ तरुणींची आत्महत्या" ढेबेवाडी येथील 'कु. विजया केशव कुलकर्णी वय वर्षे १९ नि कु आशा प्रकाश प्रभुणे वय वर्षे २२ या दोन तरूणींनी आज एन्ड्रिन पिऊन आत्महत्या केली. त्या दोघींनाही दिवस गेले होते. बदनामीपासून वाचण्यासाठी त्यांनी आत्महत्या केली असावी, असा अंदाज आहे पोलीस तपास चालू आहे. विजया ! काय केलंस हे ! या वेळेवर दिलेला मदतीचा हात तू स्वीकारला असतास तर ? हे देवा ! काय केलंस हे ! तुला कुस्करून टाकायला हीच दोन फुलं मिळाली का ?

'आज जॉनच्या लग्नाची निमंत्रण पत्रिका आलीय पोष्टानं '

❊ ❊

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

---

राष्ट्रोद्धाराच्या झुंजीत अनेक महत्वाची नाकी लढवावी लागतात. त्यांत बंदीगृहाचा मोर्चा सगळ्यात कठीण, आणि तरीही अत्यंत आवश्यक असतो. मग तो चढविण्यास तुमची योजना झाली आहे हा काय त्या कर्तृत्वाचा थोडा गौरव झाला ! आणि एका अर्थी कसले कर्तृत्व घेऊन बसला आहेस ? तुझे, त्यांचे, ह्या सर्व मनुष्यजातीचे तर काय पण ह्या सूर्याचेदेखील ह्या प्रचंड विश्वाच्या उलाढालीत खरे पाहीले असता तिळमात्र तरी महत्व आहे काय ? एखाद्या साबणी फुग्यासारखा तो आता स्वतःच्या महत्वाभिमानाने फुगत उडालेला दिसतो आहे. पण एका क्षणार्धात विश्वाची मूळ शक्ती दुसरा एखादा खेळकर फुगारा मारताच फुस्दिशी नाहीसा होईल, तरी विश्व चालेलच ! म्हणून विवेक कर. सापेक्षात जे कर्तृत्व आहे त्याची खरी परीक्षा येथेच आहे. या कारागारात जो देशसेवा करील तो खरा देशसेवक. जे मूल्य दिल्याविना देशोद्धार होणेच नाही ते कारापीडनांचे मूल्य देणे म्हणजे जीवन व्यर्थ जाणे नव्हेच नव्हे. कीर्तीचे, लौकिकाचे, मानाचे मधाचे बोट त्यास लागलेले नाही. पण म्हणूनच ते अधिक अव्यर्थ होय.

**—स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर**

### वाटचाल

मी वाटचाल करतोय
अंधाराकडून प्रकाशाकडे
मला प्रकाश हवा आहे
अंधार काही संपेना –
तरी पण वाटचाल चालू आहे –
थकून गेलो तरी –
सांगणार कोणाला ?
आपलं ओझं आपणच सांभाळायचं
ठेचाळत, धडपडत असंच सतत
चालत राहायचं. चालतच राहायचं

### आनंद

असंख्य चांदण्या चमचमती गगनात
मन माझे न्हाऊन निघते अवीट आनंदात
कसे सांगू काय दडले माझ्या अंतःकरणात
येईल न कळत मनकवडा सांगेल कानात
मला तरी कुठे ठाऊक, काय आहे नशिबात ?
मी आनंद मानतो नेहमी हसण्यात
दुसरे आहे काय माणसाच्या जीवनात
स्वतःलाही विसरुन जावे दिव्य स्वप्नात
धुंद-फुंद व्हावे जगाच्या सौंदर्यात
मस्तकलंदर गात फिरावे त्या नादात
असेच वाहत जावे या जीवन-प्रवाहात
विना तक्रार स्वीकारीत - हार नि जीत !

**नरसिंग देवकाते**
१२ वी, कला.

### कविता

गगनाच्या पोकळीत भिरभिर वारा वाहे
आनंदुनि मुक्तपणे पक्षीगण उडताहे
वाऱ्यावरि उडणारे दोन सुबक पतंग
विहरोनी भूषविती गगनाचे अंतरंग
दिसती पहा मैदानी युवक उभे कुणी दोन
तेच निमूट चालविती सगळी सूत्रे तिथून
रोधक ते लहरीने फिरवतील जेवि हात
त्या तालावरि गगनी हे पतंग नाचतात
निमिष मनी माझ्या असले उठले तरंग
तेवढ्यात गगनाचे खळवळले अंतरंग
सोसाट्याने उठला वाऱ्याचा प्रबल झोत
बघुनि हे बहु झाला हर्ष सूत्रचालकास
जाणुनी कलहाला हाच खरा उचित काळ
चेतवुनी ते पतंग सोडुनि दिले खुशाल
होऊनी बेभान उभय झगडाया सज्ज होती
धाव धावुनी प्रहार एकामेकावरी करिती
लढता लढता झाले छिन्न भिन्न दोघे ही
वेडेपण ते बघुनी, वारा हसत राही
भांडुनिया आपसात ते पतंग अज्ञानी
न कळे कोठे गेले वाऱ्यावरी भरकटुनी
वरचेवर उचंबळून येई मनी एक विचार
कलहाचे चेतक जगी दुष्ट किती सूत्रधार

**विश्वास आगवणे**
११ वी, वाणिज्य.





### प्रेम

पाना रे पाना
तू कसे शोधतोस
नेमके तुझे झाड ?
काय रे पक्ष्या
तू कसे शोधतोस
नेमके तुझे घरटे ?
काय रे प्रियकरा
तू कशी शोधतोस
नेमकी तुझी प्रिया ?
का रे माणसा
तू कसा शोधतोस
नेमका तुझा स्वार्थ ?

**गजानन जिरंगे**
११ वी, वाणिज्य

### लॉटरी

फार फार वर्षांपूर्वी
ब्रह्मदेवाने काढली होती लॉटरी
पहिले बक्षीस ऐंशी कोटींचे
तर दुसरे होते साठ कोटींचे
तिकिटे लावली होती स्वस्तात
विक्रेत्यांना होते भरपूर कमिशन
पृथ्वीशिवाय इतर ग्रहांवर
तिकिटे विकण्यास होती बंदी
अनेक देशांनी घेतली तिकिटे
बसले वाट पहात 'ड्यू' डेटची
'ड्यू डेट आली, निकाल लागला
त्यात 'चीन' देश लकी ठरला
चीनला लागले पहिले बक्षीस
तर भारताला मिळाले दुसरे बक्षीस !
पण हाय ! रुपये नव्हे बरं का !
होते आकडे लोकसंख्येचे !

**आर. बी. टाकळे**
१२, वी कॉमर्स.

### आजचा उमेदवार

मागायला मागायला मागायला
आला बघा हा मतं मागायला.
दिसतोय कसा हा बघा जरा।
बगळ्याचावाणी करि नखरा।
फुकटचा खाऊन आमचा पैसा, करतोय आमचा
कोंडमारा, लाज नाही लबाड लांडग्याला ॥१॥

सभेत भाषण करतोय रं।
फुकट आश्वासन देतोय रं।
दारू बाटली आणि कोंबडी, लागतीय त्याच्या
दिमतीला, कमी नाही 'सत्' कार्याला ॥२॥

धुराळा उडवित हिंडतोय रं।
बंगले खरेदी करतोय रं।
मिळवण्याची अक्कल नाही, पण हा मिळवून
देतोय रं, अंत नाही त्याच्या धडपडीला ॥३॥

पैसे देऊन मते घेतो।
हजार चक्रा घरी घालतो।
निवडून येता तोंड दाविना, जाऊन बसतुया
म्हमईला, चिकटुन बसतोय खुर्चीला ॥४॥

देशहित सर्व जन ऐका।
अशांना मते देऊ नका।
सच्छीलांना निवडून देऊन, पुढे आणावे देशाला,
ध्यानी घ्या हो ह्या संदेशाला ॥५॥

**एस्. बी. घोळवे**
१२ वी. कला

# कार्यवृत्तांत

## प्रगतीचा आलेख

**परीक्षांचे निकाल : मार्च १९८३**

१. बारावी, कला ४७%
२. बारावी; वाणिज्य ८३%
३. बारावी, शास्त्र ३२%

**विद्यार्थी संख्या १९८३–८४**

| | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण |
|---|---|---|---|
| १. ११ वी कला | १६८ | ४९ | २१७ |
| २. ११ वी वाणिज्य | २३२ | ६८ | ३०० |
| ३. ११ वी शास्त्र | १४८ | १७ | १६५ |
| ४. १२ वी कला | १४३ | २९ | १७२ |
| ५. १२ वी वाणिज्य | १६५ | ६० | २२५ |
| ६. १२ वी शास्त्र | १०२ | २८ | १३० |

**प्राध्यापक संख्या**

पूर्ण वेळ ३१, अर्धवेळ ४, तासिकेप्रमाणे १
शारीरिक शिक्षक २

**नवागतांचे स्वागत**

१. प्रा. टी. डी. यादव (मराठी)
२. प्रा. कु. एम. डी. वैद्य (इंग्रजी)
३. प्र. कु. आर. के. सुर्वे (इंग्रजी)
४. प्रा. एन. ई. शिंदे अर्धवेळ (समाजशास्त्र)
५. प्रा. एस. एस. शहा (रसायनशास्त्र)
६. प्रा. ए. टी. सोनवणे (पदार्थविज्ञानशास्त्र)
७. प्रा. डॉ. एन. एन. पाटील (वनस्पतीशास्त्र)
८. प्रा. बी. बी. निरपणकर (वाणिज्य)
९. प्रा. डॉ. ए. एन. फड (प्राणिशास्त्र)
१०. श्री. डी. बी. काळे (शारीरिक शिक्षण)
११. प्रा. आर. डी. राजदेरकर (कॉमर्स व्होके. कोर्स)
१२. प्रा. आर. एल. शिनकर (कॉमर्स व्होके. कोर्स)

**हार्दिक अभिनंदन**

खालील प्राध्यापक त्यांच्या दैनंदिन कामाचा व्याप सांभाळून परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

३. प्रा. पी. बी. इंगवले DHE (II)
१. प्रा. बी. एल. दबडे DHE (I)
४. प्रा. बी. आर. काळंगे DHE (II)
५. प्रा. डी. के गुरव DHE (II)
२. प्रा. ए. बी. भगाटे M.A, (Hist) A Grade
७. प्रा. ए. व्ही. इंगळे M.Com. (I)

## अभ्यासेतर कार्य

**वादविवाद व वक्तृत्व मंडळ**

प्रमुख : **प्रा. आर. टी. शहा.**

या वर्षी नियतकालिक विभागाच्या सहकार्याने संयुक्तपणे 'कथा – कविता – निबंध स्पर्धा' जाहीर करण्यात आली.

यशस्वी विद्यार्थी :

**कथा विभाग**

१) प्रथम पारितोषिक – रु. ३१/–
श्री. धनंजय शिन्दे, १२ वी (कला)

**कविता विभाग**

१) प्रथम व द्वितीय पारितोषिक पात्र कोणीही नाही
२) तृतीय पारितोषिक रु. ११/–
श्री. देवकाते नरसिंग, १२ वी (कला)







## उज्वल यश प्रथम श्रेणी–प्रथम क्रमांक



**जे. आर. गांधी**
१२ वी शास्त्र



**कु. संगीता बेलपत्रे**
१२ वी वाणिज्य



**एन. ए. काझी**
१२ वी कला

## पुणे जिल्हा विभागीय स्पर्धा क्रीडा नैपुण्य



**एस्. पी. झगडे**
कुस्ती, हातोडा फेक



**जे. एस्. शिंदे**
लांब उडी

पारितोषिक वितरण : **श्री. रासकर** डी. वाय. एस. पी.



**जयंत गांधी** १२ वी शास्त्र

भूमिपूजन



**डॉ. व सौ. वर्धमान कोठारी**

आंतर शालेय पुणे जिल्हा **विजेते** व उपविजेते संघ



कबड्डी (मुले)



खो खो (मुले)



४ x १०० मि. रिले

(उपविजयी)

(मुले)

**निबंध विभाग**

पारितोषिक पात्र कोणीही नाही.

या अंकात हे साहित्य प्रसिद्ध करण्यात आले आहे.

---

**शाळा - महाविद्यालय समूह योजना**

---

प्रमुख **प्रा. डॉ. एम्. बी. चौधरी**

दि. १७-९-८३ : 'धडपड व्यासपीठ' कार्यक्रम आयोजित.

१५ विद्यालयातील शिक्षकांचा सहभाग

दि. १४-१०-८३ : इंग्रजी चर्चासत्र. राधेश्याम एन्. अगरवाल टेक्नि. हायस्कूल मध्ये आयोजित.

गद्य–पद्य–व्याकरण यावर अनुभवी प्राध्यापकांचे पाठ व त्यावर चर्चा.

सहभाग–४० शिक्षक.

विविध स्पर्धांचे आयोजन :

चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा.

---

**क्रीडा विभाग**

---

**चेअरमन – प्रा. ए. एस्. किणिगे**

डायरेक्टर, फिजिकल एज्युकेशन : श्री. एस्. बी. इंगवले, श्री. डी. बी. काळे

**पावसाळी सत्र** : आमच्या क्रीडांगणावर आयोजित.

१) कबड्डी (मुले)

बारामती गटात अजिंक्यपद. पुणे जिल्हा आंतरशालेय स्पर्धेतही अजिंक्यपद. याच संघाची पुणे येथील विभागीय स्पर्धेसाठी निवड.

२) खो खो (मुले)

बारामती गटात अजिंक्यपद. पुणे जिल्हा आंतरशालेय स्पर्धेसाठी याच संघाची निवड होऊन संघास उपविजेते पद.

३) टेबल टेनिस (मुली)

बारामती गटात अजिंक्यपद. पुणे जिल्हा आंतरशालेय स्पर्धेसाठी याच संघाची निवड.

**हिवाळी सत्र** : आमच्या क्रीडांगणावर आयोजित.

मैदानी स्पर्धा

बारामती गटाची जनरल चँपीयनशिप

यशस्वी खेळाडू :–

१) श्री. शिन्दे जे. एम्. – १०० मि. धावणे, लांब उडी, उंच उडी, भाला फेक - प्रथम क्रमांक.

२) श्री. झगडे एस्. पी. : हातोडा फेक – प्रथम क्रमांक

३) श्री. राठोड एस्. आर्.
श्री. शिन्दे जे. एम्.
श्री रणदिवे
श्री. व्होरा एम्. एम्.
} ४ × १०० रिले प्रथम क्रमांक

४) श्री. व्होरा एम्. एम्.
श्री. साळवी
श्री. व्होरा एस्. एम्.
श्री. शिन्दे जे. एम्.
} ४ × १०० रिले द्वितीय क्रमांक

पुणे जिल्हा आंतरशालेय स्पर्धेसाठी वरील सर्व खेळाडूंची निवड.

**पुणे जिल्हा आंतरशालेय स्पर्धा**

यशस्वी खेळाडू :–

१) श्री. शिन्दे जे. एस्. : लांब उडी — प्रथम क्रमांक. १०० मि. धावणे व भालाफेक — द्वितीय क्रमांक. रसायनी येथे विभागीय स्पर्धेसाठी निवड.

२) श्री. झगडे एस्. पी. : कुस्ती (७९ कि. वजन गट) व हातोडा फेक – प्रथम क्रमांक.

रसायनी येथे विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड.

३) श्री. राठोड एस्. आर्.
श्री. शिन्दे जे. एम्.
श्री व्होरा एम्. एम्.
श्री. रणदिवे
} ४ × १०० रिले जिल्हा उपविजयी.

**रसायनी येथे विभागीय स्पर्धेत यशस्वी खेळाडू**

१) श्री शिंदे जे. एस्. : लांब उडी - प्रथम क्रमांक सातारा येथे राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी निवड

२) श्री. झगडे एस्. पी : कुस्ती (७९ किलो वजन गट) द्वितीय क्रमांक.

---

## प्राध्यापकांचे कार्यकर्तृत्व

---

**प्रा. वि का. शिन्दे**

मराठी विभागातर्फे आयोजित चर्चासत्रात '१९६० नंतरची वास्तववादी कादंबरीची रुपे' या निबंधाचे वाचन व चर्चेत सहभाग.

प्रकाशित साहित्य–

१) ''लोकनाट्याचा पहिला अविष्कार: गोंधळ''– 'वसंत' ऑगस्ट १९८३

२) 'संताची राधा आणि शाहीरांची राधा'– 'वसंत' ऑक्टोबर १९८३

३) 'एक उपेक्षित कलाविष्कार– लोकनाट्य : 'गाढवाचे लग्न'–'वसत' जानेवारी १९८४

४) 'पूर्वपूजेची परंपरा'– 'वसंत' फेब्रुवारी १९८४

५) 'संगीत सौभद्र' : काही नवे– 'विश्‍वसमाचार' १६–१०–८४

## श्रध्दांजली

अकरावी कॉमर्स या वर्गात शिकत असलेला विद्यार्थी **श्री. राजेश बाळकृष्ण देवळे** याचे आकस्मिक दुःखद निधन झाले. महाविद्यालयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

## सूची विभाग

### एप्रिल १९८३–८४ च्या विविध परीक्षांत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे सूची

**१२. वी. आर्टस**

१) श्री. काझी नासरअहमद हिदायतुल्ला
२) कु. मरकाळे ज्योती शंकर
३) श्री. घाडगे भालचंद्र मुरलीधर
४) श्री. ढमे अशोक कुंडलीक

टीप:– कु. घाडगे जयश्री श्रीराम ही बहि:स्थ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

**१२. वी. सायन्स**

१) श्री. गांधी जयंत रतनलाल
२) कु. चाहुरे मीनल ज्ञानेश
श्री. पटाले रणजित व्यंकटेश
३) श्री. टांकेसाळे अनंत लक्ष्मण
४) श्री. कारवा अमोल गिरधारिलाल
५) श्री. दोशी किशोरकुमार अशोककुमार
६) कु. गवसणे मंजुश्री षडानन
७) श्री. धालपे श्रीकांत मदन
८) श्री. बक्षी सूर्या गोपालकृष्णन्
९) कु. दुरुगकर सुषमा शांतीनाथ
१०) कु. पाटील प्रेमलता बाळासाहेब
११) श्री. पिसाळ जयवंत महिपती
१२) श्री. थॉमस झकेरीया
१३) श्री. जाधव प्रदीप महादेव
श्री. जोशी विद्याधर कृष्णाजी
१४) श्री. अवचट लक्ष्मीकांत चिंतामण
१५) श्री. कुलकर्णी उदय रामचंद्र

**१२ वी कॉमर्स**

१) कु. बेलपत्रे संगीता गंगाधर
२) श्री. देशपांडे प्रशांत विनायक
३) कु. पोटे मेघा राजाराम
४) कु. ढेरे अंजली मारुतराव
५) श्री. खरात शाम शरदराव
३) श्र. शेख यासीन लतीफ
७) श्री. धालपे विनायक मदन
८) कु. बोथरे जयश्री केरु
९) श्री. बोथरे रमेश दत्तात्रय
कु. चौधरी सुनीता गंगाधर
श्री. ओसवाल महेंद्र बस्तीमल
१०) श्री. पोटे किशोर मधुकर
११) कु. भोरी रशिदा ताहेरभाई
१२) श्री. वकील सुनील व्यंकटराव
१३) कु. टाटीया कल्पना पोपटलाल
१४) श्री. घाडगे हनुमंत परशुराम
कु. महाडिक ज्योती राजाराम
१५) श्री. बनकर रवींद्र शिवाजी
कु. दोशी नम्रता भारतलाल
कु. शहा संगीता शशिकांत
१६) श्री. कोकरे नंदकुमार हरिभाऊ
१७) कु. बागवान मलेका गुलाब
कु. पेशवे योगिनी पुरुषोत्तम
१८) श्री. भोरी शब्बीर युसुफभाई



## शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची नांवे

| | | |
|---|---|---|
| **१. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती** | | |
| १. कु विद्या धालपे | ११ वी सायन्स | रु. ६०० |
| २. कु. मनीषा मुतालिक | ११ वी सायन्स | रु. ६०० |
| ३. श्री. मंगलमूर्ती भालेराव | १२ वी सायन्स | रु. ७२० |
| **२. राष्ट्रीय गुणवत्ता पारितोषिक व प्रशस्तीपत्र** | | |
| १. श्री. विवेक जठार | ११ वी सायन्स | रु. १०० |
| २. कु. वृन्दा गारुळे | ११ वी सायन्स (१९८१–८२) | रु. १०० |
| **३. राज्य गुणवत्ता शिष्यवृत्ती** | | |
| १. श्री. मिलीन्द पावसकर | १२ वी सायन्स | रु. ३०० |
| **४. ई. बी. सी. शिष्यवृत्ती** | | |
| १. श्री. बाळकृष्ण काळभोर | ११ वी सायन्स | रु. ३२० |
| २. श्री. सूर्यकांत ताकवणे | ११ वी सायन्स | रु. ४०० |
| ३. कु. वनीतादेवी टकले | ११ वी आर्टस | रु. ५०० |
| ४. कु. रत्नमाला जाधव | १२ वी कॉमर्स | रु. ५०० |
| ५. श्री. अनिल लोणकर | १२ वी सायन्स | रु. ७०० |
| ६. श्री. रमेश बोरावके | १२ वी सायन्स | रु. ७०० |
| **५. राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती** | | |
| १. कु. सीमा बेलपात्रे | ११ वी आर्टस | रु. ७२० |
| २. कु. सविता कुलकर्णी | ११ वी कॉमर्स | रु. ७२० |
| ३. श्री. मार्तंड जोरी | ११ वी सायन्स | रु. ७२० |
| ४. श्री गजानन जगताप | ११ वी सायन्स | रु. ७२० |
| ५. श्री. प्रकाश मचाले | १२ वी सायन्स | रु. ७२० |
| ६. श्री. दत्तात्रय गायकवाड | १२ वी सायन्स | रु. ७२० |
| **३ गणेश मनोहर व शंकरराव गणेश दाते ट्रस्ट (पुणे) शिष्यवृत्ती** | | |
| १. कु. स्मिता पळसुले | १२ वी कॉमर्स | रु. ६०० |
| २. श्री. मिलींद पावसकर | १२ वी सायन्स | रु. ३०० |
| ६. कु. सविता कुलकर्णी | ११ वी कॉमर्स | रु. १५० |
| ४. कु. शबनम शेख | १२ वी सायन्स | रु. १५० |
| **७. कंकुबाई केवलचंद गांधी ट्रस्ट (मोडलिंब) शिष्यवृत्ती –** | | |
| १. श्री. अभिनंदन शहा | ११ वी कॉमर्स | रु. १०० |
| २. कु. स्वरुपा शहा | १२ वी कॉमर्स | रु. १०० |
| **८. फ्रीडम फायटर स्कॉलरशिप** | | |
| १. श्री. राजाराम दळवी | ११ वी सायन्स | रु. २५० |
| २. श्री. अब्राहम पटवेकरी | ११ वी सायन्स | रु. २५० |
| **९. फिजिकली हॅण्डीकॅण्ड स्कॉलरशिप (८२–८३)** | | |
| १. श्री. बापू फरगडे | १२ वी कॉमर्स | रु. ६०० |
| २. श्री. शंकर गवळी | ११ वी आर्टस | रु. ६०० |
| ३. श्री. नारायण चव्हाण | १२ वी कॉमर्स | रु. ६०० |

## विशिष्ट पारितोषिके

१. **कॉलेज पारितोषिके**

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. सुनीता जगताप | ११ वी कला | प्रथम | रु. ५१ |
| २) श्री. मंगलमूर्ती भालेराव | ११ वी शास्त्र | प्रथम | रु. ५१ |
| ३) कु. प्रतिभा गुजर | ११ वी वाणिज्य | प्रथम | रु. ५१ |
| ४) श्री. निसार अहमद काझी | १२ वी कला | प्रथम | रु. ५१ |
| ५) श्री. जयंत गांधी | १२ वी शास्त्र | प्रथम | रु. ५१ |
| ३) कु. संगीता बेलपत्रे | १२ वी वाणिज्य | प्रथम | रु. ५१ |

२) **मे. पोपटलाल चंदनमल पारितोषिक.**

| | | |
|---|---|---|
| १) श्री. जयंत गांधी | १२ वी शास्त्र प्रथम | रु. १०१ |

३) **डॉ. एस्. ई. गवसणे पारितोषिके–**

| | | |
|---|---|---|
| १) श्री. जयंत गांधी | १२ वी ला शास्त्र विषयात प्रथम | रु. ७० |
| २) कु. मीनल चाहुरे | १२ वी ला शास्त्र विषयात द्वितीय | रु. ६५ |

## विविध शिष्यवृत्त्या व फ्रीशिप्स मिळविऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९८३–८४

**शिष्यवृत्या–**

| | |
|---|---|
| १. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती | ३ |
| २. राष्ट्रीय गुववत्ता परितोषिक व प्रशस्तीपत्र | २ |
| ६. राज्यसरकारची गुणवत्ता शिष्यवृती | १ |
| ४. ई. बी. सी. शिष्यवृत्ती– | ६ |
| ५. राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती– | ३ |
| ६. गणेश मनोहर व शंकरराव गणेश दाते (पुणे) ट्रस्ट्र शिष्यवृत्ती. | ४ |
| ७. कंकुबाई केवलचंद गांधी ट्रस्ट, (मोडलिंब) स्कॉलरशिप | २ |
| ८. फ्रीडम फायटर स्कॉलरशिप. | २ |
| ९. बी सी स्कॉलरशिप | १३० |
| १०. कॉलेज मेरीट स्कॉलरशिप | ४८ |
| ११ फिजिकली हॅण्डीकॅप्ड स्कॉलरशिप (८२–८३) | ३ |

**फ्रीशिप्स**

| | |
|---|---|
| १. ई. बी. सी. फ्रीशिप | ७९२ |
| २. ई. बी. सी. फ्रीशिप (राज्यसरकार) | २४ |
| ३. बी. सी. फ्रीशिप. | ८ |
| ४. प्रायमरी टीचर फ्रीशिप. | ६६ |
| ५. एस्. एस्. सी. डी. एड फ्रीशिप | ४ |

*With Best Compliments From :*

**RELIABLE SCIENTIFIC COMPANY**

128, Mangalwar Peth, Pardeshi Wada, PUNE – 411011

Suppliers :

**Scientific Equipments, Fine Chemicals, Charts, Models, Plant Physiology Apparatus**



*With Best Compliments From :*

☎ : 340

**CKhajed**

**VASTRA NIKETAN**

**Marwad Peth, BARAMATI.**

**Dealers : Bombay Dyeing, Raymond's O. C. M. Digjam, Dinesh, Nivada**

ARE YOU ON OUR MAILING LIST & GETTING 'PUBLISHING IN INDIA' (A monthly Journal of the Book Trade)

and

OTHER INDIAN PUBLICATIONS IN :

ART
ARCHAEOLOGY
HUMANITIES
SOCIAL SCIENCE
BOTANY
&
AGRICULTURE

IF NOT PLEASE CONTACT

☎ : 278368

**D. K. PUBLISHERS' DISTRIBUTORS**

( Largest wholesale house for Indian Books )

1, Ansari Road, Daryaganj, New Delhi 110002.

*With Best Compliments From*

## POONA CHEMICAL LABORATORY

**207, Mangalwar Peth, Poona 411011**

**Phone - 33781**

**Manufacturers of Fine Chemicals**

हार्दिक शुभेच्छा

**ग्वालियर, रेमंड, जियाजी इत्यादी मिलच्या सूटिंग्ज शर्टिंगचा प्रचंड स्टॉक**

## अ भ य

बारामती, जि. पुणे

फोन : ५०१

**प्रिंटेड साड्या व बनारसी शालूंचे नवीन भव्य दालन**



हार्दिक शुभेच्छा !

Gold Medal Winners of the
" Trade Fare Acadamy "
Award 73-74

## मेसर्स कोठारी ब्रदर्स

विविध लहरी

☎ } औषध ३६६
इतर २२९

**मारवाड पेठ, बारामती ( पुणे )**

देशी विदेशी औषधे, मोटारचे सामान व टायर टच्यूब्ज, रेडिओ टेलिव्हिजन्स् ग्रामोफोन रेकॉर्डस् व प्लेअर्स, इलेक्ट्रिक सामान, स्पोर्टस् घडयाळे मिळण्याचे एकमेव ठिकाण

हार्दिक शुभेच्छा !

फोन : ३७०

## बारामती मशिनरी स्टोअर्स (पंदारकर)

**एजंट्स :– विश्वास ऑईल इंजिन्स,**

**महावीर पथ, बारामती**

हार्दिक शुभेच्छा !

फोन : २२७

## युनियन ट्रेडर्स

**फिनोलेक्स पी. व्ही. सी. पाईप व फिटींगचे विक्रेते,**

श्रीराम मंदिराजवळ,
बारामती. जि. पुणे.

हार्दिक शुभेच्छा !

फोन : ३७०

विद्यार्थीदशेत वैयक्तिक व राष्ट्रीय प्रगत जीवनाचे ध्येय साधण्यासाठी, शिस्त व ज्ञान संवर्धनाकरिता खूप कष्ट केल्यानंतर चार घटका करमणूक हवीच ! त्यासाठी आम्हास अवश्य भेट द्या.

## दुर्गा चित्रमंदिर
व
## श्याम टॉकीज

बारामती.

हार्दिक शुभेच्छा !

ऑप्टीकल स्टोअर्स

नंबरचे चष्मे व गॉगलचे व्यापारी

भिगवण चौक, बारामती.

With Best Compliments Form ;

☎ : 364, 418

M/s S. G. Date & Son

Agents :

Bharat Petroleum Corpn. Ltd
BARAMATI. ( Dist. Pune. )
Pin 413102

हार्दिक शुभेच्छा !

जयकुमार जीवराज शहा आणि कंपनी

( वडूजकर )

गूळ, साखर, भुसार, पेंड व खताचे व्यापारी आणि कमिशन एजंट

बारामती ४१३ १०२.

हार्दिक शुभेच्छा !

साकल्प स्टेशनर्स ॲन्ड प्रिन्टर्स

बारामती, जि. पुणे.





हार्दिक शुभेच्छा !

विशाल टेलरिंग आर्ट

(लेडिज स्पेशालिस्ट)

प्रो. आर. व्ही. डोईफोडे

बुरुड गल्ली, बारामती, ( जि. पुणे )

हार्दिक शुभेच्छा !

फोन : ६९५

शाह दिपचंद धरमचंद ॲड सन्स

' दीपधर्म ' गुनवडी चौक,
बारामती ४१३ १०२ जि. पुणे

ऑफसेट छपाई

कलर ब्लॉक्स
पावडरलेस ब्लॉक्स
फोटो फॅब्रिकेशन

के. जोशी ॲन्ड को.

ब्लॉकमेकर्स ॲन्ड आर्ट प्रिंटर्स

स्थापना – १९३७

भिकारदास मारूती मंदिराजवळ पुणे ४११०३०

☎ : 441 409

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

### बहुद्देशीय अल्पकालिक अभ्यासक्रम

- जर्मन (ॲक्सिलरेटेड व डिप्लोमा)
- इंग्लिश फ्रेंच व रशियन (सर्टिफिकेट)
- डिप्लोमा इन् टॅक्सेशन लॉ
- विविध स्पर्धात्मक (Competitive) परीक्षांचे तयारी वर्ग
- केन्द्र सरकारच्या नॅशनल टॅलेन्ट सर्च परीक्षेच्या तयारीचे वर्ग

**वैशिष्टचे :–** • विदेशी भाषांच्या अभ्यासासाठी अद्ययावत् भाषाविज्ञान प्रयोगशाळेची सोय.
स्पर्धात्मक परीक्षांसाठी उपयुक्त संदर्भग्रंथांची विपुलता.

---

**विद्यार्थी कल्याणासाठी ........................ सहकार**

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय**
**विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार, मर्यादित**

( नोंदणी क्रमांक :– पी. एन्. ए. / बी. एम्. टी. / सी. ओ. एन्. एस्. / ९६२ / ३०–९–८३ )

**विद्यार्थ्यांना उपयुक्त शैक्षणिक साहित्य व दैनंदिन गृहोपयोगी वस्तूंची स्वस्त दरात विक्री**

एकूण सभासद ७६२ एकूण भाग भांडवल रु. १६,५८०/–

**प्रा. आप्पासाहेब देसाई**
अध्यक्ष

**प्रा. आर्. जे. गांधी**
सचिव

---

**महाविद्यालयीन सेवकांच्या कल्याणासाठी .............................. सहकार**

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित**

( नोंदणी क्रमांक :– १०१० / ४–८–८३ )

सभासद संख्या ९० वसूल भांडवल– २०,०००/– कर्जवाटप– रु. ४०,०००/–

**प्रा. ए. एस्. किणिंगे**
अध्यक्ष

**प्रा. बी. बी. पाटील**
उपाध्यक्ष

**प्रा. आर्. जी. पाटील**
सचिव



**Bharat Radiators.... for cool confidence**

*Quality and ruggedness has put us as original equipment on most leading vehicles manufactured in India.*

**Following Radiators are readily available**

| Cars & Jeeps | Trucks | Tractors |
|---|---|---|
| Ambassador | Bajaj Metador | Escort 335 |
| Mahindra Jeeps | Dodge & Fargo | Ford 3000 & 3600 |
| Premier Padmini | Hindustan B/Ford | HMT Zetor |
| | Mahindra F. C. | Massey Fergusson |
| | Leyland | PLT Harvest Combine |
| | Tata | Swaraj & Sartaj (PTL) |

## BHARAT RADIATORS PRIVATE LIMITED

**Regd. Off. & Factory :**
Vidyanagari Marg,
Santacruz (East) Kalina
BOMBAY 400 098

Tel Nos. : 612 29 65
612 34 57
612 08 57

**Head Office :**
81 Bajaj Bhavan,
Nariman Point,
BOMBAY 400 021

Tel Nos. : 202 00 85
202 14 97
TELEX : 011 – 4661